• पुणे, मंगळवार, २२ जुलै २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 234 • वर्ष ४ थे, अंक २३४ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



हलगर्जीपणा नागरिकांच्या ‘मुळावर’...!

P३



१२

ती माझ्याकडे तिच्या वडिलांना मारणारा व्यक्ती म्हणून पाहाते

## At a Glance

### रशिया-युक्रेन युद्ध थांबणार?

**नवी दिल्ली :** रशिया आणि युक्रेनमधील दीर्घकालीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन युक्रेनसोबत शांतता चर्चेसाठी तयार असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र, त्यासाठी रशियाचे "मुख्य उद्दिष्ट" पूर्ण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता रशिया-युक्रेन युद्ध थांबू शकते पण, पुतिन यांची महत्वाची अट या शांतता चर्चेतील अडथळा आहे.

रशियन राज्यकारभार जिथून चालतो त्या क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी रशियाच्या माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, "राष्ट्राध्यक्ष पुतिन अनेक वेळा सांगत आले आहेत की, युक्रेनमधील संघर्षाचा शांततामय मार्गाने शेवट व्हावा, अशी त्यांची इच्छा आहे. ही एक गुंतागुंतीचे आणि वेळखाऊ प्रक्रिया आहे, पण शांततेसाठीचा प्रयत्न सुरू आहेत." पेस्कोव्ह यांनी स्पष्ट केले की, "आमच्यासाठी सर्वात महत्त्वाचं म्हणजे आमचं उद्दिष्ट गाठणं. ती उद्दिष्टे » पान ७ वर

# धक्कादायक निकाल...

## मुंबई लोकल साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष सुटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील २००६ मधील लोकल साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली आहे. या प्रकरणातील १२ जणांना दोषी ठरवणारा विशेष मोक्का न्यायालयाचा ३० सप्टेंबर २०१५ चा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. विशेष न्यायालयाने यातील पाच दोषींना मृत्युदंड आणि उर्वरित ७ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. यानंतर जवळपास एक दशकानंतर उच्च न्यायालयाने सर्व १२ जणांची निर्दोष सुटका केली.

या सर्वांना दोषी ठरवण्यासाठी कोणतेही पुरावे आढळले नाहीत. सरकारी पक्षाला खटला सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयश आले, असे निरीक्षण न्यायमूर्ती अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या विशेष खंडपीठाने नोंदवले. न्यायालयाला जवळपास सर्वच सरकारी वकिलांचे म्हणणे विश्वासार्ह वाटले नाही, असेही मत न्यायालयाने नोंदवले.



### एटीएस सुप्रीम कोर्टात जाणार

• दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून सदर खटल्याचे विशेष अभियोक्ता यांच्याशी सल्लामसलत करून व निकालाच्या विश्लेषणाअंती पुढील निर्णय घेण्यात येत आहे, असे एटीएसने म्हटले आहे. एटीएस मुंबई हायकोर्टाच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात जाणार आहे. सुप्रीम कोर्टात जाण्यासाठी हायकोर्टाच्या निकालाचे अवलोकन करून अभ्यास करण्यात येईल. सरकारी वकिलांशी चर्चा करूनच सुप्रीम कोर्टात जाण्याची तयारी एटीएसकडून करण्यात येणार आहे.

११ जुलै २००६ रोजी झालेल्या आरडीएक्स स्फोटांमध्ये १८९ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. तर ८२७ प्रवासी जखमी झाले होते. ११ मिनिटांत झालेल्या ७ स्फोटांनी मुंबईत हादरली होती. या खटल्यातील दोषींनी त्यांच्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तर राज्य सरकारने फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर आता सर्व दोषींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली. ११ दोषींची निर्दोष सुटका करण्यात आली असून एकाचा दरम्यानच्या काळात मृत्यू झाला आहे. या खटल्याची जानेवारीमध्ये सुनावणी पूर्ण झाली होती. न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता.

१२ पैकी एकाचे कोरोनाने निधन

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत प्रदीर्घ सुनावणीनंतर, ऑक्टोबर २०१५ मध्ये विशेष न्यायालयाने पाच आरोपींना मृत्युदंड आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. यात कमाल अन्सारी, मोहम्मद फैजल अतौर रहमान शेख, एहतेशाम कुतुबुद्दीन सिद्दीकी, नवीद हुसेन खान आणि आसिफ खान » पान ७ वर

# न्या. वर्मा यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याच्या समर्थनार्थ एकूण २०८ खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. याबाबतचे प्रस्ताव सोमवारी लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेच्या सभापतींकडे सादर करण्यात आले असून, त्यावर लवकरच निर्णय होणार आहे. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी सांगितले की, न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना पदावरून हटवण्याचा ठराव प्राप्त झाला आहे. यासंदर्भात राज्यसभेच्या सरचिटणीसांकडून आवश्यक ती पावले उचलण्याची प्रक्रिया ठरविण्यात येणार असून लवकरच हा निर्णय कळविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.



१४ मार्च रोजी न्यायमूर्ती वर्मा यांच्या दिल्लीतील सरकारी निवासस्थानातून मोठ्या प्रमाणात नोटा सापडल्या होत्या. आगीत जळून खाक झालेल्या या नोटाही मोठ्या संख्येने होत्या. आगीच्या घटनेची माहिती मिळताच दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या पथकाला नोटांचा ढिगारा दिसला, त्यानंतर पोलिसांनाही माहिती मिळाली. न्यायमूर्ती वर्मा तेव्हा दिल्ली उच्च न्यायालयात होते आणि हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर त्यांची अलाहाबादला बदली » पान ७ वर

### समितीचा अहवाल काय सांगतो

• न्यायमूर्ती वर्मा यांनी कोणत्याही गैरप्रकाराचा इन्कार केला असला तरी सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या अंतर्गत चौकशी समितीने असा निष्कर्ष काढला आहे की, ज्या दुकानात रोकड सापडली त्या दुकानावर न्यायाधीश आणि त्यांच्या कुटुंबियांचे नियंत्रण होते. यावरून त्यांचे गैरवर्तन इतके गंभीर आहे की, त्यांना हटवले पाहिजे, हे सिद्ध होते.

# देशासाठी गौरवशाली अधिवेशन

## विजयोत्सव करण्याचा क्षण; पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. या अधिवेशनात पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर, गुजरात विमान दुर्घटनेवरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार घमासान होण्याची शक्यता आहे. या अधिवेशनाच्या आधी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी माध्यमांना संबोधित केले. यावेळी त्यांनी हे अधिवेशन विजयोत्सव करण्याचा क्षण असल्याचे म्हटले.



पीएम मोदी म्हणाले की, "हे पावसाळी अधिवेशन देशासाठी गौरवशाली ठरणार आहे. या सत्रात राष्टगौरव आणि विजयोत्सव साजरा करण्याचे हे सत्र आहे. या जल्लोषात एकसुराने सहभागी होऊ. संपूर्ण जगात भारतीय सैन्याच्या सामर्थ्याचा रुप दिसले. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्याने जे लक्ष्य ठरवले होते ते १०० टक्के पूर्ण केले. आतंकवाद्यांच्या आकांना २२ मिनिटांत ऑपरेशन सिंदूरमधून जमीनदोस्त केले," असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

पहलगाममधील क्रूर अत्याचार आणि हत्याकांडाने संपूर्ण जग हादरले होते. संपूर्ण जगाचे लक्ष दहशतवादी आणि त्यांच्या आकांकडे वेधले गेले होते. त्यावेळी पक्षीय हितसंबंध बाजूला ठेवून, आपल्या बहुतेक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि राज्य प्रतिनिधी देशाच्या हितासाठी जगासमोर गेले आणि एका आवाजात दहशतवाद्यांचा आका पाकिस्तानला उघड करण्यासाठी यशस्वी मोहीम राबवली. या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल मी सर्व खासदार आणि पक्षांचे कौतुक करू इच्छितो, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी विरोधकांचेही कौतुक केले.

यामध्ये "मेड इन इंडिया सैन्य शक्तीच्या नव्या रुपाकडे जग आकर्षित झाले आहे. संसद जेव्हा या विजयोत्सवाचा एकसुराने जल्लोष करेल तेव्हा भारतीय सैन्यशक्तीला बळ मिळेल. देशवासियांना प्रेरणा मिळेल. गेल्या १० वर्षांत निर्माण झालेल्या पाण्याच्या साठ्यात जवळजवळ तिप्पट वाढ झाली आहे, ज्यामुळे येत्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होईल. पहिल्यांदाच अंतराळ स्थानकावर भारतीय ध्वज फडकवणे हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे," असंही ते म्हणाले.

# अजित पवारांनी घेतला सूरज चव्हाणचा राजीनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लातूर :** येथे अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण करणारे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांची अखेर उचलबांगडी झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांना तातडीने भेटायला बोलावले होते. या भेटीवेळी अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची सूचना दिली.

अजित पवार यांनी भेटायला बोलावल्यानंतरच सूरज चव्हाण यांच्यावर कारवाई होणार, असे संकेत मिळत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही सूरज चव्हाण यांच्या कृत्याबद्दल जाहीर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांना पदमुक्त होण्याचे आदेश दिले.

# छावा संघटनेला शिवेंद्रराजे भोसले यांचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधीमंडळात मोबाईलवर रम्मी खेळतानाचा व्हिडीओ राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी व्हायरल केला होता. यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेने रविवारी लातूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या समोर तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी ‘छावा’ संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांच्या समोर प्रतिकात्मक निषेध म्हणून पत्ते उधळले होते. या प्रकारानंतर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी ‘छावा’च्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर छावा संघटना चांगलीच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. राज्यभरात अनेक ठिकाणी सुरज चव्हाणांचा निषेध व्यक्त करण्यात आला. छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आज लातूर बंदची हाक दिली. यावरून मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी छावा संघटनेला इशारा दिलाय.



छावा संघटनेकडून लातूर बंद केल्यानंतर पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी लोकशाहीमध्ये आंदोलनाचा सर्वांना अधिकार आहे. जिल्हा प्रशासन आंदोलनावर लक्ष ठेवून आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये. त्याचबरोबर सर्वसामान्य आणि व्यापाऱ्यांना वेटीस धरलं जाऊ नये. ज्यांना स्वतःहून बंद मध्ये सहभागी व्हायचं आहे ते होतील. पण, जबरदस्ती आणि दादागिरी चालणार नाही, यावर जिल्हा प्रशासन लक्ष ठेवून आहे, असा इशारा छावा संघटनेला दिलाय.

दरम्यान, सूरज चव्हाण यांच्या विरोधात छावा संघटनेसह इतर मराठा संघटना देखील आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. याची प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी गंभीर दखल घेतली. सुनील तटकरे यांच्या दौऱ्यातून सूरज चव्हाण यांना वगळण्यात आले. तसेच अजित पवार यांनी सोमवारी सूरज चव्हाण यांना तातडीने मुंबईला » पान ७ वर

# शेअर बाजारात तेजी, निर्देशांक वधारले

**मुंबई:** विदेशी गुंतवणूकदारांकडून खरेदी आणि बँकिंग शेअर्समधील तेजीच्या जोरावर सोमवारी (दि.२१ जुलै) सेन्सेक्स- निफ्टी वधारुन बंद झाले. सेन्सेक्स ४४२ अंकांनी वाढून ८२,२०० वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १२२ अंकांनी वाढून




२५,०९० वर बंद झाला. एकूणच शेअर बाजारात खरेदीचा उत्साह राहिला.

विशेषतः बँकिंग शेअर्समधील तेजीमुळे निफ्टी बँक मजबूत दिसून आला. निफ्टी बँक १.१ टक्के वाढला. यावर आयसीआयसीआय बँक २.७ टक्के, एचडीएफसी बँक २.२ टक्के, आयडीएफसी फर्स्ट बँक १.३ टक्के आणि कोटक बँक शेअर्स १.१ टक्के वाढला.

मेटल, रियल्टी आणि ऑटो शेअर्समध्येही खरेदी दिसून आली. पण आयटी शेअर्सवर दबाव राहिला. बीएसई मिडकॅप » पान ७ वर





## राजाभाऊ नातू स्मृतिदिना निमित्त ‘महापूर’चा प्रयोग

**पुणे :** महाराष्ट्रीय कलोपासकचे माजी चिटणीस कै. राजाभाऊ नातू यांच्या 31व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी ज्येष्ठ लेखक सतीश आळेकर लिखित ‘महापूर’ या नाटकाचा प्रयोग भरत नाट्य मंदिरात आयोजित करण्यात आला होता. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेतील स्पर्धक आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात प्रयोग रंगला. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धेतील प्रयोग नेटका कसा असावा याचे मार्गदर्शन मिळण्यासाठी कै. राजाभाऊ नातू यांच्या स्मृतिदिनानिमित्त नाट्य प्रयोगाचे आयोजन केले जाते. लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय या मुद्द्यांवर स्पर्धकांनी अधिक लक्ष केंद्रीत करावे, असा स्पर्धा संयोजक म्हणून महाराष्ट्रीय कलोपासकचा आग्रह असतो. ‘महापूर’ या नाटकात आरोह वेलणकर, प्रसाद वनारसे, रेशम श्रीवर्धनकर, धीरेश जोशी, रेणुका दफ्तरदार, दिलीप जोगळेकर यांच्या भूमिका होत्या. तर ऋषी मनोहर यांनी नाटकाचे दिग्दर्शन केले होते. या प्रयोगात सहभागी कलाकारांनी पुरुषोत्तम स्पर्धा गाजविली आहे. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या निमित्ताने रंगमंचावर पाऊल ठेवले होते. ‘महापूर’ या नाटकाच्या निमित्ताने पुन्हा महाराष्ट्रीय कलोपासकसाठी या रंगमंचावर येण्याची संधी मिळाल्याचे आरोह वेलणकर यांनी सांगितले.

## शिक्षकांच्या अर्जित रजेला शासनाची मंजूरी

**पुणे :** शिक्षण विभागाने घेतलेल्या वरिष्ठ निवड श्रेणीला आणि निवड श्रेणी प्रशिक्षणाला उपस्थित असलेल्या शिक्षकांना अर्जित रजा राज्य शासनाने मंजूर केली आहे. याबाबतचे पत्र शिक्षण उपसंचालक कार्यालयाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे, सोलापूर अहिल्यानगर यांना दिले आहे,” अशी माहिती आंबेगाव तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष दीपक भोर यांनी दिली.

वरिष्ठ निवड श्रेणी आणि निवड श्रेणी प्रशिक्षणाला एकूण ७२ शिक्षक उपस्थित होते. हे प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांना उन्हाळी सुट्टी उपभोगण्यास प्रतिबंध झाला होता. शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांच्या माध्यमातून शिक्षण विभागाकडे अर्जित रजा मंजूर करण्याबाबत आंबेगाव तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेमार्फत पत्रव्यवहार केला होता. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे व माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

## ‘एनजीओं’ होणार कार्यशाळेत मार्गदर्शन

**पुणे :** राज्य व देशपातळीवर अनेक स्वयंसेवी संस्था (एनजीओ) कार्यरत असून, त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली आहे. विविध कामांसाठी ‘एनजीओं’ना प्राधान्य दिले जात असल्याने याद्वारे विकास, व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत आहेत. अशा स्वयंसेवी संस्थेची स्थापना, नोंदणी, निधीची उभारणी, कामकाज पद्धती, सीएसआरचे सहकार्य, प्रशासकीय व्यवस्थापन आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करणारी कार्यशाळा २६ व २७ जुलैला आयोजिली आहे. कार्यशाळेत संस्था कशी स्थापन करावी, प्रशासकीय दस्तऐवजीकरण, धर्मादाय आयोग व इतर सरकारी विभागांशी संपर्क कसा साधावा, प्रस्ताव तयार करणे व सादर करणे, कर्मचाऱ्यांची नियुक्ती, वार्षिक ताळेबंद, अहवाल कसे तयार करावेत, एनजीओद्वारे शासकीय योजनांची अंमलबजावणी, संस्था नोंदणीनंतरची कागदपत्रे याविषयी मार्गदर्शन होणार आहे.

## मोदक कार्यशाळा २७ जुलैपासून

**पुणे :** महाराष्ट्राच्या लाडक्या गणेशोत्सवाची सगळेजण आतुरतेने वाट पाहात आहेत. या काळात मोदकांची मागणी वाढलेली असते. या पार्श्वभूमीवर गणरायाला आवडणारा मोदक सिक्रेट टिप्स व ट्रिक्ससह तयार करण्याची कृती प्रात्यक्षिकांसहित करून दाखवणारी व मोदक व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांना तो कसा सुरु करावा याचे मार्गदर्शन करणारी कार्यशाळा २७ जुलैला आयोजिली आहे. यामध्ये मोदक व्यवसायातील संधी व त्यासाठी विविध प्रकारचे नावीन्यपूर्ण मोदक कसे तयार करावेत याचे प्रशिक्षण घेतले जाणार आहे. मोदक तयार करण्याची व्यावसायिक पद्धत, प्रिझर्वेशनच्या पद्धती, बाजारपेठेतील संधी, नफा, पॅकिंग, लेबलिंग आदींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यशाळेत खवा, मँगो, केशर, गुलकंद, पान, शुगर फ्री, चॉकलेट, खारे, ड्रायफ्रूट, तळणीचे व उकडीचे मोदकांचे प्रकार शिकवले जातील.

## रोटरी क्लब विज्डमच्या अध्यक्षपदी स्वाती यादव

**पुणे :** रोटरी क्लब विज्डमच्या अध्यक्षपदी स्वाती यादव यांची निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष



निलेश धोपाडे यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्विकारली. सचिवपदी प्रशांत अकलेकर यांची निवड करण्यात आली. पुण्याई सभागृह कोथरूड यथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी प्रांतपाल संतोष मराठे. सहाय्यक प्रांतपाल अॅड.भूषण कुलकर्णी, रोटरी पदाधिकारी, सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना नवनिर्वाचित अध्यक्ष स्वाती यादव यांनी आगामी वर्षात ग्रीन स्कूल्स आणि ग्रीन एक्स्पो सारख्या पर्यावरणपूरक प्रकल्पांसह अॅनिमिया थॅलेसेमिया विषयक वैद्यकीय शिबिरे, मिलेट(नाचणी,बाजरी ज्वारी) शेतीस प्रोत्साहन, तसेच बोअरवेल रिचार्ज व पावसाच्या पाण्याचे संकलन (रेन वॉटर हार्वेस्टिंग) आदी समाजोपयोगी प्रकल्प राबविणार असल्याचे सांगितले.

## उपाययोजना आपत्ती रोखण्यासाठी...!




**पुणे** फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (FSAI) – पुणे विभाग आणि पुणे अग्निशमन दल यांच्या संयुक्त विद्यमाने “इंडिया फायर अँड सिक्युरिटी यात्रा” अंतर्गत “हॉस्पिटल अग्निसुरक्षा आणि संरक्षण” या विषयावर एक विशेष सेमिनार येथे संपन्न झाला.

## इंडिया फायर अँड सिक्युरिटी यात्रा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (FSAI) – पुणे विभाग आणि पुणे अग्निशमन दल यांच्या संयुक्त विद्यमाने “इंडिया फायर अँड सिक्युरिटी यात्रा” अंतर्गत “हॉस्पिटल अग्निसुरक्षा आणि संरक्षण” या विषयावर एक विशेष सेमिनार येथे संपन्न झाला.

या वेळी महाराष्ट्र अग्निशमन सेवेचे संचालक संतोष वारीक संचालक,व महापालिकेचे मुख्य अग्निशामन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, श्रीनिवास वल्लुरी, पंकज धारकर अध्यक्षीय सभासद आणि एफएसएआय सुरक्षा इंन्डेक्सचे अध्यक्ष फायर ऍन्ड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष, सुजल शाह पुणे विभाग अध्यक्षा, अजित यादव सचिव, ऋषिकेश मांजरेकर, अनुजा सावंत, मेजर प्रकाश कापडे, मनीष मोरे, डॉ. मीरा पी. शिराळकर तसेच उद्योग, व्यवसाय अर्किटेक्ट उत्पादक, विक्रते या क्षेत्रातील ३५० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

सेमिनारच्या सुरुवातीला सुजल शाह यांनी उपस्थितांचे स्वागत करताना “सुरक्षित भारत हे आमचे ध्येय आहे,”.

# मिळकतकर वसुलीचा ‘धुमधडाका’...!

### १४०० कोटींच्या वसूलीचा ‘श्रीगणेशा’: आता टार्गेट ३२५० कोटींचे

शहराच्या विकासाचा गाडा मिळकतकर वसूलीवर अवलंबून आहे; हा मिळकतकर वसूल झाला तरच शहराच्या विकासाला चांगला हातभार लागत आहे. त्यामुळेच महापालिका प्रशासनाच्या वतीने वसूलीसाठी सर्वाधिक प्राधान्य देण्यात येत आहे; विशेष म्हणजे या प्रयत्नांना दरवर्षी अपेक्षित यश येत आहे. हे वास्तव असले तरी गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहरातील कर चुकवेगिरी करत असलेल्या मिळकतदारांची संख्या अधिकच वाढत आहे. त्यामुळे हा ‘घाटा’ प्रशासनाला सहन करावा लागत आहे. त्याची महापालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे; त्यानुसार अशा मिळकतदारांची यादी तयार करण्याचे काम प्रशासनाच्या वतीने सुरु करण्यात आले असून सव्वातीन हजार कोटीं कर वसूल करण्याचे उद्दिष्ट्य ठेवले आहे.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या मिळकतकर विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सव्वा दोन महिन्यांतच १४०० कोटी रुपयांचा महसूल गोळा करत चांगली सुरुवात केली आहे. मात्र, महापालिकेने ठरवलेले ३२५० कोटी रुपयांचे वार्षिक उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अजून मोठ्या प्रमाणावर प्रयत्नांची गरज आहे. त्यामुळे प्रशासनाने आता शहरातील वापरात असलेल्या पण अजूनही कराच्या कक्षेत न आलेल्या मिळकतींवर लक्ष केंद्रीत केले आहे.

शहरात सध्या तीन ते चार लाख मिळकती अशा आहेत, ज्या वापरात असतानाही त्यांच्यावर अजून मिळकतकर आकारलेला नाही. यामध्ये निवासी, व्यावसायिक, औद्योगिक वापरातील मिळकती आणि मोकळ्या भूखंडांचा समावेश आहे. या मिळकतींचा शोध घेऊन त्यांच्यावर तातडीने कर आकारणी करण्याचे नियोजन सुरू असून, यासाठी मिळकतकर विभागाच्या २८ विभागीय निरीक्षकांना एक लाख नव्या मिळकती शोधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

महापालिकेच्या हद्दीत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नवे बांधकाम प्रकल्प उभे राहत आहेत. या बांधकामांची पाहणी करून, भोगवट्याच्या तारखेपासून कर आकारला जातो. मात्र, अनेक नागरिक अनधिकृत बांधकामे करून नंतर भोगवटा पत्र घेतात, पण मिळकतकर भरणे टाळतात. यामुळे महसुलात मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. अशा प्रकरणांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात येत आहेत.

**समाविष्ट गावांचा वसुलीप्रश्न कायम**

महापालिकेत अलीकडे समाविष्ट झालेल्या ३२ गावांतील मिळकतकर वसुलीचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. या गावांमध्ये कर वसुलीला स्थगिती मिळाल्यामुळे, महसूल संकलनावर परिणाम होत आहे. यासाठी राज्य सरकारकडे सतत पाठपुरावा सुरू आहे, अशी माहिती उपायुक्त अविनाश सपकाळ यांनी दिली.

**तिन्ही वर्षांत घटलेली नवीन करआकारणी**

गेल्या तीन आर्थिक वर्षांत नव्याने कर लावलेल्या मिळकतींची संख्या पाहता, दरवर्षी घट होत असल्याचे दिसते:

**आर्थिक वर्ष नव्याने कर आकारण्याच्या मिळकती**

- २०२२-२ ५४,५७४
- २०२३-२४ ५२,६३३
- २०२४-२५ ४०,१५३ (आत्तापर्यंत)

## मराठा आरक्षणासाठी आंदोलनाची घोषणा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठा आरक्षणासाठी लढा आता निर्णायक टप्प्यावर येऊन ठेपला असून, येत्या २९ ऑगस्ट रोजी राज्यभरातील लाखो मराठा बांधव मुंबईत एकत्र जमून आरक्षणाची मागणी सरकारपुढे ठामपणे मांडणार आहेत. “आरक्षण मिळाल्याशिवाय मागे फिरायचं नाही,” असा ठाम निर्धार मराठा आरक्षण चळवळीचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे यांनी रविवारी वाघोली येथे झालेल्या सभेत व्यक्त केला.

वाघोली येथील 'सीजन २४' या ठिकाणी सकाळपासून सायंकाळपर्यंत मराठा समाजाच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या वेळी मनोज जरांगे यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. “गेल्या दोन वर्षांपासून आम्ही शांततेच्या मार्गाने मागणी करत आहोत, मात्र सरकारने केवळ आश्वासनांवर वेळ काढला आहे. आता निर्णयाचा क्षण आलाय. लाखोंच्या संख्येने मराठा बांधव मुंबईकडे निघणार असून, आरक्षण मिळवूनच परत येणार आहे,” असे ते म्हणाले.

आंदोलन शांततेच्या आणि लोकशाही मार्गानेच होणार असल्याचे स्पष्ट करताना त्यांनी सरकारला इशाराही दिला – “मराठा समाजाला रोखण्याचा प्रयत्न करू नका. आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाला, तर परिणाम सरकारला भोगावे लागतील.” मुंबईकडे जाण्यासाठी अंतरवाली, पैठण, शेवगाव, अहिल्यानगर, आळे फाटा, जुन्नर येथील शिवनेरी येथे नतमस्तक होऊन माळशेज घाटमार्गे कल्याण-चेंबूर मार्गे पुढे जाण्याचा नियोजित मार्ग त्यांनी सभेत जाहीर केला.

हे आंदोलन मराठा समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न असून, यंदा आरक्षण मिळवण्यासाठी कोणतीही मागेघेणीय भूमिका घेतली जाणार नाही, असा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## बरखा रंग’ मैफलीत रसिकांनी अनुभवला स्वरवर्षाविष्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वर्षा ऋतुनिमित्त प्रेरणा म्युझिक ऑर्गनायझेशन आयोजित ‘बरखा रंग’ या अनोख्या मैफलीत रसिकांनी विदुषी सानिया पाटणकर, पंडित प्रवीण गावकर यांच्या सुश्राव्य गायनाची तर पंडित मुकुंदराज देव यांच्या बहारदार तबला वादनाची अनुभूती घेत स्वरवर्षाविष्कार अनुभवला.

टिळक रोडवरील गणेश सभागृहात ‘बरखा रंग’ या आयोजन करण्यात आले आहे. ‘बरखा रंग’ मैफलीची सुरुवात गोवा येथील सुप्रसिद्ध गायक पंडित प्रवीण गावकर यांनी राग मधुवंतीमधील ‘आयी बरखा’ या पारंपरिक बंदिशीने केली. त्याला जोडून द्रुत लयीतील ‘मोरे कर्तार नैय्या करो मोरी पार’ ही बंदिश सादर केली. खुला आवाज, सुमधुर सादरीकरण रसिकांना विशेष भावले.

यानंतर पंडित मुकुंदराज देव यांचे बहारदार तबला वादन झाले. त्यांनी तीन तालातील विविध छटा रसिकांसमोर सादर केल्या. ठेका पेशकार, ‘धीन्’चा विस्तार, बनारस घराण्याचे चलन, लखनवी अदब दर्शविणारा रेला तसेच कथक नृत्याला तबला साथ करताना तबल्यातून सादर केलेले होरीचे कवित्त, छंद, परण यांना रसिक श्रोत्यांनी भरभरून दाद देत तबला वादनाचा आनंद घेतला. कार्यक्रमाची सांगता विदुषी सानिया पाटणकर यांच्या समधुर, सुश्राव्य गायनाने झाली.




**पुणे** वर्षा ऋतुनिमित्त प्रेरणा म्युझिक ऑर्गनायझेशन आयोजित ‘बरखा रंग’ या अनोख्या मैफलीत रसिकांनी विदुषी सानिया पाटणकर, पंडित प्रवीण गावकर यांच्या सुश्राव्य गायनाची तर पंडित मुकुंदराज देव यांच्या बहारदार तबला वादनाची अनुभूती घेत स्वरवर्षाविष्कार अनुभवला.

# ‘छोट्या अणूची मोठी गोष्ट’तून माणूसपणाचीही मांडणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पाश्चात्त्य वैज्ञानिक, संशोधकांनी अणुउर्जेसंबंधी संशोधनाचा वापर विद्ध्वंसासाठी केला. अणुबॉम्ब तयार करून अणुउर्जेचे विनाशक रूप जगासमोर आणले. या अणुउर्जेच्या विनाशक आणि महासंहारक शक्तीमुळेच जग आज तिसऱ्या महायुद्धाच्या तोंडावर उभे आहे. अणुचे विनाशक रूप संशोधित न करता, त्याच्या विधायक वापराचे संशोधन पुढे जाण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

दिलीपराज प्रकाशन प्रकाशित आणि दिलीप बर्वे लिखित ‘छोट्या अणूची मोठी गोष्ट’ या विज्ञानविषयक पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवारी कर्वे रस्त्यावरील स्वामीकृपा हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. पुस्तकाचे प्रकाशन डॉ. सबनीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. ज्येष्ठ स्त्रीवादी लेखिका अश्विनी धोंगडे, प्रकाशक मधुर बर्वे तसेच लेखक दिलीप बर्वे मंचावर होते. दिलीपराज प्रकाशनाचे राजीव बर्वे उपस्थित होते.

लेखक दिलीप बर्वे म्हणाले, गोष्टी सांगणे मला शालेय जीवनापासून आवडते. मोठेपणी मी स्लाईड शोच्या माध्यमातून शास्त्रज्ञ, महान व्यक्तिमत्त्वे यांच्या गोष्टी विद्यार्थी तसेच नागरिकांसमोर मांडत गेलो. १९९८ मध्ये आपल्या देशाने जे दोन अणुस्फोट घडवले, त्यांची इत्थंभूत माहिती सर्वांसमोर यावी, हा हेतू ठेवून पुस्तकाचे लेखन केले. तांत्रिक, वैज्ञानिक परिभाषा न वापरता, सोप्या आणि गोष्टीरूपात हे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.

डॉ. अश्विनी धोंगडे म्हणाल्या, ‘छोट्या अणूची मोठी गोष्ट’ या पुस्तकाच्या शीर्षकापासूनच लेखक दिलीप बर्वे यांची सर्जनशीलता प्रकट झाली आहे.

> गोष्टी सांगणे मला शालेय जीवनापासून आवडते. मोठेपणी मी स्लाईड शोच्या माध्यमातून शास्त्रज्ञ, महान व्यक्तिमत्त्वे यांच्या गोष्टी विद्यार्थी तसेच नागरिकांसमोर मांडत गेलो. १९९८ मध्ये आपल्या देशाने जे दोन अणुस्फोट घडवले, त्यांची इत्थंभूत माहिती सर्वांसमोर यावी, हा हेतू ठेवून पुस्तकाचे लेखन केले. तांत्रिक, वैज्ञानिक परिभाषा न वापरता, सोप्या आणि गोष्टीरूपात हे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.
> **-दिलीप बर्वे;** ज्येष्ठ लेखक

# निर्बंध आणि भयमुक्त होणार यंदाचा गणेशोत्सव

## पोलीस आयुक्त अमितेश कुमार ग्वाही : राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा २०२४ पुणे विभाग पारितोषिक वितरण समारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदा गणपती उत्सव हा राज्य उत्सव असा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी उत्सव अधिक वाढेल, त्याकरिता सर्व उपाययोजना सुरु झाल्या आहेत. तसेच त्याविषयी बैठका देखील आता सुरु होतील. यंदाचा गणपती उत्सव निर्बंध व भयमुक्त मुक्त राहिल. पोलीस व प्रशासनाकडून कोणतेही एकतर्फी निर्बंध लावण्यात येणार नाहीत. मागील वर्षीची परवानगी चालले. यावर्षी परवानगीची वेगळी गरज नाही, असे पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा २०२४ पुणे शहर महापालिका क्षेत्र विभागाचा पारितोषिक वितरण समारंभ गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडला. पारितोषिक वितरण समारंभाला पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, जगद्गुरु कृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर, माजी आमदार उल्हास पवार, माजी महापौर अंकुश काकडे, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, दगडूशेठ गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह सुवर्णयुग तरुण मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भोसले मार्ग भवानी पेठेतील शिवाजी मित्र मंडळाने प्रथम क्रमांक पटकाविला. तर, एरंडवण्यातील श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाने द्वितीय, नाना पेठेतील पोटसुळ्या मारुती मंडळाने तृतीय, नवी खडकी येरवडा येथील नवज्योत मित्र मंडळ ट्रस्टने चौथे तर भांडारकर रस्त्यावरील विनायक नवयुग मित्र मंडळाने पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. स्पर्धेत सहभागी झालेल्या १९४ मंडळे व शाळांपैकी १०६ मंडळे व शाळांनी पारितोषिके मिळविली असून एकूण १४ लाख ९५ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली. शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष (१२५) साजरे करणारे मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष विकास पवार यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

अमितेश कुमार म्हणाले, महाराष्ट्रात ३० वर्षांपासून वेगवेगळ्या शहरात उत्सवात मी बंदोबस्त केला होता.





“ समाजातील प्रत्येक उपेक्षित गोष्टींना आधार देणारा हा उत्सव आहे. नक्षलवादी भागात काम करणारा, दररोज विधायक कार्यक्रम करणारा कार्यकर्ता गणेशोत्सवाने घडविला. हा उत्सव २० वर्षांपूर्वी निर्बंधमुक्त होता, तो पुन्हा तसा करण्याकरिता कार्यकर्ते सोबत आहेत. त्यामुळे उत्सव निर्बंधमुक्त रहायला हवा. दारू पिऊन विघ्न आणणाऱ्याला पोलिसांनी सोडू नये.

**-आमदार हेमंत रासने;**
सरचिटणिस; श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट



“ यंदा अनंत चतुदर्शीच्या दुसऱ्या दिवशी ग्रहण आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी दुपारी १२ च्या आत विसर्जन मिरवणूक संपवायला हवी. त्यामुळे यंदा मिरवणूक सकाळी १०.३० च्या ऐवजी दोन तास आधी सुरु व्हावी. आपण धार्मिक उत्सव साजरा करतो, त्यामुळे याबाबत विचार व्हायला हवा. दुसऱ्या दिवशी उशिरापर्यंत चालणारी मिरवणूक लवकर संपविणे गरजेचे आहे. यंदाच्या वर्षी अनंत चतुदर्शीला लवकर म्हणजेच दोन तास आधी मिरवणुकीत निघावे.

**-अण्णा थोरात;** अध्यक्ष आखिल मंडई मंडळ



## मराठी साहित्य संस्थेतर्फे बाबा भांड यांना जीवनगौरव

**पुणे :** गेल्या आठ वर्षांपासून बालकुमारांमध्ये साहित्य रुची वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित करीत असलेल्या अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे बालसाहित्य क्षेत्रात विपुल योगदान देणारे संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांना यंदाचा जीवनगौरव पुरस्कार तर, वसई येथील ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री सिसिलिया कार्व्हालो यांची ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ कविवर्य ग. ह. पाटील पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, अशी अशी माहिती अध्यक्ष राजन लाखे, कार्यवाह डॉ. दिलीप गरूड आणि कोषाध्यक्ष बी. आर. माडगूळकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविली आहे.

यंदाचा हा पुरस्कार प्रदान सोहळा मंगळवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजता, भावे प्राथमिक हॉल, रेणुका स्वरूप गर्ल्स हायस्कूल, सदाशिव पेठ, टिळक स्मारक मंदिरासमोरील गल्ली, पुणे येथे होणार आहे. या कार्यक्रमला प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त एअरमार्शल भूषण गोखले उपस्थित राहणार आहेत.

## व्यावसायिकांसाठी करिअर पुन्हा घडवण्याची सुवर्णसंधी

**पुणे :** भारतातील आघाडीच्या स्वायत्त शिक्षणसंस्थांपैकी एक असलेल्या सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग (SCDL) च्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त, शनिवार २६ जुलै रोजी मुंबई मध्ये करिअर ग्रोथ सेमिनार आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विविध विषयांवर करिअर समुपदेशन करण्यात येणार आहे. तसेच विविध नोकरदार, पदवीधर, प्रारंभिक आणि मध्यम स्तरावरील करियर प्रोफेशनल, माजी विद्यार्थी, कॉर्पोरेट प्रोफेशनल, कॉर्पोरेट एचआर, जे आपले करियर बदलू इच्छितात किंवा करियर मध्ये पुढे जाऊ इच्छितात यांच्या करीता विशेष करिअर ग्रोथ सेमिनार घेण्यात येणार आहे. हा सेमिनार सर्वांसाठी मोफत घेतला जाणार आहे. करिअर समुपदेशन, एचआर राउंड टेबल कॉन्फरन्स, डेल कार्नेगी लीडरशिप मास्टरक्लास, एससीडीएल बद्दल सादरीकरण, माजी विदयार्थी - पुरस्कार वितरण समारंभ, या विषयावर कार्यक्रमाद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## 'विनोदोत्तम' एकांकिका स्पर्धेचे अर्ज उपलब्ध

**पुणे :** यंदाची विनोदोत्तम करंडक राज्यस्तरीय खुली एकांकिका स्पर्धा दिनांक १५ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत होणार आहे. विनोद या विषयाला वाहिलेल्या या एकमेव स्पर्धेत भाग घेण्यासाठी दिनांक १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान अर्ज उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दिनांक १५ ऑगस्ट २०२५ असून दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी लॉट्सची काढले जाणार आहेत, अशी माहिती विनोदोत्तम करडंक चे अध्यक्ष हेमंत नगरकर यांनी कळवली आहे.

बाल कलाकारांपासून ज्येष्ठ कलाकारांपर्यंत सगळ्यांच्या कलेला वाव देणाऱ्या या स्पर्धेचे आयोजन गेल्या १७ वर्षांपासून करण्यात येते. यंदाचे स्पर्धेचे १८ वे वर्ष असून स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद वाढतोच आहे.

भरत नाट्यमंदिरात होणाऱ्या या स्पर्धेचे अर्ज उपलब्ध असून ते मिळविण्यासाठी विनोदोत्तम करडंकचे संस्थापक हेमंत नगरकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्राणिसंग्रहालयात चितळांच्या मृत्युमुळे खळबळ

**पुणे :** शहरातील कात्रज येथील राजीव गांधी प्राणिसंग्रहालयात १३ ते १५ जुलैदरम्यान चितळ प्रजातीच्या तब्बल १५ हरणांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली आहे. या घटनेमुळे निसर्गप्रेमी आणि प्राणीसंवर्धन क्षेत्रात खळबळ उडाली असून, प्रशासनाने तात्काळ सावध पावले उचलली आहेत.

हरणांच्या मृत्युमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी संभाव्य संसर्गजन्य आजाराची शक्यता लक्षात घेऊन उर्वरित प्राण्यांना जैवसुरक्षा कवचात ठेवण्यात आले आहे. प्राणिसंग्रहालयातील सर्व प्राण्यांच्या आरोग्यावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

प्राणिसंग्रहालयाचे संचालक डॉ. राजकुमार जाधव यांनी सांगितले की, "सध्या प्रकरणाची चौकशी सुरू असून मृत हरणांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. अहवाल येत्या दोन दिवसांत अपेक्षित आहे.

# हलगर्जीपणा नागरिकांच्या ‘मुळावर’...!

### अनधिकृत होर्डिंगचा चुकीचा अहवाल: अन्य अधिकाऱ्यांचीही झोप उडाली

राज्य शासन आणि महापालिका प्रशासनाच्या नियमानुसार होर्डिंग अथवा फलकांची उभारणी करताना त्यांच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यासाठी शासन आणि प्रशासनाने नियमावलीही तयार केली आहे; परंतु या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणीच होत नसल्याची अनेक उदाहरणे आतापर्यंत उघडकीस आली आहेत. धक्कादायक बाब म्हणजे प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारीच या चुकींच्या घटनांना खतपाणी घालत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे; त्यासाठी महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी आता यासंदर्भात कठोर भूमिका घेतली आहे. त्यानुसार शहरातील होर्डिंगची तपासणी सुरु करण्यात आली आहे.

“ "आयुक्तांच्या सूचनेनुसार चुकीची माहिती देणाऱ्या परवाना निरीक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अन्य कार्यालयांकडून देखील अनधिकृत होर्डिंग हटवण्याचे काम सुरू असून, आवश्यक त्या कारवाया सुरू आहेत."

**– संतोष वारूळे,** उपायुक्त, आकाशचिन्ह आणि परवाना विभाग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील अनधिकृत होर्डिंगचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असतानाच, महापालिका आयुक्तांच्या आदेशानंतर सुरू झालेल्या तपासणी मोहिमेमुळे क्षेत्रीय कार्यालयांतील हलगर्जीपणा चव्हाट्यावर आला आहे. नगररस्ता-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयातील परवाना निरीक्षकाने (वरिष्ठ लिपिक) अनधिकृत फलकांविषयी चुकीचा अहवाल सादर केल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला निलंबित करण्यात आले आहे.

या कारवाईनंतर महापालिकेतील अन्य क्षेत्रीय कार्यालयांची देखील धांदल उडाली असून, काही कार्यालयांनी तत्काळ हालचाली सुरू केल्या आहेत. येरवडा आणि वानवडी परिसरातील अनुक्रमे तीन-तीन अनधिकृत होर्डिंग हटवण्यात आले असून, इतर विभागांकडूनही कारवाईसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली जात आहे.

महापालिकेच्या नोंदीनुसार शहरात सध्या २,६४० अधिकृत होर्डिंग आहेत. मात्र, यंदाच्या पावसाळ्यात तीन ठिकाणी होर्डिंग कोसळण्याच्या घटनांनी पालिकेची चिंता वाढवली आहे. त्यामुळे आयुक्तांनी सर्व क्षेत्रीय कार्यालयांना तत्काळ अनधिकृत होर्डिंग हटवून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

तथापि, १४ क्षेत्रीय कार्यालयांनी सादर केलेल्या संयुक्त अहवालात केवळ २४ अनधिकृत होर्डिंग असल्याचा दावा करण्यात आला होता. हा आकडा संशयास्पद वाटल्याने आयुक्तांनी अहवालावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यानंतर स्वतंत्र तपासणी दरम्यान शहरात तब्बल ९१ अनधिकृत होर्डिंग आढळून आले आहेत.

ही आकडेवारी उघड झाल्यानंतर आयुक्तांनी स्पष्टपणे बजावले की, अनधिकृत जाहिरात फलकांना परवानगी मिळण्यासाठी काही अधिकारी आर्थिक देवघेव करीत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा प्रकरणांची कसून चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. या प्रकरणामुळे महापालिकेतील परवाना विभाग आणि क्षेत्रीय कार्यालये धास्तावली असून, लवकरच शहरभर अनधिकृत होर्डिंगविरोधात मोठी मोहीम राबवली जाण्याची शक्यता आहे.

# गणेशोत्सवाच्या निधीबाबत गणेश मंडळांना उत्सुकता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य सरकारकडून यंदाच्या गणेशोत्सवासाठी जाहीर करण्यात आलेल्या ५५० कोटी रुपयांच्या निधीचा विनियोग नेमका कसा केला जाणार? याविषयी पुण्यातील विविध गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये उत्सुकता असून, हा निधी योग्य पद्धतीने आणि समाजोपयोगी कामांसाठीच वापरावा, अशी स्पष्ट अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महापालिकेच्या वतीने गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीसंदर्भात एक संयुक्त आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी गणेश मंडळांचे पदाधिकारी, पर्यावरणप्रेमी संस्था, धार्मिक संघटना, तसेच मेट्रो, महावितरण, अग्निशमन विभाग, पोलीस, प्रदूषण नियंत्रण मंडळ आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. आणि पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले यांनीही या बैठकीस उपस्थिती लावली. यासोबतच राज्य सरकारने गणेशोत्सवाला 'राज्य उत्सवाचा दर्जा' दिल्याबद्दल कार्यकर्त्यांनी आभार मानले. मात्र, ५५० कोटींच्या निधीचा वितरण आणि वापर कोणत्या निकषांनुसार केला जाईल?, हे अद्याप स्पष्ट नसल्यामुळे अनेकांनी याविषयी सविस्तर माहिती देण्याची मागणी केली.

**■ महत्त्वाच्या मागण्या सूचना :**

**बैठकीत गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी पुढील मुद्द्यांवर महत्त्वपूर्ण सूचना व मागण्या मांडल्या:**

- **जाहिरात परवानगी लवकर मिळावी**
- **महावितरणकडून वीजजोडणी तात्काळ व्हावी**
- **डिपॉझिट रक्कम लवकर परत मिळावी**
- **वाहतूक आणि स्वच्छतेची प्रभावी व्यवस्था**
- **ढोल-ताशा पथकांची संख्या आणि ध्वनिप्रदूषण नियंत्रण**
- **पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन**
- **शाडू मातीच्या मूर्तींचा अधिकाधिक वापर**

### टिळक रस्त्यावरील विसर्जन मिरवणुकीसाठी स्वतंत्र समिती

पुणे शहरात विसर्जन मिरवणुका मुख्यतः चार मार्गांवरून जातात. टिळक रस्त्यावरील मिरवणुकीत मोठ्या प्रमाणावर गणेश मंडळांचा सहभाग असतो, त्यामुळे गर्दी टाळण्यासाठी दोनशे गणेश मंडळांची स्वतंत्र समिती तयार करण्यात आली आहे, अशी माहिती गणेश घोष यांनी दिली. त्यांनी महापालिकेला यासाठी अतिरिक्त व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

# राष्ट्रीय पांचभौतिक चिकित्सा परिषद संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वैद्यराज दातार पांचभौतिक चिकित्सा व संशोधन केंद्र सांगली, आयडीआरए ,भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट वाघोली व सेंटर ऑफ एक्सलन्स, आयुष विभाग ,पुणे विद्यापीठ या चार संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पांचभौतिक चिकित्सा या आयुर्वेदातील विषयावरील दोन दिवसांची राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय परिषद दिमाखात संपन्न झाली. यासाठी भारतभरातून चारशे पेक्षा अधिक वैद्य ,विद्यार्थी , पदव्युत्तर विद्यार्थी ,संशोधक यांनी उपस्थिती दाखवली. धूतपापेश्वर, सांडू व इतर अनेक औषधी निर्माण कंपन्यांनी आपली संशोधनाभिमुख उत्पादने येथे सादर केली .

या परिषदेमध्ये पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, आयुष विभागाचे डॉ.भूषण पटवर्धन डॉ. कौस्तुभ उपाध्याय. आय टी आर ए च्या डायरेक्टर डॉ. तनुजा नेसरी, एथिक्स कमिटीचे अध्यक्ष डॉ राकेश शर्मा बी एस डी टी या संस्थेचे प्रमुख डॉक्टर सदानंद सरदेशमुख तसेच मुख्य कन्व्हेनर वैद्य प्रशांत सुरू, वै.गिरीश टिल्लू ,वै. सुहास जोशी, वै. अशोक वाली, प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर ,वै. राजेंद्र प्रसाद वै. वारियर हे उपस्थित होते .वैद्य आ.वा. दातारशास्त्री प्रणित पांच भौतिक चिकित्सेचा प्रचार आणि प्रसार व्हावा, त्याचप्रमाणे त्यामध्ये वेगवेगळे संशोधन व्हावे.



**पुणे** वैद्यराज दातार पांचभौतिक चिकित्सा व संशोधन केंद्र सांगली, आयडीआरए ,भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट वाघोली व सेंटर ऑफ एक्सलन्स, आयुष विभाग ,पुणे विद्यापीठ या चार संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पांचभौतिक चिकित्सा या आयुर्वेदातील विषयावरील दोन दिवसांची राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय परिषद दिमाखात संपन्न झाली.

# स्वच्छ, सुंदर कसबाकडे आणखी एक यशस्वी पाऊल; २२ शिल्पकृतींचे अनावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कसबा मतदारसंघात स्वच्छतेच्या बाबतीत सुरू असलेले काम कौतुकास्पद असून फ्लेक्समुक्त कसबा तसेच शहर करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत. यासोबतच अतिक्रमण हटवून वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी पालिका तसेच पोलीस प्रशासनाने पुढाकार घ्यावा असे आवाहन नगरविकास राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ यांनी केले आहे.



“आज कसबा मतदारसंघातील संपूर्ण कचऱ्याची ठिकाणे साफ करून त्यांचे सुशोभीकरण करण्याचा अतिशय कौतुकास्पद उपक्रम आमदार हेमंत रासने यांनी हाती घेतला आहे. पुणे शहराला लाभलेल्या कला, संस्कृती आणि इतिहासाचं वैभव परत आणण्यासाठी त्यांनी पहिले ठोस पाऊल उचललं आहे. त्यांच्या या ड्राईव्हला माझ्या खूप खूप शुभेच्छा असून, नगरविकास मंत्री म्हणून त्यांना शक्य ती सर्व मदत पुरवण्यासाठी मी प्रयत्नशील असेन”, असे मिसाळ यांनी म्हटले आहे.

आज नागनाथ पार येथे छत्रपती शिवाजी महाराज व मराठा साम्राज्याच्या राजमुद्रांचे भव्य शिल्प अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमात राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, घनकचरा उपायुक्त संदीप कदम, झोन १ चे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले, विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाचे वालगुडे व बल्लाळ, मंडल अध्यक्ष अमित कंक, छगन बुलाखे, प्रशांत सुर्वे तसेच मतदारसंघातील पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री मिसाळ यांच्या हस्ते आज “स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा” मिशन अंतर्गत नागनाथ पार चौक, सदाशिव पेठ येथे उभारण्यात आलेल्या ३डी शिल्पकृतीचे उद्घाटन करण्यात आले. एकूण २२ ठिकाणी अशी शिल्पे साकारली असून कसबा उभारण्यात आली आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून पूर्वी कचरा टाकला जाणाऱ्या ठिकाणांचा पूर्णतः कायापालट करून त्या जागा आकर्षक, शिस्तबद्ध आणि सांस्कृतिक दृष्टीने समृद्ध करण्यात येत आहेत.

या वेळी आमदार हेमंत रासने म्हणाले, “कसबा मतदारसंघ हा ऐतिहासिक वारसा असलेला भाग आहे. इथे फक्त स्वच्छता नव्हे, तर सौंदर्यीकरण, संस्कृती आणि सामाजिक जाणीव या सगळ्यांचा समन्वय साधणं गरजेचं आहे.



“ इंदौर ला जाऊन सर्व भाजप पदाधिकाऱ्यांसह अभ्यास करण्याचा माझा प्रयत्न होता मात्र काही अडचणींमुळे शक्य झाले नाही. आमदार रासने यांनी मात्र इंदौरचा दौरा करून कसबा मतदारसंघ स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न सुरू केले हे कौतुकास्पद आहे. कसबा हा रोल मॉडेल म्हणून ओळखला जाईल याबद्दल मला विश्वास आहे.

**-माधुरीताई मिसाळ,**
नगरविकास राज्यमंत्री

# शाश्वत ग्रामीण विकासासाठी शुद्ध देशी गोवंश जतन

## महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा : नोंदणीकृत ९५० गोशाळा; पशुपालकाच्या दारात सव्वा कोटी देशी गोवंश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असून देशी गोवंशाच्या विकासासाठी आयोगाकडून कार्य आणि उपक्रम राबवण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. राज्यातील देशी गोवंश आपल्या अंगीकृत गुणांमुळे जगात वैशिष्ट्यपूर्ण असून त्याची जोपासना आणि सांभाळ ग्रामीण पशुपालकांच्या शेती पद्धतीशी निगडित आहे. भारतीय उपखंडात गोवंश निगडीत ग्रामजीवन, पीक पद्धती, कुटुंब पोषण आणि आर्थिक नियोजन वर्षानुवर्ष राबवण्यात आले आहे. देशी गोवंशाचा सांभाळ परंपरेतून सुधारणांकडे आणि पुढे आधुनिक व्यवस्थापनातून जैवतंत्रज्ञानाकडे मार्गक्रमित झाला असून आता कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे 'शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन' २२ जुलै रोजी साजरा करण्यात येणार असून शाश्वत ग्रामीण विकासासाठी दिनाचे महत्त्व आनन्यसाधारण आहे, असे महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.




पत्रकार परिषदेला आयोगाचे सदस्य डॉ. नितीन मार्कंडेय, सदस्य संजय भोसले, सदस्य सचिव डॉ. मंजुषा पुंडलिक आदी उपस्थित होते.

शेखर मुंदडा म्हणाले, महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या केंद्रस्थानी राज्यातील नोंदणीकृत ९५० गोशाळा आणि पशुपालकाच्या दारात असणारा अंदाजे सव्वा कोटी देशी गोवंश असल्याने सर्वंकष विकासासाठी योजना आणि अंमलबजावणी करण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या पशुगणनेच्या संख्यात्मक बाबी उपलब्ध होताच देशी गोवंश विकास आणि वर्गीकृत स्थानिक गोवंशाचा शुद्ध देशी गोवंशाबाबत परिवर्तनासाठी प्रयास केला जाणार आहे. राज्यातील गोवंश जनमानसात राज्यमाता म्हणून पूर्वापार वसलेला असला तरी शासनाच्या अधिकृत घोषणेमुळे त्याचा सांभाळ आणि विकास अधिक उत्कृष्टपणे घडून येणार आहे.

सर्व शुद्ध देशी गोवंशाचा सन्मान - डॉ. नितीन मार्कंडेय

डॉ. नितीन मार्कंडेय म्हणाले, राज्याच्या शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिनात देशातील नामवंत आणि राज्यात हौसेने सांभाळल्या जाणाऱ्या सर्व शुद्ध देशी गोवंशाचा सन्मान अपेक्षित असून राज्यातील स्थानिक गोवंश हा नेहमी अधिक उपयुक्त असतो आणि त्याचा ग्रामीण भागात जास्त फायदेशीर उपयोग करून घेतला जातो याबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यात येत आहे. २१ व्या शतकाच्या विज्ञान युगात शास्त्रीय धोरणात राज्यातील देशी गोवंश संवर्धनाचा विचार अधिक दृढपणे रुजला जावा, यासाठीच शासनाने शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिनाची प्रेरणा दिली आहे.

नवीन विकसित भारतात शुद्ध देशी गोवंशाची बीजे रोवण्याचे कार्य गेल्या पंचवीस वर्षात प्राधान्याने हाती घेण्यात आले आहे. यातूनच शुद्ध देशी गोवंशाच्या समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण शासन धोरण आखण्यात येत आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाची स्थापना २००३ हे शुद्ध गोवंश जतन आणि संवर्धनाचे पहिले पाऊल समजण्यात येते. शुद्ध देशी गोवंशाच्या सांभाळातून गो आधारित सेंद्रिय शेतीचे धोरण ग्रामीण भागात स्वीकृत झाल्यानंतर राज्यातील स्थानिक असणाऱ्या शुद्ध गोवंशाच्या पाच जाती म्हणजे खिलार, देवणी, लाल कंधार, डांगी आणि गवळवू यात केंद्र शासनाच्या नियमावलीप्रमाणे गेल्या काही वर्षात कोकण कपिला आणि कठाणी गोवंशाची भर पडली आहे. राज्यातील शुद्ध देशी गोवंश संख्यात्मक आणि गुणात्मक स्वरूपात समृद्ध होण्यासाठी राज्य शासनाचा पशुसंवर्धन विभाग आणि प्रामुख्याने महाराष्ट्र गोसेवा आयोग सरसावला आहे.



> राज्यातील चारही कृषी विद्यापीठे आणि पशुवैद्यक विद्यापीठ तसेच देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र यांच्या शास्त्रीय शिफारसी गोशाळांसाठी मार्गदर्शक ठरतील अशी पद्धती राबविण्यात येत आहे. देशी शुद्ध गोवंश उपयुक्त ठरण्यासाठी गतवर्षी राज्यात ३०० हून अधिक ठिकाणी गो आधारित सेंद्रिय शेतीची शिबिरे आयोजित करून शेतकरी पशुपालकांचे प्रबोधन करण्यात आले आहे.
> **-शेखर मुंदडा;** अध्यक्ष, महाराष्ट्र गोसेवा आयोग

# घोटाळेबाज मास्तरांचाच 'वरचष्मा'...!

## 'टीईटी'त घोटाळा: तरीही भरतीत सक्रीय; प्रामाणिक नाराज

राज्यात शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) घोटाळ्यात सहभागी झालेल्या काही उमेदवारांनी पुन्हा एकदा शिक्षक भरती प्रक्रियेत प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू असलेल्या भरती प्रक्रियेत त्यांनी सहभागी होत नोकरीसाठी अर्ज सादर केले असून, त्यापैकी काहींना नियुक्त्याही मिळाल्याची माहिती पुढे येत आहे. यामुळे प्रामाणिकपणे परीक्षा दिलेल्या आणि पात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. घोटाळेबाज मास्तरांचा हा कारनामा सुरु असतानाच त्यांचा भरतीत सक्रीय सहभाग असून त्यामुळे प्रामाणिक शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे; त्याची गंभीर दखल घेऊन त्यामध्ये शासन आणि प्रशासनानेच थेट हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

> शिक्षण क्षेत्र हे आतापर्यंत नेहमीच प्रामाणिक क्षेत्र समजले जात आहे, परंतु या पवित्र पोर्टलला काळीमा फासण्याचे महापाप काही उमेदवारांनी केले आहे. त्यामुळे समाजाचा आमच्याकडे पाहाण्याचाही दृष्टीकोन बदलला आहे, तरीही हे उमेदवार उजळ माथ्याने फिरत असून भरती प्रक्रियेतही सहभाग घेत आहेत. ही निश्चितच लाजीरवाणी बाब आहे; त्यामुळे त्यामध्ये शासन आणि प्रशासनाने हस्तक्षेप करुन या घोटाळेबाजांना धडा शिकविण्याची आवश्यकता आहे.
> **-एक उमेदवार,** पुणे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टीईटी परीक्षा आणि शिक्षक अभियोग्यता चाचणी या दोन्ही परीक्षा शिक्षक म्हणून नेमणुकीसाठी अनिवार्य करण्यात आल्या आहेत. २०१२ नंतर नियुक्त झालेल्या सर्व शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. मात्र, २०१८ ते २०२० या कालावधीत झालेल्या टीईटी परीक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले. अनेक अपात्र उमेदवारांनी आर्थिक व्यवहाराच्या बदल्यात गुण वाढवून घेतले, तर काहींनी बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे पात्रतेचा दावा केला.

या प्रकरणांमध्ये पोलिसांनी अनेकांवर गुन्हे दाखल केले असून, दोषी उमेदवारांना पुढील परीक्षा देण्यास बंदी घालण्यात आली. सेवेत असलेल्या काही शिक्षकांना बडतर्फ करण्यात आले. मात्र, काहींनी न्यायालयाचा आधार घेत कारवाईला स्थगिती मिळवली, तर काहींनी गुन्हे सिद्ध झाले नसल्याचा दावा करत भरती प्रक्रियेत पुन्हा प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न सुरूच ठेवले.

### पुणे महापालिकेने घेतली दक्षता

● पवित्र पोर्टलद्वारे पुणे महापालिकेच्या शाळांमध्ये आठ शिक्षकांची निवड झालेली असली, तरी महापालिकेने अद्याप त्यांना रुजू करून घेतलेले नाही. शिक्षण विभागाने यासंदर्भात शालेय शिक्षण संचालनालयाकडे मार्गदर्शन मागवले असून, शासनाकडून स्पष्ट निर्देश येईपर्यंत नियुक्ती प्रक्रिया थांबवण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर प्रामाणिक उमेदवार आणि शिक्षण क्षेत्रातील जाणकारांनी सरकारकडून कठोर पावले उचलण्याची मागणी केली आहे. परीक्षांमध्ये पारदर्शकता राखणे आणि दोषींवर ठोस कारवाई करणे ही शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेसाठी अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

सध्या राज्यभरात सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत अशा सुमारे ३० उमेदवारांचा सहभाग उघडकीस आला आहे. विशेषतः पुणे आणि सोलापूर जिल्हा परिषदेतील भरतीत काही घोटाळ्यातील उमेदवारांनी नियुक्त्या मिळवल्याची माहिती समोर आली आहे. काही अधिकाऱ्यांनी या नियुक्त्यांना विरोध दर्शविला होता, मात्र त्याची दखल न घेता नियुक्त्या मंजूर केल्या गेल्याचे बोलले जात आहे.

# सीईटी परीक्षा आता वर्षातून दोनदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांतील प्रवेशप्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता सीईटी (सामाईक प्रवेश परीक्षा) वर्षातून दोन वेळा घेण्यात येणार असून, यासाठी राज्यभरात सीईटी सेलची स्वतःची परीक्षा केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.



राज्यात अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी, आयटीआय आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी एकूण १९ प्रवेश परीक्षा सीईटी सेलमार्फत घेतल्या जातात. सध्या ही परीक्षा खासगी संस्था व डिजिटल प्रशिक्षण केंद्रांकडून भाडेतत्त्वावर घेतली जात असून, त्यात अनेक वेळा तांत्रिक अडचणी, उपकरणांचा अभाव आणि व्यवस्थापनातील त्रुटी समोर येतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

**स्थायी केंद्रांसाठी नियोजन सुरू**

ही अडचण दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थ्यांची संख्या व तांत्रिक गरजांचे विश्लेषण करण्यात येत आहे. त्यानुसार परीक्षा केंद्रांची संख्या आणि ठिकाणे निश्चित केली जातील. पुढील शैक्षणिक वर्षापासून ही केंद्रे कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट असून, त्यामुळे परीक्षेतील अडथळे कमी होतील आणि विद्यार्थ्यांचा अनुभव अधिक सकारात्मक होईल.

**राष्ट्रीय परीक्षांच्या धर्तीवर निर्णय**

देशपातळीवर आयआयटी, एनआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेशासाठी 'जेईई मेन' परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही सीईटी वर्षातून दोनदा घेण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध होतील आणि स्पर्धात्मक तयारीसाठी पुरेसा वेळ मिळेल.

**राज्याबाहेरील केंद्रे बंद होणार**

सीईटी सेलने पुढील वर्षांपासून राज्याबाहेरील परीक्षा केंद्रे बंद करण्याचा निर्णयही घेतला आहे. त्यामुळे परीक्षा व्यवस्थापन अधिक केंद्रीकृत व नियोजित होणार असून, सीईटी प्रणाली अधिक सक्षम व विद्यार्थीहिताची बनेल, असा विभागाचा विश्वास आहे.

# वाडा संस्कृती ही आपली व भारताची संस्कृती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकत्र येऊन चांगले व विधायक काम करावे, एकमेकांची सुख, दुःख वाटली जावी, हा विचार आज हरवला आहे. आपला सगळा वेळ भांडण्यात जातो. वाडा संस्कृती आजच्या पिढीला माहीत नाही. वाडा संस्कृतीत सुख आणि दुःखात देखील सगळे सोबत असायचे. वाडा संस्कृती ही आपली व भारताची संस्कृती होती. आपण श्रीमंत झालो आणि फ्लॅट मध्ये जाताना आपली संस्कृती, प्रेम, जिव्हाळा या गोष्टी देऊन टाकल्या. वाडा पडताना त्या सगळ्या भावना पडल्या. असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई यांनी व्यक्त केले.

किरण सोशल फाउंडेशनच्या वतीने प्रथम वर्धापनदिनानिमित्त सामाजिक संस्थांचा गौरव आणि विद्यार्थी शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर व डॉ.मिलिंद भोई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. फाऊंडेशनचे अध्यक्ष विपुल म्हैसूरकर, उपाध्यक्ष रविंद्र सरवदे, ऋचा देशपांडे, सुशांत बरकडे, दीपाली पाटील, निलेश कुलकर्णी, अतुल धुमाळ, संतोष ठाकूर, अजिंक्य देशपांडे, स्वप्ना म्हैसूरकर, सौरभ गंधे, रेणुका सरवदे, अमोल नागटिळक,पूजा बरकडे,चेतन पानसरे, अमोल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



**पुणे** किरण सोशल फाउंडेशनच्या वतीने प्रथम वर्धापनदिनानिमित्त सामाजिक संस्थांचा गौरव आणि विद्यार्थी शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमाचे आयोजन धायरी फाटा येथील सिल्व्हर पेटल्स हॉल येथे करण्यात आले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई यांच्या हस्ते विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

# स्त्रियांनी सक्षमपणे घर सांभाळल्याने पुरुषांना वैभव : डॉ.ढेरे




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'सावळागा गं रामचंद्र, त्याचे अनुज हे तीन, माझ्या भाग्याच्या ओविचे हे चार अखंड चरण...' या ओविंप्रमाणे भारतातील सोशिक, सात्विक परंपरेतील स्त्रिया कशाचाही विचार न करता आपले घर, परिवार उचलून धरतात. स्व. उर्मिलाताई कराड त्यातीलच एक होत्या. पूर्वीच्या काळात आमच्या बायका निरक्षर असतील पण परंतू त्या बुद्धिमान, प्रतिभावान होत्या. त्यांनी परिवारासाठी असंख्य गोष्टींचा त्याग करत आपला संसार मोठा केला. त्यामुळे, पुरुष स्वप्नपूर्तीसाठी घराबाहेर पडत असताना स्त्रियांनी सक्षमपणे घर सांभाळल्यामुळे पुरुषांना वैभव प्राप्त झाले, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अरुणा ढेरे यांनी मांडले.

त्या एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या उर्मिलाताई कराड सभागृहाच्या अनावरण कार्यक्रमाप्रसंगी बोलत होत्या.

या प्रसंगी माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, भारतीय सिने पत्रकार पद्मश्री भावना सोमाया, सुप्रसिद्ध लेखक व कवी इंद्रजीत भालेराव, तुळशीराम कराड, काशीराम कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ.मंगेश कराड, ज्योती अ.ढाकणे, डॉ. सुचित्रा उ.नागरे, पुनम आ. नागरगोजे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., आदी उपस्थित होते.

ढेरे पुढे म्हणाल्या, स्व. उर्मिलाताईंची अनेकदा कवयित्री शांताबाई शेळके यांच्या घरी, आळंदीत भेट झाली. त्यांनी लिहिलेल्या काव्यसंग्रहांमध्ये मातृत्व, वात्सल्य, वारकरी परंपरेचे संस्कार प्रतिबिंबित होतात.



> स्व.उर्मिला काकी या एक त्यागमुर्ती होत्या. त्यांनी परिवारासाठी केलेल्या त्यागामुळेच आम्ही सर्व भावंड खऱ्याअर्थाने घडलो. त्यांच्या त्याग आणि आशिर्वादामुळेच आज कराड कुटुंबाची भरभराट झाली आहे. त्यांनी घर सांभाळत असताना तब्बल ९ पुस्तकांचे लेखन केले. त्यांचे कार्य या सभागृहमुळे भावी पिढीला कळत राहील.
> **-डॉ.मंगेश कराड;** कार्याध्यक्ष; एमआयटी एडीटी विद्यापीठ




## एनव्हायर्नमेंटल क्लबचे पुरस्कार जाहीर

**पुणे :** एनव्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या वतीने पर्यावरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दिले जाणारे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्काराचे वितरण शुक्रवार दिनांक २५ जुलैरोजी ,सकाळी ११वाजता, भांडारकर प्राच्यविद्या संस्था, लॉ कॉलेज रोड, पुणे येथे केले जाणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धेश कदम (अध्यक्ष,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ),राजेंद्र मिरजे (उपाध्यक्ष,विश्वेश्वर सहकारी बँक.लि,पुणे) यांच्या सह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती क्लबचे अध्यक्ष आमोद घमंडे, सचिव गणेश शिरोडे आणि खजिनदार सचिन पाटील यांनी दिली. यावर्षी कोल्हापूर,शिरोळ येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि तालुक्यातील क्षारपड जमिनीला सुपीक बनविण्यासाठी अथक प्रयत्न करणारे आप्पासाहेब उर्फ गणपतराव पाटील 'पर्यावरण जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.यावर्षीचा 'पर्यावरण भूषण' पुरस्कार पद्मश्री प्रा. डॉ. जी डी यादव यांना देण्यात येणार आहे.

## 'म्हणती ज्ञानदेव' कार्यक्रम शनिवारी

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाउंडेशन यांच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत 'गोल्डन मेमरीज' प्रस्तुत 'म्हणती ज्ञानदेव' हा कार्यक्रम शनिवार,दि.२६ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनच्या सरदार महादेव बळवंत नातू सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ७५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून, काही लोकप्रिय व नव्या रचनांसह अभिवाचन आणि गायनाचे अनोखे सादरीकरण रसिकांना अनुभवता येणार आहे.या कार्यक्रमात लेखक आणि अभिवाचनकर्ते म्हणून मयूर भावे सहभागी होणार असून, चैत्राली अभ्यंकर गायन करणार आहेत.मिलिंद गुणे (संवादिनी), राजेंद्र हसबनीस (तबला), उद्धव कुंभार (तालवाद्य) आणि तुषार दीक्षित (कीबोर्ड) हे साथसंगत करणार आहेत. भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाउंडेशन यांच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत आयोजित हा २५४ वा कार्यक्रम आहे.प्रवेश सर्वांसाठी खुला असल्याची माहिती भारतीय विद्या भवन चे सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी दिली.

## शासकीय रेखाकला परीक्षा सप्टेंबरमध्ये होणार

**पुणे :** महाराष्ट्र राज्यातील एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा २०२५ या वर्षी २४ ते २७ सप्टेंबरदरम्यान पार पडणार आहेत. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे यांनी ही माहिती दिली.

यंदापासून ही परीक्षा कला शिक्षण मंडळाकडून घेतली जाणार आहे. यापूर्वी कला संचालनालयामार्फत परीक्षा घेतल्या जात होत्या. मात्र, "महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम २०२३" लागू झाल्यामुळे परीक्षेचे संपूर्ण अधिकार आता नव्या मंडळाकडे देण्यात आले आहेत.सर्व नोंदणी प्रक्रिया आणि परीक्षा शुल्क भरणे www.msbae.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने करावे लागेल.

विद्यार्थ्यांची नावनोंदणी करताना फक्त एकाच परीक्षेसाठी (एलिमेंटरी अथवा इंटरमिजिएट) अर्ज सादर करावा आणि नोंदणी शाळेच्या सामान्य नावनोंदवहीतील तपशीलांप्रमाणे अचूक असावी, असे मंडळाने स्पष्ट केले आहे.



## रायसोनी महाविद्यालयात सक्षमीकरण कार्यशाळा

**पुणे :** महिलांच्या सुरक्षेसाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत आणि हे कायदे अत्यंत महत्त्वाचे आहेत. मात्र, त्यांचा गैरवापर टाळला पाहिजे. कायद्याचा उपयोग महिलांचे हित साधण्यासाठीच व्हावा, अन्यायकारक हेतूंसाठी होऊ नये, असे प्रतिपादन माजी जिल्हा आणि सत्र न्यायाधीश स्मिता कडू यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि जी एच रायसोनी कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स वाघोली पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत आयोजित महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. हरिश्चंद्र कुलकर्णी, विद्यार्थी गृह अभियांत्रिकी महाविद्यालयच्या पुणेच्या प्राध्यापिका प्रज्ञा कुलकर्णी, डॉ प्रविण जांगडे आदी उपस्थित होते.

## इनरव्हील डिस्ट्रीक्ट ३१३ च्या प्रांतपालपदी डॉ.आशा देशपांडे

**पुणे :** सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या इनरव्हील डिस्ट्रीक्ट ३१३ च्या प्रांतपालपदी डॉ आशा देशपांडे यांची निवड करण्यात आली. मावळत्या प्रांतपाल डॉ.शोभना पालेकर यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्विकारली. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या माजी पास्ट इंटरनॅशनल इनरव्हील रिप्रेझेंटिव्ह चारू चिंचणकर, या समारंभाच्या कन्व्हेनर माजी प्रांतपाल सुनंदा हुल्याळकर, को कन्व्हेनर माजी अध्यक्ष श्रृणाली आपटे, संयोजक इनरव्हील पुणे अध्यक्ष माधवी पुरोहित,सचिव सुजाता जयवंत,ज्येष्ठ उद्योजक फतेचंद रांका आदी उपस्थित होते.





## श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा मासिक मेळावा उत्साहात

**पिंपळे सौदागर :** श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा मासिक मेळावा उत्साहात संपन्न झाला.नुकताच बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणाच्या परिसरात झालेल्या या मेळाव्याचा प्रारंभ निवृत्त जिल्हा न्यायाधीश कालीदास नांदेडकर तसेच प्रकाश जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या पुजनाने करण्यात आला. त्यानंतर शशांक खांडेकर, शशिकांत कुलकर्णी, सुरेंद्र पागेदार, शैलजा लोकरस, अनिल कुलकर्णी, अनघा वडनेरकर, माधुरी मुलमुले, स्नेहा चिंचवडकर, सुरेखा कुलकर्णी यांनी मराठी - हिंदी गाणी सादर केली. संस्थेचे ज्येष्ठ सदस्य प्रकाश मोदी यांनी यावेळी भविष्यकाळात संस्थेची प्रगती आणि शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरची वारी केल्याबद्दल रमेश भट, अनुराधा निलेगावकर आणि संतोष वर्तक, वासंती वर्तक यांना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यात स्वच्छ भारत अभियानांतर्गत पिंपरी चिंचवडने देशात सातव्या तर राज्यात प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि विविध पक्षांचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे अभिनंदन केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश भट यांनी केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी स्नेहा चिंचवडकर यांनी सांभाळली .

## खेळामुळे सर्वांगीण विकास होतो- बांगर



**पिंपरी :** निगडी येथील सीएमएस हायर सेकंडरी स्कुलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेचे उदघाटन प्रशाकीय अधिकारी संगीता बांगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहा. पो. आयुक्त (निवृत्त) बॅडमिंटन खेळाडू मनोहर जोशी, सीएमएस चे अध्यक्ष टी.पी विजयन, सरचिटणीस सुधीर नायर,खजिनदार पी. अजय कुमार, कलावेदी प्रमुख पी.व्ही भास्कर, व्हीके रामकृष्णन, जी.एस नायर, मुख्याध्यापिका बीजी गोपकुमार, चैताली लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बांगर म्हणाल्या कि, आपल्या आयुष्यात जगत असताना आपल्याला शारीरिक, सामाजिक, भावनिक, आणि शैक्षणिक सुधारणा होत असतात. खेळामुळे सर्वांगीण विकास होत जातो. खेळाडूला स्पर्धेमध्ये समोरच्या विरोधकाची पुढची चाल आधीच लक्षात घेऊन त्यावरती आपलं कौशल्य दाखवून खेळायचं असतं. स्पर्धेमध्ये खेळाची भावना असावी म्हणजे जेव्हा खेळ चालू व्हायच्या आधी आपण विरोधकाचा हस्त आंदोलन करतो तसेच खेळ संपल्यानंतर पराभव झाल्यानंतर सुद्धा जिंकलेल्याचं अभिनंदन करतो यामध्ये खेळाची भावना जोपासली जाते. या स्पर्धेत ३६ शाळांतील १५६ खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेसाठी क्रिडा शिक्षक सोनाली पवार, सुजाता गायकवाड, हरिहरण श्रीधरण यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याला कठोर शिक्षा व्हावी : पाडुळे



**पिंपरी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर फेसबुकच्या माध्यमातून खालच्या पातळीवर असभ्य भाषेत सुनील उभे नावाच्या व्यक्तीने कमेंट व पोस्ट केली होती. या प्रकरणी त्याला काल पर्वती पोलीस स्टेशनमध्ये अटक करण्यात आली असून त्याला कठोर शिक्षा व्हावी यासाठी आज पिंपरीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्या समोर निषेध आंदोलन करण्यात आले. या नराधमला जास्तीत जास्त कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी पुण्यश्लोक राजमाता प्रतिष्ठानचे अध्यक्ष व राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे सर यांनी केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी हे समस्त धनगर बांधवांचे श्रद्धास्थान आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर या केवळ एक शासिका नव्हत्या, तर त्या धर्म, न्याय, सेवा, त्याग आणि मातृत्व यांचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. त्यांच्या कार्याचा आदर्श आजही अनेक प्रशासक व नागरिक घेतात. त्यांच्या जीवनातून मिळणारी प्रेरणा ही काळाच्या पलीकडची आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना इतिहासात 'पुण्यश्लोक' व 'राजमाता' ही उपाधी आदराने दिली गेली.

## देहूरोड सेंट्रल चौकात वीकेंडला कोंडी

**देहूरोड :** मावळ, पिंपरी-चिंचवड, हिंजवडी आयटी पार्क आणि पुण्याला जाण्याच्या दृष्टीने देहूरोड सेंट्रल चौक महत्त्वाचा आहे. मात्र, चौकात वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. जुना पुणे-मुंबई महामार्गावर शनिवार आणि रविवारी तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. सेंट्रल चौकात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. काही पावलांवर पोलिस ठाणे असूनही चौकात वाहतूक पोलिसांची कमतरता असते. त्यात बेशिस्त वाहतुकीमुळे कोंडी होते. परिणामी, वाहनचालकांना इच्छित स्थळी पोहोचण्यास उशीर होतो. बहुतांश वेळा रुग्णवाहिकांनाही याचा फटका बसतो.

# स्वच्छता मोहिमेस विशालनगरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** विशाल नगर डीपी रोड येथे आज विशाल नगर रेसिडेंट्स असोसिएशन (VNRA), पिंपरी-चिंचवड महापालिकेचा आरोग्य विभाग आणि पिंपळवन निसर्गसंवर्धन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

नुकत्याच पार पडलेल्या स्वच्छ सर्वेक्षणात पिंपरी-चिंचवड महापालिकेला राज्यात प्रथम क्रमांक मिळाल्याने नागरिकांमध्ये आनंद आणि समाधान व्यक्त होत आहे. या यशामध्ये नागरिकांच्या सक्रीय सहभागातून राबवले जाणारे उपक्रम महत्वाची भूमिका बजावत आहेत, यावर सर्वांनी एकमत व्यक्त केले.

स्वच्छतेसाठी लोकसहभाग वाढावा या उद्देशाने राबवलेल्या या उपक्रमात २५ हून अधिक सोसायट्यांचे रहिवासी सहभागी झाले, तर १०० पेक्षा अधिक स्वयंसेवकांनी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसह परिसरातील रस्ते, आणि सार्वजनिक जागा स्वच्छ केल्या.

> "स्वच्छता ही केवळ महापालिकेची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाने स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे. जर अशा उपक्रमांची अंमलबजावणी प्रत्येक प्रभागात झाली, तर आमच्या कर्मचाऱ्यांनाही कामासाठी उत्साह मिळतो, आणि नागरिकांनाही त्यांच्या योगदानाचे महत्त्व कळते."
> **-डॉ. राखी माने,** आरोग्य विभाग अधिकारी

# डीपीवरून पदाधिकाऱ्यांमध्ये मतमतांतरे





> महापालिकेने आकांक्षा फाउंडेशन सामाजिक दायित्वाची शाळा चालवण्यासाठी दिल्या होत्या, मात्र आता निविदा पद्धतीने शाळा चालवणे चुकीचे आहे. याबाबत त्यांना पत्र दिले गेले आहे. शाळा खासगीकरणाचा निर्णय चुकीचा आहे आणि त्याला विरोध कायम राहील.
> **-अमित गोरखे**



> शहरातील अंतर्गत रस्ते ७.५, ९ व १२ मीटर रूंद आहेत. शहर झपाट्याने वाढत असून, सध्या ३५ लाख लोकसंख्या आहे. येत्या २० वर्षांत लोकसंख्या एक कोटीपर्यंत पोहोचेल. त्यामुळे शहराचा नियोजनबद्धरीत्या विकास होण्यासाठी डीपी आवश्यक आहे. अंतर्गत प्रशस्त रस्ते होणे सुरळीत वाहतुकीसाठी अत्यावश्यक आहेत.
> **-शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचा प्रारूप सुधारित विकास योजना आराखडा (डीपी) हा चुकीचा असून, तो रद्द करावा, अशी थेट मागणी विधिमंडळ अधिवेशनात लक्षवेधी मांडून केली. त्या मतावर मी अद्याप ठाम असून, त्याबाबत मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा सुरू आहे, असे भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

मात्र, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी झपाट्याने वाढणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी डीपी गरजेचा असून, तो लागू करावा, असे मते मांडले आहे. त्यामुळे भाजपमध्ये डीपीबाबत एकमत नसून, त्याबाबत सोईस्कररीत्या दोन वेगवेगळ्या भूमिका असल्याचे समोर आले आहे

भाजपच्या आमदारांनी डीपी रद्द करण्याची मागणी केली आहे. मात्र, वाढत्या शहरासाठी डीपी गरजेचा आहे. रिव्हर फ्रंट, पार्किंग, एसटीपीची आरक्षणे आवश्यक आहेत. नगरसेवक नसताना प्रशासकीय राजवटीत डीपी तयार करण्यात आला आहे, हे मान्य आहे. कार्यालयात बसून गुगल मॅपद्वारे डीपी बनवला हा आरोप चुकीचा आहे. जाहीर केलेला डीपी प्रारूप आहे. पन्नास हजार नागरिकांची डीपीबाबत वेगवेगळी भूमिका आहे. नागरिकांनी दिलेल्या हरकतीनुसार त्यात बदल करून पुन्हा डीपी प्रसिद्ध केला जाईल. ज्या ठिकाणी घरांवर रस्त्याचे आरक्षण पडले आहेत, ते आरक्षण रद्द केले जावे. संपूर्ण डीपी रद्द करून काही मिळणार नाही. आरक्षणांतील लोकांची घरे वाचवली जातील. अन्याय दूर करू. डीपीबाबत भाजपच्या दोन वेगवेगळ्या भूमिका नाहीत, असा दावाही त्यांनी केला आहे.

### अनेक चुकीची आरक्षणे

- महापालिकेच्या डीपीवर तब्बल ५० हजार सूचना व हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. डीपी बिल्डरधार्जिणा असून, त्यांच्या सोईसाठी तो तयार करण्यात आला आहे.
- सर्वसामान्य नागरिकांच्या घरांवरून रस्त्यांची आरक्षणे टाकण्यात आली आहेत. पिंपरी कॅम्प मार्केटमध्ये प्रशस्त रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत.
- पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर मोकळ्या जागेत चुकीचे आरक्षण टाकले आहे. तेथे माता रमाई स्मारकाचे आरक्षण हवे.
- डीपीत चुकीचे असंख्य आरक्षणे आहेत. त्यामुळे डीपीच रद्द करावा, अशी आग्रही मागणी अधिवेशनात केली. त्यासंदर्भात मुख्यमंत्री स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय घेणार आहेत. त्यासंदर्भात पाठपुरावा केला जात आहे.
- महापालिकेचा चुकीचा डीपी रद्दच व्हावा, अशी माझी भूमिका अद्याप कायम आहे. त्या दृष्टीने मी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करीत आहे, असे आमदार गोरखे यांनी सांगितले.
- पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते दापोडी आणि निगडी ते पिंपरी दरम्यानच्या अर्बन स्ट्रीटचे प्रकल्प रखडले आहेत. या कामांचे ऑडिट करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आहे.
- शहरातील विविध विकास प्रकल्पांमुळे बाधित झालेल्यांना पुनर्वसन, नोकरी, प्रशिक्षण व व्यवसायामध्ये प्राधान्य देणारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात यावे, याकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले.

# वाढदिवसानिमित्त 'महा रक्तदान शिबीर'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**भोसरी :** राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आज महा रक्तदान शिबीर दि. २२ जुलै २०२५ रोजी पिंपरी-चिंचवड शहरामध्ये विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदानाचा संकल्प करून विधायक उपक्रमाचा आदर्श नागरिकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी या निमित्ताने सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळी दहा ते सायंकाळी चार वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. यामध्ये युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात विविध विधायक उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये वृक्षारोपण दिव्यांग बांधवांना मदत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप यांसारख्या अनेक उपक्रमांचा समावेश आहे पिंपरी चिंचवड शहरांमध्ये रक्त संकलन करण्याचा उद्देश ठेवून मुख्यमंत्र्यांच्या वाढदिनी विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



> पावसाळा संपल्यानंतर जलजन्य आजारातून उद्भवणाऱ्या अनेक आजारांमुळे रक्ताची गरज पडते याशिवाय वाढते अपघात अनेक शस्त्रक्रिया यांसाठी देखील गरजूंना रक्ताची आवश्यकता भासते. अशावेळी रक्ताचा तुटवडा उद्भवू नये यासाठी अनेक संस्थांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर भरवण्याचा आम्ही प्रयत्न करत असतो. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयांमध्ये दररोज शेकडो रुग्ण शहर तसेच शहराच्या लगतच्या भागातून येत असतात. आर्थिक दुर्बल असणाऱ्या या घटकांना अनेकदा रक्ताची गरज भासते. त्यामुळे यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रक्त संकलन करण्याचा मानस आहे. हा संकल्प याही पुढे सुरू राहणार आहे.
> **— महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे

# अजितदादा पवार यांच्या वाढदिनी लक्षवेधी फलकबाजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्राच्या प्रगतीला गती देणारे, निर्णयक्षम नेतृत्वाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात "शब्द देतो नाही, पाळतो म्हणजे पाळतोच.. तत्पर कृती अजित नीती" अशा घोषवाक्यांनी सजलेले फलक झळकत आहेत.

या फलकांची संकल्पना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे कट्टर समर्थक उद्योजक अभयशेठ मांढरे मित्र परिवार असून, त्यांनी ही अभिनव शुभेच्छा मोहिम राबवली आहे. शहरातील प्रमुख चौकांमध्ये, महत्त्वाच्या रस्त्यांवर आणि सोशल मीडियावर हे फलक लक्षवेधी ठरत आहेत.

### शब्द नाही, कृती बोलते...

"शब्द देतो नाही, पाळतो म्हणजे पाळतोच.. तत्पर कृती अजित नीती" या घोषवाक्यांद्वारे अजित पवार यांची कार्यपद्धती अधोरेखित केली जात आहे. त्यांनी दिलेल्या आश्वासनांचे प्रत्यक्षात रूपांतर विकासकामांमध्ये झाले आहे. त्यांच्या प्रत्येक निर्णयामागे सामान्य नागरिकांचा विचार आणि राज्याच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय असते, हे या मोहिमेतून अधोरेखित करण्यात आले आहे.




# ११ कोटी ३६ लाखाच्या विकासकामांचे लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे शहरात रविवार, २० जुलै २०२५ रोजी एकूण ११ कोटी ३६ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. या कार्यक्रमात आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते विविध कामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले.

या उपक्रमांमुळे तळेगाव दाभाडे शहराच्या सर्वांगीण प्रगतीचा नवीन अध्याय सुरू झाला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, शैक्षणिक सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि पर्यावरणपूरक उपक्रम या सर्व क्षेत्रात संतुलित विकास साधण्याचा प्रयत्न या माध्यमातून दिसून येतो. या कार्यक्रमाला शहरातील अनेक मान्यवर नागरिक, सामाजिक संस्था, आजी-माजी लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, आणि विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





> तळेगाव दाभाडे शहरात आज जे विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण करण्यात आले, ती सगळी कामगिरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे शक्य झाली आहे. त्यांच्या पाठबळामुळे मावळ मतदारसंघात विकासाची गंगा वाहत आहे. अजून खूप काही घडायचं आहे. तळेगावच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव तत्पर राहू."तळेगावच्या विकासाची गती आता अधिक वेगाने आणि दिशादर्शक पद्धतीने वाढणार असल्याचे संकेत या कार्यक्रमातून मिळाले.
> **— सुनील शेळके**

### महत्त्वाची विकासकामे

- तळेगाव स्टेशन तळे येथे वॉटर ट्रीटमेंट प्लांट (WTP) च्या प्रकल्पाचे लोकार्पण
- संताजी नगर येथील कॉंक्रिट रस्त्याचे लोकार्पण
- आमराई हॉटेलसमोरील मुख्य रस्त्याचे भूमिपूजन
- लिंब फाटा ते मॅकडोनाल्ड समोरील सर्व्हिस रस्त्याचे भूमिपूजन
- सरसेनापती उमाबाई दाभाडे कन्याशाळेच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन
- शहरातील 'स्मार्ट' सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रकल्पाचे भूमिपूजन
- श्री डोळसनाथ मंदिर परिसराची प्रत्यक्ष पाहणी
- बनेश्वर स्मशानभूमीतील कॉंक्रिट रस्त्याची पाहणी
- नगरपरिषद पार्किंगसाठी आरक्षित जागेवर वृक्षारोपणाचा कार्यक्रम
- मोहोर प्रतिमा, एंजल हिल्स, संस्कृती सोसायटी, राव कॉलनी, म्हसकरनिस सोसायटी - या परिसरात थेट भेटी देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेणे

यावेळी नागरिकांनी आमदार सुनील शेळके यांच्याकडे थेट आपल्या अडचणी मांडल्या आणि सकारात्मक प्रतिसाद दिला.

संपादकीय विशेष

# स्वप्न साकारतेय वेगाने...

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकामातील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) ते शिळफाटा दरम्यान बांधण्यात येत असलेल्या बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत शिळफाटा येथून सुमारे 1.62 किलोमीटर उत्खनन झाले आहे. याशिवाय 'एनएटीएम' विभागातील एकूण प्रगती सुमारे 4.3 किलोमिटर आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवू नये, म्हणून व्यापक सुरक्षा उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. या सुरक्षा उपायांमध्ये 'ग्राउंड सेटलमेंट मार्कर', 'पायझोमीटर', 'इनक्लिनोमीटर', 'स्ट्रेन गेज' आणि 'बायोमेट्रिक ॲक्सेस कंट्रोल सिस्टीम'चा समावेश आहे. असे म्हटले जाते की यामुळे आजूबाजूच्या संरचनांना नुकसान होऊ न देता सुरक्षित आणि नियंत्रित बांधकाम सुनिश्चित केले जात आहे.

याबांधकामाबद्दल 'एनएचएसआरसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता म्हणाले, की आम्ही 21 किलोमीटरपैकी 2.7 किलोमीटरचे बांधकाम पूर्ण केले आहे. यानंतर बोगद्याच्या अस्तरीकरणाचे काम सुरू होईल. त्यानंतर आरसी ट्रॅक बेड टाकले जाईल आणि ट्रॅक बसवण्याचे काम त्वरित सुरू केले जाईल. पावसाळ्यानंतर लगेचच बुलेट ट्रेन प्रकल्पाचे महाराष्ट्र विभागातील काम जलद गतीने व्हावे आणि नियोजित वेळेनुसार पूर्ण व्हावे, असा आमचा प्रयत्न असेल. दुसरीकडे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी दमणगंगा नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत गुजरातमध्ये एकूण 21 पूल बांधले जाणार आहेत.



'एनएचएसआरसीएल'ने सोळा नदी पूल पूर्ण केले आहेत. वलसाड जिल्ह्यात असलेल्या पाच नदी पुलांपैकी पाचही पूल आता पूर्ण झाले आहेत. अहमदाबाद ते मुंबई या संपूर्ण कॉरिडॉरवर 25 नदी पूल बांधले जात आहेत. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन हा भारतातील 'पहिला हाय-स्पीड' रेल्वे प्रकल्प आहे. तो मुंबई आणि अहमदाबाद शहरांना जोडेल. हा 508 किलोमीटर लांबीचा मार्ग आहे. बुलेट ट्रेनचा कमाल वेग 320 किलोमीटर प्रति तास असेल.

वलसाड जिल्ह्यातील एमएएचएसआर मार्ग सुमारे 56 किलोमीटर लांब आहे. तो जरोली गावापासून सुरू होतो आणि वाघलदरा गावावर संपतो. या मार्गात वापी बुलेट ट्रेन स्टेशन, 350 मीटर लांबीचा बोगदा, पाच नदी पूल आणि एक पीएससी पूल (210 मीटर लांबीचा) यांचा समावेश आहे. वलसाडमध्ये पूर्ण झालेल्या पुलाची लांबी 360 मीटर आहे. त्यात नऊ पूर्ण स्पॅन गर्डर (प्रत्येकी 40 मीटर) समाविष्ट आहेत. हा पूल बोईसर आणि वापी बुलेट ट्रेन स्टेशन दरम्यान आहे. या दोन स्टेशनदरम्यान आणखी एक नदी पूल बांधण्याचे काम दारोठा नदीवर पूर्ण झाले आहे. ही नदी वापी बुलेट ट्रेन स्टेशनपासून एक किलोमीटर आणि बोईसर बुलेट ट्रेन स्टेशनपासून सुमारे 61 किलोमीटर अंतरावर आहे. वलसाड जिल्ह्यात इतरही नदी पूल पूर्ण झाले आहेत. दमणगंगा नदी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील वालवेरी गावाजवळील सह्याद्री टेकड्यांमधून उगम पावते. ती महाराष्ट्र, दादरा आणि नगर हवेली आणि दमणमधून सुमारे 131 किलोमीटर वाहते आणि अरबी समुद्रात विलीन होते. ही नदी सिंचनाचे स्रोत आहे. ही नदी पिण्यासाठी, सिंचनासाठी आणि औद्योगिक वापरासाठी पाण्याचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. वापी, दादरा आणि सिल्वासा सारखी औद्योगिक शहरे तिच्या काठावर आहेत. नदीवर बांधलेले मधुबन धरण हा एक प्रमुख जलसंपदा प्रकल्प आहे. त्याचा फायदा गुजरात, दादरा-नगर-हवेली आणि दमण-दीवला होतो.

रेल्वेमंत्र्यांनी सात जुलै रोजी सादर केलेल्या 2014-15 च्या रेल्वे अर्थसंकल्पात भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची घोषणा केली. यापूर्वी 'हाय स्पीड रेल कॉरिडॉर'चा प्रस्ताव बुलेट ट्रेन प्रकल्प म्हणून ओळखला जात होता. अर्थसंकल्पीय भाषणात मुख्य शहरांमधील प्रवास वेळ कमी करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट होते. गुजरातमध्ये मुंबई-अहमदाबाद रेल्वे कॉरिडॉरचे काम वेगाने झाले. महाराष्ट्रातले काम तुलनेने मंद होते; परंतु अलिकडेच या कामाला गती आली आहे.

कॉरिडॉरमध्ये बांधल्या जाणाऱ्या बारापैकी गुजरातमध्ये असलेल्या आठपैकी सहा स्थानकांवर स्ट्रक्चरल काम पूर्ण झाले आहे, तर महाराष्ट्रातील चारपैकी तीन उन्नत स्थानकांवर आणि मुंबईत भूमिगत स्थानकाचे काम सुरू आहे. महाराष्ट्रात 156 किलोमीटर ट्रॅक बांधण्यात आला आहे. रेल्वे स्थानक बांधल्या जात असलेल्या बारा शहरांपैकी मुंबई, ठाणे, विरार, बोईसर ही स्थानके महाराष्ट्रात असून गुजरातमध्ये वापी, बिलीमोरा, सुरत, भरूच, वडोदरा, आणंद, अहमदाबाद आणि साबरमती अशा स्थानकांचा समावेश आहे. मुंबई-अहमदाबाद 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' साठी शंभर टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि दादरा आणि नगर हवेली येथून एकूण 1389.49 हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. कोरोना काळामुळे आणि शेतकऱ्यांच्या विरोधामुळे संपादनास विलंब झाला.

प्रकल्पाअंतर्गत बहुतेक, म्हणजेच एकूण सुमारे 468 किलोमीटर उन्नत आहे. त्यामुळे भूसंपादनाची आवश्यकता कमी झाली. मुंबई-अहमदाबाद 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' प्रकल्पाची अंदाजित किंमत 1.08 लाख कोटी ते 1.65 लाख कोटी रुपयांच्या दरम्यान असल्याचे सांगितले जात आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे आठ तासांचा प्रवास दोन तासांमध्ये पूर्ण होईल असा दावा केला जात आहे. 'जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी' (जेआयसीए) ने या प्रकल्पासाठी 80 टक्के कर्ज दिले आहे. जपानमधून बरीच यंत्रसामग्री आयात केली जात आहे. भविष्यात हा 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' दिल्लीपर्यंत वाढवण्याची योजना आहे. त्याचा फायदा राजस्थान आणि हरियाणालाही होईल. मुंबई-अहमदाबाद मार्गावर चालवण्यात येणाऱ्या बुलेट ट्रेनची जपानमध्ये अंतिम चाचणीही झाली आहे. ती पुढील वर्षी भारतात आणली जाऊ शकते. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरू झाल्यानंतर भारतात लगेचच नवी दिल्ली-पाटणा, मुंबई-हैदराबाद आदी मार्गावरही बुलेट ट्रेन सुरू करण्याचे घाटत आहे. त्यापैकी मुंबई-हैदराबाद मार्गाची घोषणा पूर्वीच झाली आहे; परंतु या योजनेचे सर्वेक्षणच अजून झालेले नाही. मुंबई-नागपूर मार्गाचाही विचार केला जाऊ शकतो. आता नवी दिल्ली-पाटणा मार्गाची घोषणा झाली आहे. त्यानंतर मुंबई-चेन्नई, बेंगळुरू, कोलकत्ता आदी शहरांसाठीही बुलेट ट्रेनच्या घोषणा केल्या जाऊ शकतात.

# लक्झरी घरे, नोकऱ्यांचा बाजार तेजाळला

**बहुतेक अर्थक्षेत्रे अलिकडच्या काळात घुसळून निघत आहेत. त्यातल्या त्यात भाव खाणाऱ्या सोन्याची लकाकी कमी होणार असल्याची बातमी कान टवकारुन गेली. लक्झरी घरांच्या मागणीत वाढ झाली असल्याची बातमीही अशीच भुवया उंचावणारी. दरम्यान, सणासुदीच्या हंगामात नोकऱ्यांचा बाजार तेजीत आल्याची बातमी सुखवार्ता ठरावी. याखेरीज डिजिटल तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत मोठा बदल झाल्याचे समोर आले.**

अर्थनगरीमध्ये लक्षवेधी बातम्यांची रेलचेल पहायला मिळत आहे. सर्वच अर्थक्षेत्रे अलिकडच्या काळात घुसळून निघत आहेत. त्यातल्या त्यात भाव खाणाऱ्या सोन्याची लकाकी कमी होणार असल्याची बातमी कान टवकारुन गेली. लक्झरी घरांच्या मागणीत वाढ झाली असल्याची बातमीही अशीच भुवया उंचावणारी. दरम्यान, सणासुदीच्या हंगामात नोकऱ्यांचा बाजार तेजीत आल्याची बातमी सुखवार्ता ठरावी.डिजिटल तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत मोठा बदल

'वर्ल्ड गोल्ड काऊन्सिल'च्या एका रिपोर्टमध्ये जगातील राजनैतिक आणि व्यापारी जोखीम कमी झाल्यास नजिकच्या काळात सोन्याचे दर कमी होऊ शकतात, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. रिपोर्टमधील दाव्यानुसार अमेरिकन डॉलर आणि 'ट्रेझरी यील्ड'मध्ये वाढ झाल्यास सोन्याचे दर आणखी घसरू शकतात. केंद्रीय बँकांनी सोन्याची खरेदी केल्यास आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांची मागणी कमी झाल्यास सोन्याच्या दरावर परिणाम होऊ शकतो. अलिकडेच सोन्याचे दर 97 हजार 500 रुपये प्रति तोळा इतके होते. सध्या सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. 2025 मध्ये सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली. एक तोळे सोन्याचा दर 20 हजारांपेक्षा जास्त रुपयांनी वाढला तर चांदीच्या एक किलोचा दरदेखील 20 हजारांपेक्षा अधिक रुपयांनी वाढला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे गुंतवणुकीचा सुरक्षित पर्याय म्हणून अनेकजणांनी सोने खरेदी केली. 3 नोव्हेंबर 2022 ला सोन्याचा दर जागतिक बाजारात नीचांकी पातळीवर होता. त्या दिवशी सोन्याचे दर निचांकी पातळीवर म्हणजे 1429 अमेरिकन डॉलर प्रति औंस इतके होते. त्यामध्ये दुप्पट वाढ होऊन सध्या सोन्याचे दर 3287 अमेरिकन डॉलर प्रति औंस इतके झाले आहेत. म्हणजेच प्रति वर्ष 30 टक्के दरवाढ झाली आहे.

जगभरात केंद्रीय बँकांकडून मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केली जात आहे. याशिवाय विविध देशांमध्ये गेल्या काही महिन्यांमध्ये संघर्ष सुरू झाला आहे. टॅरिफसंदर्भातील ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांमुळे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्यातील गुंतवणूक वाढली आहे. केंद्रीय बँकांकडून व्याजदरात वाढ होत असल्याने नोव्हेंबर 2022 ते ऑगस्ट 2024 दरम्यानच्या महागाईच्या नकारात्मक प्रभावाला संपवले आहे. रिपोर्टनुसार सोन्याच्या दरात रेकॉर्डब्रेक किंमतवाढ झाल्याने गुंतवणूकदार सतर्क झाले आहेत. दर कमी झाले तर नुकसान होऊ शकते, असे गुंतवणूकदारांना वाटत आहे. 'वर्ल्ड गोल्ड काऊन्सिल'ने यापूर्वी सोन्याचे दर घटले तेव्हा काय घडले होते, याची माहिती घेत अभ्यास केला. त्यामध्ये काऊन्सिलला काही गोष्टी आढळल्या. त्या म्हणजे जगभरात राजनैतिक आणि व्यापारी स्थिती शांततेची असते तेव्हा सोन्याची मागणी कमी होते. याशिवाय अमेरिकन डॉलरची किंमत वाढते किंवा 'ट्रेझरी यील्ड'मध्ये वाढ होते तेव्हा सोन्यावर दबाव वाढतो. केंद्रीय बँका सोनेखरेदी कमी करतात, गुंतवणूकदारदेखील खरेदी कमी करतात, तेव्हा सोन्याचे दर कमी होतात.

आर्थिक

महेश देशपांडे

आर्थिक घडामोडींचे जाणकार

एकीकडे सामान्य माणूस महागाईबद्दल ओरडत असताना दुसरीकडे देशात आलिशान घरे मोठ्या प्रमाणात विकली जात आहेत. एका अहवालानुसार या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये भारतातील आलिशान हाऊसिंग सेगमेंटमध्ये 85 टक्क्यांनी वाढ झाली आहे. टॉप सात शहरांमध्ये या सेगमेंटमध्ये 7000 युनिट्स विकली गेली. भारतातील टॉप रिअल इस्टेट कन्सल्टिंग फर्म 'सीबीआरई साउथ एशिया प्रायव्हेट लिमिटेड' आणि 'असोचेम'च्या अहवालानुसार जानेवारी-जून दरम्यान दिल्ली-एनसीआर चार हजार लक्झरी युनिट्ससह विक्रीमध्ये आघाडीवर होते. गेल्या वर्षीपेक्षा ती तीनपट जास्त आहे. दुसरीकडे, मुंबईत गेल्या सहा महिन्यांमध्ये 1240 लक्झरी युनिट्स विकली गेली. हे प्रमाण एकूण लक्झरी विक्रीच्या 18 टक्के आहे. गेल्या वर्षीच्या याच सहा महिन्यांच्या तुलनेत यामध्ये 29 टक्क्यांनी वाढ झाली आहे.

चेन्नई आणि पुण्यात लक्झरी गृहनिर्माण क्षेत्रात फक्त पाच टक्के विक्री झाली. या वर्षी जानेवारी-जून दरम्यान 7300 लक्झरी युनिट्स लॉंच करण्यात आली. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात तीस टक्के वाढ होती. अशा परिस्थितीत विकासक गुणवत्ता, पारदर्शकता आणि अनुभवावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करत आहेत; जेणेकरून या शहरांमध्ये लक्झरी गृहनिर्माण खरेदी करण्याचा ट्रेंड तसाच राहील. 'सीबीआरई'चे कॅपिटल मार्केट्स अँड लँडचे व्यवस्थापकीय संचालक गौरवकुमार म्हणतात की सध्या मागणी आणि पुरवठा वाढला आहे. हे घर खरेदीदारांच्या पसंतीचे द्योतक आहे. अशा परिस्थितीत, भारत जागतिक आणि देशांतर्गत गुंतवणूकदारांसाठी एक बाजारपेठ म्हणून उदयाला येत आहे. भारताचा लक्झरी गृहनिर्माण बाजार उच्च निव्वळ मूल्य असलेल्या व्यक्तींना आकर्षित करत आहे. ते जागतिक अनिश्चिततेमध्ये सुरक्षित मालमत्तेत गुंतवणूक करू पहात असून अमेरिकन डॉलरच्या मजबूत असण्याचा फायदा घेऊ इच्छितात.

दरम्यान, भारतात सणासुदीचा हंगाम सुरू झाल्यामुळे नोकरीचा बाजारही तेजीत आला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी कंपन्या 20-25 टक्के जास्त कर्मचारी भरती करण्याची योजना आखत आहेत. बहुतेक भरती तात्पुरत्या असतील; पण यातून हजारो तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतील. 'अॅडेको इंडिया'या स्टाफिंग फर्मच्या मते, एक प्रमुख ई-कॉमर्स कंपनी 75 हजारांहून अधिक लोकांना कामावर ठेवण्याची तयारी करत आहे. ई-कॉमर्स आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात 30-35 टक्क्यांनी भरती वाढण्याची अपेक्षा आहे. रिटेल, ग्राहकोपयोगी वस्तू, हॉटेल आणि पर्यटन क्षेत्रेदेखील यामध्ये मागे नाहीत. सॅमसंग, शाओमी, ओप्पो, विवो, हायर आणि गोदरेजसारख्या कंपन्यादेखील आपल्या रिटेल स्टोअरमध्ये अधिक कर्मचारी भरती करण्याची योजना आखत आहेत. 'रँडस्टॅड इंडिया'च्या मते भारतात गिग कामगारांची म्हणजेच प्रकल्प-आधारित कामगारांची संख्या या वर्षी 1.1 कोटींपेक्षा जास्त असू शकते. 'क्विक कॉमर्स'मध्ये 35-40 टक्के आणि ई-कॉमर्समध्ये 25-30 टक्के भरती वाढू शकते. डिलिव्हरी, वेअरहाऊस, ग्राहक सेवा आणि डिजिटल सेवांमध्ये गिग कामगारांची सर्वाधिक मागणी आहे. भारतातील टेक स्टार्टअप्स पुन्हा एकदा वेग पकडत आहेत. भरती आणि निधीची अपेक्षा वाढत आहे. 'रँडस्टॅड'चे मुख्य व्यावसायिक अधिकारी यशब गिरी म्हणाले की कंपन्या सणासुदीच्या हंगामासाठी आगाऊ तयारी करत असून मोठ्या संख्येने तात्पुरते कर्मचारी जोडत आहेत. उन्हाळी हंगामात विक्री कमी झाल्यानंतर त्यांना या वेळी मागणीत वाढ होण्याची अपेक्षा आहे.

कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, 'एफएमसीजी आणि ऑटोमोबाईल्ससारख्या उत्पादनांच्या वार्षिक विक्रीपैकी 30-40 टक्के विक्री सणासुदीच्या काळात होते. यामुळेच कंपन्या दिवाळी आणि ख्रिसमसपर्यंत पुरेपूर फायदा घेऊ इच्छितात. 'अॅडेको इंडिया'चे संचालक दीपेश गुप्ता यांच्या मते या वेळी कंपन्यांना शेवटच्या टप्प्यातील डिलिव्हरी, ग्राहक सेवा आणि गोदामाच्या कामकाजासाठी मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. 'फ्लिपकार्ट'च्या उपाध्यक्ष आकृती चंद्रा म्हणाल्या, की कंपनीने पुरवठा साखळी आणि लॉजिस्टिक्समध्ये आधीच भरती सुरू केली आहे. या वेळी सण ऑगस्टपासून सुरू होत आहेत, म्हणून आम्ही कर्मचाऱ्यांची संख्या आधीच वाढवली आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. डिजिटल तंत्रज्ञानाने भारताच्या कर प्रणालीमध्ये पूर्ण बदल घडवून आणला आहे. त्यामुळे कर परतफेडीत 474 टक्के वाढ झाली आहे. अर्थ मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले, की गेल्या दहा वर्षांमध्ये भारताच्या करप्रणालीमध्ये मोठा बदल झाला आहे. कर परतफेडीचा वेग करवसुलीच्या तुलनेत सुमारे दुप्पट झाला आहे. 2013-14 ते 2024-25 दरम्यान करदात्यांना मिळालेल्या परताव्यामध्ये 474 टक्क्यांची प्रचंड वाढ झाली आहे. ही रक्कम 83,008 कोटी रुपयांवरून 4,76,743 कोटी रुपयांवर पोहोचली आहे. याच काळात एकूण प्रत्यक्ष करसंकलन 24 टक्क्यांनी वाढले आहे. ते 7,21,604 कोटी रुपयांवरून 27,02,974 कोटी रुपये झाले आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कर परतफेड प्रक्रियेची गतीदेखील लक्षणीयरीत्या सुधारली आहे. 2013 मध्ये, कर परतावा मिळण्यासाठी सरासरी 93 दिवस लागत होते. 2024 मध्ये हे प्रमाण 17 दिवसांवर आले आहे. ते 81 टक्क्यांची घट दर्शवते. डिजिटल आधुनिकीकरणाच्या यशाचा तो पुरावा आहे. या बदलामागील कारण म्हणजे करप्रक्रियेचे संपूर्ण डिजिटलायझेशन, ऑनलाइन फाइलिंग सिस्टीम, अपॉइंटमेंटलेस असेसमेंट आणि ऑटोमेटेड कर परतावा प्रक्रियेमुळे करदात्यांना सेवांमध्ये विलंब होणारे जुने अडथळे दूर झाले आहेत. करदात्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. 2013 मध्ये 3.8 कोटी प्राप्तिकर विवरणपत्रे दाखल झाली होती, तर 2024 मध्ये ही संख्या 8.89 कोटी झाली आहे. ही 133 टक्के वाढ आहे. लोक आता अधिक स्वेच्छेने कर भरत आहेत आणि आगाऊ कर भरण्याची व्यवस्थादेखील मजबूत होत आहे, हे दर्शवते.

खेचाखेची

## पुणे तिथे काय उणे

इंग्रजीच्या तासाला गुरुजींनी Knowledge मध्ये K चा उच्चार होत नाही, Psychology मध्ये P चा उच्चार होत नाही, ते सायलेंट असतात, असं शिकवलं. नंतर इतिहासाच्या तासात सरांनी पुण्याची महती सांगितली. शेवटी एका विद्यार्थ्याला प्रश्न केला, सांग बरं, पुणे तिथे काय उणे, असं का म्हणतात?

एक चुणचुणीत मुलगा म्हणाला, कारण PUNE मधला P सायलेंट आहे... !!!

वेगळं काही

सॅन फ्रान्सिस्को, सॅन माटियो आणि आसपास राहणाऱ्या चौकोनी कुटुंबाचं उत्पन्न ८० लाख रूपये असलं तर हे कुटुंब निम्न उत्पन्न गटात मोडतं. ५० लाख रूपये उत्पन्न असलेलं कुटुंब गरीब गटात मोडतं. अमेरिकेतल्या दोन तृतियांश कुटुंबाची कमाई सॅन फ्रान्सिस्कोतल्या ८० लाख रूपये कमावणाऱ्या कुटुंबापेक्षा कमी आहे. अमेरिकेत चार जणांच्या कुटुंबाचं सरासरी उत्पन्न ६२ लाख रूपये आहे. तर त्यापेक्षा जास्त सदस्य असलेल्या कुटुंबाची सरासरी कमाई ४१ लाख रूपये आहे. अमेरिकेत तब्बल चार कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत. सॅन फ्रान्सिस्कोमध्ये आयटी आणि इतर उद्योग मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे इथल्या लोकांची कमाई बरीच जास्त असते.

टेक केअर

## भान शारीरिक स्वच्छतेचं

शारीरिक स्वच्छता करताना शरीराचा काही भाग दुर्लक्षित राहतो. यात प्रामुख्याने पाय आणि कानांचा समावेश होतो. मात्र याचे दूरगामी परिणाम होऊशकतात. त्यामुळेच काही बाबींची दखल घ्यायला हवी.



✻ पावलांची त्वचा कोरडी पडल्याने टाचांना भेगा पडू शकतात. त्यामुळे पायांना दिवसातून दोन वेळा मॉईश्चरायझर लावा. ✻ गरम पाण्यामध्ये पाय बुडवून ठेवा. यावेळी पाण्यात थोडा मधही घालता येईल. ✻ घामामुळे बोटांच्या मधल्या भागात जंतूसंसर्ग होऊ शकतो. त्यामुळे हा भाग वरचेवर स्वच्छ ठेवा. ✻ चांगल्या फूट केअर क्रीमचा वापर करा. ✻ कान स्वच्छ ठेवण्यासाठी इअर बडस्‌चा वापर केला जातो. त्याचबरोबर कान स्वच्छ करण्यासाठी अनेकदा पिन्स, पेन किंवा इतर वस्तूही वापरल्या जातात. यामुळे कानाला अपाय होण्याची शक्यता असते. हे टाळा. ✻ कान हा नैसर्गिकरित्या स्वच्छ होणारा भाग आहे. तो स्वच्छ करण्यासाठी बाह्य साधनांची गरज नसते. त्यामुळे बडस् किंवा इतर वस्तू कानात घालणं धोकादायक आहे समजून घ्या. ✻ आंघोळ करताना कानात पाणी जाऊ देऊ नका.




राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **वृषभ** : महत्त्वाचे निर्णय विचाराने घ्यावे. आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. कौटुंबिक ताण राहील.
- **मिथुन** : पूर्वीच्या समस्या भेडसावतील. शक्यतो प्रवास टाळावा. स्थावर सौख्य लाभेल.
- **कर्क** : अनावश्यक खर्च होईल. महत्त्वाची कामं रखडतील. महत्त्वपूर्ण कारणांसाठी प्रवास लाभदायक ठरेल.
- **सिंह** : आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. मुलांचे प्रश्न मार्गी लागतील. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **कन्या** : अनाहुतांचा सल्ला विचारात घेऊ नये. वादविवाद संभवतात. अस्वास्थ्य राहील.
- **तूळ** : आमिषाला बळी पडू नये. आर्थिक बाबतीत सावध रहावे. स्थापत्य, कला क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृश्चिक** : महत्त्वाच्या घडामोडी घडतील. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. व्यवसायाला नव्याने चालना मिळेल.
- **धनु** : स्थावर प्रश्नाचा गुंता वाढेल. नोकरीत अडचणी येतील. मुलांच्या प्रश्नांचा ताण राहील.
- **मकर** : अपेक्षित घटना घडतील. नव्या संकल्पना मार्गी लागतील. यंत्र, वाहनाचा वापर जपून करावा.
- **कुंभ** : कार्यक्षेत्रात नव्या संधी लाभतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **मीन** : चैनीवर खर्च होईल. पर्यटनाचे बेत आखाल. प्रकृतीच्या तक्रारी उद्भवतील.

संगोपन

## रडण्यामागील कारणं ओळखा

घरात नव्या सदस्याचं आगमन झाल्यावर वातावरण कसं अगदी उत्साही आणि आनंदी होऊन जातं. नव्या आई-बाबांचं खूप कौतुक होतं. त्यांना सल्लेही दिले जातात. बाळाला अंजारण्या-गोंजारण्यात दिवस सरू लागतात. सुरूवातीला बाळाचा सांभाळ करायला अनेकजण असतात. पण नंतर सगळी जबाबदारी आई-वडिलांवर आणि त्यातही आईवर येऊन पडते. रात्री-अपरात्री बाळ रडतं. त्याला थोपटून झोपवलं जातं. कधी तरी असं होत असेल तर ठिक. पण बाळ रात्रीच्या वेळी नियमितपणे रडू लागलं तर त्याकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नाही. बाळाच्या रडण्यामागची कारणं समजून घेऊन त्यावर उपाय करण्याची गरज आहे. रात्रीच्या वेळी बाळ का रडतं याविषयी...

✻ मूल ज्या परिस्थितीत झोपतं तशी परिस्थिती नंतर असतेच असं नाही. म्हणजे बाळाला मांडीवर झोपवलं की त्याला शांत झोप लागते. पण नंतर तुम्ही त्याला पलंगावर ठेवता. त्यामुळे आधीसारखं वातावरण न मिळाल्याने बाळ रात्री रडू लागतं. (क्रमशः)

## २२ जुलै

दिनविशेष

- १९२३: हिंदी चित्रपट पार्श्वगायक मुकेश चंदमाथूर म्हणजेच मुकेश यांचा जन्म.
- १९९२: अमेरिकन गायक आणि अभिनेत्री सेलेना गोमेज हिचा जन्म.
- २०१३: टूजी स्पेक्ट्रम प्रकरणी न्यायालयाने बजावलेल्या समन्सविरोधात उद्योगपती अनिल अंबानी सर्वोच्च न्यायालयात.
- २०१४: देशात दरहजार युवकांमागील मुलींच्या संख्येत कमालीची घट झाल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाकडून स्पष्ट.

स्मार्ट टॉक

## आवाज न करणारा कॉंप्युटर

कॉम्प्युटर, लॅपटॉप सुरु होताना, बंद होताना तसंच वापरताना थोडाफार आवाज होतो. इस्रायलमधल्या कॉम्प्युटर बनवणाऱ्या 'कॉम्प्यु लॅब' या कंपनीने 'लिनक्स ऑपरेटिंग सिस्टिम'वर काम करणारा सायलंट मिनी कॉम्प्युटर बाजारात आणला आहे. या कॉम्प्युटरचा अजिबात आवाज होणार नाही. 'मिंट बॉक्स मिनी २' या सिस्टिममध्ये कोणताही पंखा बसवण्यात आलेला नाही. त्यामुळे त्यातून कोणताही आवाज येण्याचा प्रश्नच नाही. यात मेटल हाउसिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामुळे कॉम्प्युटर लवकर थंड होतो. तसंच ० ते ४५ अंश सेल्सियस तापमानातही व्यवस्थित काम करतो. या कॉम्प्युटरचं वजन अवघं २५० ग्रॅम आहे. यात क्वाड कोअर इंटेल सेलेरॉन जे ३४५५ प्रोसेसर लावण्यात आला आहे. यात चार जीबी रॅम आणि ६४ जीबी स्टोरेज देण्यात आलं आहे. यात दोन यूएसबी पोर्ट आहेत. तसंच दोन मिनी डिस्प्ले पोर्टही देण्यात आले आहेत. या कॉम्प्युटरची किंमत २३,९०० रूपये असेल. याचा आकारही खूप छोटा आहे. त्यामुळे तो खूप कमी जागा व्यापेल. कोणताही आवाज न करता सुरू होणं हे या कॉम्प्युटरचं प्रमुख वैशिष्ट्य आहे.

पंचांग

**मंगळवार, २२ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ कृ. १२/१३, नक्षत्र : मृगशीर्ष
चंद्रराशी : वृषभ, योग : ध्रुव
सूर्योदय : ६.१४, सूर्यास्त : ७.१६

फॉरवर्ड्स

**विरासतों में सिर्फ़ ज़मीन मिल सकतीं हैं...**

**आसमां अपनें हिस्सें क़ा ख़ुद बनाना होग़ा...!**

आरोग्यमंत्र

## ...तर संभवतो जंतूसंसर्ग

स्वच्छतागृहाच्या वापरासंबंधी लहानपणापासूनच शिकवण द्यायला हवी कारण या जागेत डोळ्यांना न दिसणारे बॅक्टेरिया कोट्यवधींच्या संख्येने असतात. त्यांचा संसर्ग अनेक रोगांना कारक ठरु शकतो. म्हणूनच स्वच्छतागृह वापरताना नेमकं काय टाळायला हवं याविषयी जाणून घेऊ या.



✻ स्वच्छतागृहात फार वेळ घालवू नका. यामुळे जंतूसंसर्गाची शक्यता बळावते. ✻ अनेकांना स्वच्छतागृहात गेल्यावर वर्तमानपत्र किंवा पुस्तक वाचण्याची सवय असते. हे टाळा. बॅक्टेरिया पुस्तक आणि वर्तमानपत्रांवर चिकटून बसतात आणि रोगराई पसरते. ✻ स्वच्छतागृहात मोबाईल वापरल्यास मोबाईलला चिकटलेले बॅक्टेरिया कान आणि तोंडावाटे शरीरात प्रवेश करू शकतात. ✻ सार्वजनिक शौचालयातल्या आरसा, बेसिन किंवा इतर वस्तूंना हात लावू नका. इथल्या बॅक्टेरियांमुळे अस्थमासारखे घातक रोग होऊ शकतात. ✻ स्वच्छतागृहात जास्त वेळ बसून राहिल्याने सांधेदुखी, अंगदुखी आणि पाठीच्या कण्याशी संबंधित समस्या उद्‌भवू शकतात. ✻ स्वच्छतागृहाचा वापर केल्यानंतर हात धुवा. हात न धुतल्याने रोगराई पसरण्याचा धोका अनेकपटींनी वाढतो. ✻ स्वच्छतागृहात विचार करत बसल्यामुळे मनात नकारात्मक विचार येतात. ✻ स्वच्छतागृहातल्या साबणाचा वापर करू नका. त्यावर बॅक्टेरियांचा वास असतो. लिक्विड सोपचा वापर करता येईल.

वेगळ्या वाटा

विज्ञान शाखेतल्या सध्याच्या ट्रेंडकडे बघितलं तर अनेकांचा ओढा शाश्वत विज्ञानाकडे असल्याचं दिसून येतं. आता अनेकांना संशोधनाकडे वळायचं आहे. वैज्ञानिक संशोधनाच्या क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. ✻ शाश्वत विज्ञानात उच्च शिक्षण घ्यायचं असेल किंवा संशोधन करायचं असेल तर बंगळूरूचं इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स किंवा टाटा इन्स्टिट्यूट हा चांगला पर्याय आहे. इथून बीएससी इन फिजिक्स, बायोलॉजी, मॅथ्स, केमिस्ट्री, अर्थ ॲण्ड एन्व्हायर्नमेंटल सायन्सेस हा अभ्यासक्रम करता येईल. पीएचडीसाठीही इथे विषय उपलब्ध आहेत. (क्रमशः)

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## कम्युनिस्ट नेते व्ही. एस. अच्युतानंदन यांचं निधन



**तिरुवनंतपुरम (केरळ) :** केरळमधील सर्वात प्रतिष्ठित राजकीय व्यक्तींपैकी एक आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (मार्क्सवादी) संस्थापक नेते व्ही.एस. अच्युतानंदन (वय १०१) यांचं सोमवारी निधन झालं. हृदयविकाराचा झटका आल्यानं त्यांना २३ जून रोजी सकाळी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तेव्हापासून ते तिरुवनंतपुरम एसयूटी रुग्णालयात उपचार घेत होते. उपचारादरम्यानच सोमवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. २० ऑक्टोबर १९२३ रोजी अलप्पुझा येथील पुन्नाप्राच्या वेलिक्काकाथू येथे शंकरन आणि अक्कम्मा यांच्या पोटी जन्मलेल्या अच्युतानंदन यांनी लहानपणीच आईवडील गमावले. त्यानंतर त्यांनी सातवीत शाळा सोडली आणि एका टेलरिंग शॉप आणि कॉयर फॅक्टरीत काम करू लागले. त्यानंतर ते ट्रेड युनियनच्या कामात सामील झाले. १९४० मध्ये वयाच्या १७ व्या वर्षी ते कम्युनिस्ट पक्षात सामील झाले. राज्याच्या क्रांतिकारी कम्युनिस्ट सुरुवातीचा शेवटचा दुवा म्हणून वर्णन केलेले अच्युतानंदन यांचे जीवन भारतातील डाव्यांच्या उत्क्रांतीशी अविभाज्यपणे जोडले गेले होते.

# संसदेत 'ऑपरेशन सिंदूर'वरून गोंधळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या आजपासून सुरू झालेल्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी 'ऑपरेशन सिंदूर' आणि पहलगाम दहशतवादी हल्ला या मुद्द्यांवरून लोकसभा आणि राज्यसभेत जोरदार गोंधळ पाहायला मिळाला. विरोधकांनी या मुद्द्यांवर तातडीने चर्चा घेण्याची मागणी केली. त्यामुळे दोन्ही सभागृहे काही काळासाठी स्थगित करण्यात आली. राज्यसभेत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. त्यांनी म्हटले की, "पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी अजूनही फरार आहेत. ना त्यांना पकडले गेले, ना मारले गेले.

जम्मू-काश्मीरचे लेफ्टनंट गव्हर्नर यांनी देखील कबूल केले आहे की, हे इंटेलिजन्स फेल्युअर होते. अशा संवेदनशील घटनेवर सरकारने खुलासा करावा. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी सर्वच पक्षांनी सरकारला पाठिंबा दिला होता. मग आता आम्ही उत्तर



मागितल्यावर शांतता का?" केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी खडगेंच्या आरोपांना उत्तर देताना सांगितले, "सरकारला कोणत्याही चर्चा टाळायची नाही. देशात असा संदेश जाऊ नये की सरकार ऑपरेशन सिंदूरवर चर्चा टाळत आहे. आम्ही सर्व मुद्द्यांवर चर्चा करू. ऑपरेशन सिंदूरमधील सर्व टप्प्यांची माहिती संसदेत मांडली जाईल."

लोकसभेत विरोधकांनी नारेबाजी करताच सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांना फटकारले. ते म्हणाले, "प्रश्नोत्तर कालावधीनंतर ऑपरेशन सिंदूरवर चर्चा घेतली जाईल. सरकार सर्व प्रश्नांची उत्तरे देईल. मात्र, पहिल्याच दिवशी असा गोंधळ घालणं योग्य नाही. आपल्याला हे वर्तणुकीचे मिथक मोडावे लागेल." सत्राआधी इंडिया आघाडीने बैठक घेतली. या बैठकीत खालील मुद्द्यांवरून सरकारला घेरण्याची रणनीती ठरवण्यात आली. ऑपरेशन सिंदूर, भारत-पाक संघर्षविराम, ट्रम्प यांचे युद्धबंदीचे दावे, बिहार मतदार यादीतील गोंधळ या सर्व मुद्द्यांवर विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून थेट उत्तर मागत आहेत.

पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट पर्यंत चालेल. एकूण १५ पेक्षा जास्त विधेयके मांडली जाणार आहेत. जीएसटी सुधारणा विधेयक २०२५ , नवीन इनकम टॅक्स बिल (१९६१च्या कायद्याची जागा घेणारे), राष्ट्रीय क्रीडा प्रशासकीय सुधारणा विधेयक अशा महत्वाच्या विधेयकांचा यात समावेश आहे.

**ऑपरेशन सिंदूरवर १६ तास चर्चा होणार :** काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये असलेल्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यासाठी भारतीय लष्कराने सुरू केलेल्या ऑपरेशन सिंदूरवर आता लोकसभेत १६ तास चर्चा होणार आहे. राज्यसभेत या विषयावर ९ तास चर्चा होणार आहे. मात्र, पुढील आठवड्यापासून सुरू होणाऱ्या चर्चेची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. विरोधक मात्र या आठवड्यात चर्चा सुरू व्हावी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर द्यावे, यावर ठाम आहेत.

# विरोधकांचा आवाज दडपला जातोय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेत सुरु झालेल्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी गोंधळ पाहायला मिळाला. काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट केंद्र सरकारवर आरोप केला की, सत्ताधारी भाजपकडून केवळ आपल्या मंत्र्यांनाच बोलण्याची संधी दिली जाते, तर विरोधकांचा आवाज दडपला जातो.

"मी विरोधी पक्षनेता आहे, मला बोलण्याचा अधिकार आहे. पण मला बोलू दिलं जात नाही. संरक्षणमंत्र्यांना संधी दिली जाते, पण आम्हाला नाही," असं राहुल गांधी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. "पंतप्रधान मोदी तर एका सेकंदात सभागृहातून बाहेर पडतात. ही नवी पद्धत आहे," अशी टीकाही त्यांनी केली.

पहिल्या दिवशीच लोकसभा व राज्यसभेत विरोधकांनी घोषणाबाजी करत पहलगाम दहशतवादी हल्ला व ऑपरेशन सिंदूर यावर चर्चा करण्याची मागणी केली. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आल्या. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराच्या तासानंतर चर्चेसाठी वेळ दिला जाईल, असं आश्वासन दिलं. मात्र त्याआधीच विरोधकांचा आक्रोश आणि सरकारकडून दुर्लक्ष यामुळे वातावरण तापलं. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं की, पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर यावर सरकार चर्चा करण्यास तयार आहे. पण घोषणाबाजीच्या गोंधळात त्यांचे वक्तव्य ऐकलेही गेले नाही, अशी परिस्थिती होती.

राहुल गांधी म्हणाले, "कायद्यानुसार, सरकारकडील मंत्र्यांना जसे बोलू दिलं जातं, तसंच विरोधकांनाही बोलण्याचा अधिकार आहे. पण आता हे नवं चित्र आहे – सरकार फक्त तुम्हालाच बोलू देतं."

भाजप खासदार रवि किशन यांनी विरोधकांवर टीका करत सांगितलं की, "संसदेचा पहिलाच दिवस असूनही विरोधक केवळ राजकारण करत आहेत. विकासावर बोलायला काही नाही, म्हणून ऑपरेशन सिंदूरवर चर्चा मागतात. यातून त्यांच्या राजकारणातील पोकळपणा उघड होतो."

## पंढरपूर येथे ग्रंथ पूजन व सन्मान समारंभ"

# "संत नामदेव गाथा हस्तलेखन उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** "संत शिरोमणी नामदेव प्रतिष्ठान पंढरपूर यांचे वतीने संत नामदेव महाराजांच्या यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्या निमित्त पुरुषोत्तम गंगाधर निकते सोलापूर/पुणे यांनी संत नामदेव गाथा हस्तलेखन उपक्रमाची संकल्पना जाहीर केली आणि त्याला ठीक ठिकाणच्या नामदेव भक्तांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला आहे. जवळपास ३५० नामदेव भक्तांनी नामदेव गाथा स्वलेखन उपक्रमामध्ये आपला सहभाग नोंदविला आहे. आजपर्यंत १५० + नामदेव भक्तांनी स्व-हस्ताक्षरात नामदेव गाथेचे लिखाण पूर्ण केले आहे.

"गुरुवार दिनांक २४ जुलै २०२५ रोजी पंढरपूर संत तुकाराम भवन येथे नामदेव गाथेचे पूजन व सन्मान समारंभ आयोजित केला आहे. तरी नामदेव गाथा लिहून पूर्ण केलेल्या नामदेव भक्तांनी या दिवशी दुपारी ११ वाजेपर्यंत समारंभाचे ठिकाणी पोहचणे आहे. नाव नोंदणी, मनोगत स्वीकारणे, ग्रंथ पूजन, सन्मान समारंभ, हस्तलिखित ग्रंथासह नामदेव पायरीचे दर्शन, नामदेव मंदिरातील संत नामदेवराय व केशवराज यांचे दर्शन व त्यांनंतर मुख्य दिंडी सोहळा असे कार्यक्रमाचे स्वरूप आहे"

"नामदेव गाथा स्वहस्त लेखन उपक्रमास वै. गुरुवर्य हभप नामदेवबुवा नामदास व नामदेव महाराजांचे सर्व वंशज, नामदास परिवार यांचे आशीर्वाद लाभले असून, वै. हभप प्र. द. निकते गुरुजी हे प्रेरणास्थान असून, हभप श्री.संदीप महाराज वैद्य सोलापूर/पुणे यांचे मार्गदर्शन आहे."

# १९ महिन्यांत १५५० नक्षलवाद्यांनी केलं आत्मसमर्पण

**बस्तर :** नक्षलवाद्यांविरुद्ध सुरू असलेली कारवाई आता निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. नक्षलग्रस्त भागात अनेक दशकांपासून असणाऱ्या नक्षलवाद्यांना "निष्क्रिय" करण्यासाठी सुरक्षा दल शोध मोहीम राबवत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद संपुष्टात येईल, असा दावा केला आहे. त्यामुळं नक्षलवादी चळवळ संपवण्याचा निर्धार पाहता, सुरक्षा दलानं आपली शोध मोहीम वेगानं सुरु केली आहे.

बस्तरचे पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पी यांनी पुन्हा एकदा सांगितलं की, "नक्षलवाद्यांनी शस्त्रे सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावं. नक्षलविरोधी कारवाईमुळं मोठ्या संख्येनं नक्षलवादी आपल्या शस्त्रांसह आत्मसमर्पण करत आहेत. आकडेवारीनुसार, गेल्या १९ महिन्यांत जवळपास १५५० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांनी आता समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊन हिंसाचाराचा त्याग केला आहे."

# विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांना जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार



**पुणे :** आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदरचे शरदचंद्रजी पवार महाविद्यालय जेजुरी हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चिंचबागेत सुरू आहे.

त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करावी. या उद्देशाने सन २०२३ - २०२४ पासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिवर्षी होणाऱ्या जयंतीचे औचित्य साधून राज्यस्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सुरू केला आहे.

पुरस्काराचे हे तिसरे वर्ष असून या वर्षीचा पुरस्कार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम ताई गोऱ्हे यांना जाहीर करण्यात येत आहे. त्यांनी महिलांच्या प्रश्नांसाठी केलेले सामाजिक, राजकीय आणि साहित्य विषयक कार्य यांची दखल घेऊन त्यांच्या कार्याचा सन्मान व्हावा, या उद्देशाने त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात येत आहे. हा पुरस्कार शुक्रवार दिनांक २५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजून ३० मि. मा. राजे भूषणसिंह होळकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून मा. विजय बापू शिवतारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून हा कार्यक्रम मा. विजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या प्रसंगी मा. दिलीप दादा बारभाई व मा. सुदामाप्पा इंगळे मा. रोहिदास कुंभार मा. माणिकराव झेंडे पाटील मा. मंगेश घोणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रथम पुरस्कार सक्षणा सलगर यांना देण्यात आला होता. दुसरा पुरस्कार डॉक्टर मेधा पुरव-सामंत यांना देण्यात आला होता. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी जेजुरी व परिसरातील नागरिक आजी-माजी महाविद्यालयाचे विद्यार्थी, पालक या सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. धनाजी नागणे यांनी केले आहे.

पान १ वरून

## धक्कादायक निकाल...

यांचा समावेश होता. या सर्वांना साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी दोषी ठरवण्यात आले होते. यातील कमाल अन्सारी याचे २०२१ मध्ये नागपूर तुरुंगात कोरोनामुळे निधन झाले. तर जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्यांमध्ये तन्वीर अहमद अन्सारी, मोहम्मद माजिद शफी, शेख मोहम्मद अली आलम, मोहम्मद साजिद मर्गुब अन्सारी, मुझम्मिल अतौर रहमान शेख, सुहेल मेहमूद शेख आणि जमीर अहमद लतीफुर रहमान शेख यांचा समावेश आहे.

सिद्ध करण्यात सरकार अपयशी

सर्व आरोपींविरुद्ध खटला सिद्ध करण्यात सरकारी वकील अपयशी ठरले. या घटनेत कोणत्या प्रकारच्या स्फोटकांचा वापर करण्यात आला होता, हेही सरकारी वकील सांगू शकले नाहीत, असे न्यायालयाने म्हटले आहे. बॉम्ब, बंदुका, नकाशे आदी पुरावे जप्त करण्याबाबत न्यायालयाने नमूद केले की, ही कारवाई खटल्यासाठी महत्त्वाची नव्हती. कारण सरकारी वकील स्फोटासाठी कोणता प्रकारच्या बॉम्बचा वापर करण्यात आला, हे सांगण्यात अपयशी ठरले.

वरिष्ठ वकील एस मुरलीधर, युग मोहित चौधरी, नित्या रामकृष्णन आणि एस नागमुथू यांनी दोषींची बाजू मांडली. सरकारी वकिलांचा खटला सदोष होता. तर विशेष न्यायालयाने आरोपींना दोषी ठरवण्यात मोठी चूक केली, असा युक्तिवाद त्यांनी केला. तर दुसरीकडे, विशेष सरकारी वकील राजा ठाकरे यांनी दोषींच्या मृत्युदंडाच्या शिक्षेचे समर्थन केले. हा खटला दुर्मिळातील दुर्मिळ निकष पूर्ण करणारा आहे.

## न्या. वर्मा यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव

करण्यात आली होती. भ्रष्टाचाराच्या आरोपात अडकलेल्या वर्मा यांच्या चौकशीसाठी तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी तीन न्यायाधीशांची समिती नेमली होती. ज्यांच्या अहवालाच्या आधारे त्यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना महाभियोगाची शिफारस करणारे पत्र लिहिले होते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी, भाजपचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद, अनुराग ठाकूर यांच्यासह एकूण १४५ सदस्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना सादर केलेल्या नोटीसवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. न्यायाधीशांचे वर्तन चांगले असेल तरच न्यायपालिकेची प्रामाणिकता, पारदर्शकता आणि स्वातंत्र्य सुनिश्चित होईल, असे प्रसाद म्हणाले. हे आरोप गंभीर असून अशा परिस्थितीत महाभियोगाची नोटीस देण्यात आली आहे. ही कार्यवाही लवकर सुरू करावी, अशी विनंती आम्ही केली आहे. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड़ यांना सादर करण्यात आलेल्या या नोटीसवर ६३ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. अशा प्रकारे एकूण २०८ खासदार महाभियोगाच्या बाजूने आहेत.

## रशिया-युक्रेन युद्ध...

**स्पष्ट आहेत." मात्र, त्याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली नाही. रशिया युद्ध थांबवेल, पण सामरिक व राजकीय उद्दिष्टे गाठल्याशिवाय नाही. रशियाने अधिकृतरित्या त्यांची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट शब्दांत सांगितलेली नाहीत.**

## छावा संघटनेला शिवेंद्रराजे भोसले यांचा इशारा

भेटण्यासाठी बोलावले होते. मात्र, सूरज चव्हाण यांनी कालच्या मारहाणीत बोट फ्रॅक्टर झाल्याचे कारण पुढे केले होते. त्यामुळे आपण उपचारासाठी लातूरमध्येच थांबणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. यामागे अजितदादांची भेट टाळून कारवाई लांबवण्याचा सूरच चव्हाणांचा प्रयत्न होता का? अशा प्रश्नही उपस्थित झाला होता. मात्र, अजित पवार यांनी मराठा संघटनांचा रोष वाढत चालल्याने सूरज चव्हाण भेटायला येण्याचीही वाट न पाहता थेट ट्विटरवरुनच त्यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याच्या सूचना दिल्या. तर सुनील तटकरे यांनी सूरज चव्हाण यांचा राजीनामा घेतल्याची माहिती माध्यमांशी बोलताना दिली.

## शेअर बाजारात तेजी, निर्देशांक वधारले

०.५ टक्के वाढून बंद झाला. तर स्मॉलकॅप सपाट पातळीवर स्थिरावला.

न्सेक्सवर इर्टनलचा शेअर्स ७.३ टक्के वाढून टॉप गेनर राहिला. त्याचबरोबर आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, एम अँड एम, भारत इलेक्ट्रॉनिक्स, कोटक बँक, टाटा मोटर्स, बजाज फिनसर्व्ह, एलटी, पॉवर ग्रिड हे शेअर्स १ ते २.७ टक्क्यांपर्यंत वाढले. तर दुसरीकडे रिलायन्सचा शेअर्स ३.२ टक्क्यांनी घसरला. एचसीएल टेक, हिंदुस्तान युनिलिव्हर, टीसीएस, आयटीसी, मारुती आदी शेअर्समध्येही घसरण दिसून आली.

# राम मंदिरानंतर आता सीता मंदिर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अयोध्येतील भव्य राम मंदिरानंतर आता बिहारमधील सीतामढी येथे सीता मंदिराचे बांधकाम सुरू होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सीतामढी येथील पुनौरा धाममध्ये ८ ऑगस्ट रोजी भूमिपूजन करणार आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी सीता मंदिराच्या कामाला सुरुवात करणे हे भाजपचे मोठे पाऊल मानले जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा ७ आणि ८ ऑगस्ट रोजी बिहार दौऱ्यावर असतील. त्यानंतर राम मंदिरानंतर सीता मंदिर हा भाजपचा अजेंडा असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

१३ मार्च रोजी अहमदाबाद येथे आयोजित "शाश्वत मिथिला महोत्सव २०२५" मध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घोषणा केली होती. त्यावेळी ते म्हणाले होती की राम मंदिर तयार झाले आहे. आता सीतामढीमध्ये भव्य सीता मंदिराच्या

**ई-लिलाव अधिसूचना - स्क्रॅप**
कचरा, अॅल्युमिनियम, तांबे, ई-कचरा, पोकळ एमएस बॅरल्स आणि स्क्रॅप मशीन आणि उपकरणे
लार्सन अँड टुब्रो लिमिटेड, तळेगांव, पुणे
- संकेतस्थळ -
www.auctionindia.com
लिलावाची तारीख 25-07-2025
वेळ : दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

**M.V.C. NO. 2788/2023**
**IN THE COURT OF THE HONBLE VIII ADDL. DISTRICT JUDGE AND ADDL M.A.C.T. BELAGAVI, AT: BELAGAVI**
**BETWEEN:**
1. Smt. Shalan W/o. Vasant Khedekar and others .... **PETITIONERS**
**AND:**
1. Shri. Ankush Dnyandev Ghohare and Another. .... **RESPONDENTS**
**To,**
**Respondent No. 1:-** Shri Ankush Dnyandev Ghogare Age: Major, Occ: Business, R/o. at/ Post Ganeshwadi, Taluka: Indapur, Pune_ 413103
**CITATION**
Whereas, the Petitioners have filed the top noted case against you and another for awarding compensation on account of death of Shri Vaibhav Vasant Khedekar in a Motor vehicle accident. That you are hereby directed to appear in person or through council before the Hon'ble VIII Addl. Dist. And Sessions Judge and M.A.C.T Belagavi At. Belagavi on 02/09/2025 at 11:00 AM. To file objections if any, failing which you will be place ex-parte and order will be passed accordingly.
Given under my hand and the seal of this court. dt: 18/07/2025.
**B.O.C.**
**Sd/-Chief Administrative Officer**
**District Court, Belagavi**
**Sd/- Bench Clerk**
**Advocate for Petitioners**
**Sd/-[P. S. Jadhav]**

**M.V.C. No.258/2024**
**IN THE COURT OF THE HON'BLE VIII ADDL. DISTRICT AND SESSION JUDGE BELAGAVI AT: BELAGAVI**
**BETWEEN:**
1] Shri Paras Suresh Nirmalkar, R/by M/G Smt. Sharada Suresh Nirmalkar **...Petitioner**
**AND:**
1] Shree Swami Samarth Enterprises and another **...Respondents**
**CITATION**
**To Respondent No. 1:**
Shri Swami Samarth Enterprises, R/by Akash Datta Mayanal, R/o.: Bharat Sathechal Pimple Nilakh pimpri, Chinchwad, Pune Maharashtra-411027, [owner of car No MH14KQ8220]
Whereas, above said Petitioner has filed the top noted claim petition U/Sec. 166 Motor Vehicle Act for claiming compensation against the respondents. Hence the respodent No. 1 is hereby Summoned to appear before this Hon'ble Court in person or by pleader in the above said case on 02-09-2025 at 11.00 a. m. Take Notice that in default of your appearance on the day above mentioned the proceeding will be heard and decided on merits in your absence.
Given under my hand and the seal of the Court of this 16th day of July 2025.
**By Order of the Court**
**Sd/- Chief Administrative officer, Belagavi.**
**Sd/- Bench Clerk**
**Sd/- (V. S. Wagarali)**
**Advocate for Petitoner**

**जाहीर नोटीस**
तमाम जनतेस सुचीत करणेत येते की, मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स स.नं. १००(P), सी टी स ६६१३/३(P) गाव विठ्ठलनगर, पिंपरी वाघिरे ता हवेली, जि पुणे येथील "विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प" या बांधकाम प्रकल्पाला महाराष्ट्र शासन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समितीने EC ID NO. EC25B038MH196827 दिनांक 18/07/2025 नुसार पर्यावरण विषयक परवानगी दिलेली आहे. सदर परवानगी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ नुसार देण्यात आलेली आहे.
सदर परवानगीच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे उपलब्ध असून http://parivesh.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
पुणे दिनांक : 22.07.2025
**मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स**
ऑफिस 203/204, साई प्लाझा, सीटीएस नं. 6399 ते 6403, उद्यम नगर, पिंपरी, पुणे - 411 018
:info@saimiracle.in
Anup : 9890063640

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दुरध्वनी : ०२०-२६१२५७७९ ईमेल : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ०४/२०२५-२६
पुणे, दिनांक: १४/०७/२०२५ /३३७

"तुलीप होम्स ई विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या,"
पत्ता: गट नं. ९३/१९८/१९९/अ/१,
गट नं. ९३/१९८/१९९/अ/२ व गट नं.९३/१९८/१९९/अ/३,
गट नं. ९३/१९८ /१९९/अ/४, मेदनकरवाडी, (शिकापुर रोड), चाकण, अर्जदार
ता. खेड, जि. पुणे- ४१०५०१. तर्फे
अध्यक्ष : श्री. गणेश मुरलीधर कवडे
सचिव : श्री. बाळासाहेब दत्तात्रय येवले
खजिनदार: श्री अजय हरीचंद्र व्यवहारे

**विरूध्द**

१) तुलीप होम्स (संयुक्तीक करारनामा) विकसक /जाब देणार नं.१
तर्फे अधिकृत स्वाक्षरीकार
अ. मे. यश इंटरप्राईज, भागीदारी संस्था
ऑफिस पत्ता ४/८/२, जलवायु विहार, सेक्टर नं. ९, मोशी प्राधिकरण,
ता. हवेली जि.पुणे ४१२१०५
तर्फे भागीदार,
ए. श्री. नरेंद्रभाई नारणभाई पटेल,
पत्ता -जलवायु विहार,सेक्टर नं. ६, मोशी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे-४१२१०५
ब. श्री. सुरेशभाई मावजीभाई पटेल, पत्ता- १३, रॅन्बो अपार्टमेंट,
सेक्टर नं. ६, मोशी प्राधिकरण, वा. हवेली, जि. पुणे ४१२१०५
क. श्री. दिलीपकुमार रतीभाई पटेल,
पत्ता- जलवायु विहार, सेक्टर नं.६, मोशी प्राधिकरण,
२) नामदेव निवृत्ती खांडेभराड (मयत तर्फे वारस ) जाब देणार
ए. सुंदराबाई नामदेव खांडेभराड,
बी. गोटूराम नामदेव खांडेभराड
जाब देणार नं. २ ए व बी रा. मेदनकरवाडी, ता. खेड जि. पुणे - ४१०५०१.
सी. सौ. सुरेखा बळीराम कड
जाब देणार नं. २ सी रा. शिकापुर, ता. शिरूर जि. पुणे- ४१२२०८.
डी. श्रीमती सुनंदा उमेश घोलप
जाब देणार नं. २ डी, रा. चाकण, ता. खेड जि. पुणे ४१०५०२.
ई. श्रीमती चंद्रकला पोपट काळे
जाब देणार नं. २ ई रा. चांडवली, ता. खेड जि. पुणे ४१०५०१.
(स्वतःकरीता व नं. २ ए ते ई तर्फे विकसनकर्ता व कु.मु. धारक म्हणून)
अक्शा प्रमोटर्स अॅण्ड बिल्डर्स प्रा. लि. कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत कंपनी,
रजि. ऑफिस सर्व्हे नं. १५० ते १५३ प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३,
सुखवाणी इंपेरिअल, फेज III, मोरवाडी, पिपरी, पुणे ४११०१८
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईज सिग्रेटरी
श्री. शिकरुल्लाह अब्बास अली चौधरी
रा. अशियाना, सर्व्हे नं. १५०, प्लॉट नं. ६,
सुखवाणी इंपेरिअल, फेज III, मोरवाडी, परी, पुणे ४११०१८.
३ अक्शा प्रमोटर्स अॅण्ड बिल्डर्स प्रा.लि. कंपनी कायदा 1956 अन्वये नोंदणीकृत कंपनी,
रजि. ऑफिस सर्व्हे नं. १५० ते १५३ प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३,
सुखवाणी इंपेरिअल, फेज III, मोरवाडी, पिपरी, पुणे ४११०१८. जाब देणार
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईज सिग्रेटरी
श्री. झिकरूल्लाह अब्बास अली चौधरी
रा. 'अशियाना', सर्व्हे नं. १५०, प्लॉट नं. ६,
सुखवाणी इंपेरिअल, फेज III, मोरवाडी, पिपरी, पुणे ४११०१८.
(जाब. देणार नं.२ वर्षे कु.मु. धारक म्हणून जा. देणार नं.१)
४) तुलीप होम्स सी विग सहकारी गृहरचना संस्था मर्या,
५) तुलीप होम्स डी विग सहकारी गृहरचना संस्था मर्या,
६) तुलीप होम्स ए विग सहकारी गृहरचना संस्था मर्या,
७) बी इमारत
पत्ता : गट नं. ९३/१९८/१९९/३/१०, गट नं. ९३/१९८/१९९/अ/२
व गट नं. ९३/१९८ / १९९/अ/३, गट नं. ९३/१९८/१९९/अ/४,
मेदनकरवाडी, (शिकापुर रोड), चाकण, वा. खेड, जि. पुणे- ४१०५०१.

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप अॅक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गतसंस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते ०७ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक २८/०७/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी सँघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.
**सही**
**(प्रकाश ल. जगताप)**
शिक्का
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

# 'ईडी'ने सर्व मर्यादा ओलांडल्या

## सरन्यायाधीशांनी कठोर शब्दांत फटकारले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** "सक्तवसुली संचालनालय सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, हे असं चालू देऊ शकत नाही," अशा कठोर शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने ईडीला फटकारले. वकिलांनी त्यांच्या क्लायंटना दिलेल्या सल्ल्यांवरून त्यांना समन्स पाठवण्यात आल्याच्या प्रकरणावर सुनावणी करताना सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी हे तीव्र निरीक्षण नोंदवलं. सरन्यायाधीशांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि ॲडिशनल सॉलिसिटर जनरल एस.व्ही. राजू यांना सुनावले आणि स्पष्टपणे सांगितले की, "आपल्याला काही मार्गदर्शक तत्वांची गरज आहे, हे असं चालू राहू शकत नाही. ईडीच्या अधिकाऱ्यांनी सर्व सीमा ओलांडल्या आहेत. याआधी दोन प्रकरणांतही आम्ही ॲडिशनल सॉलिसिटर जनरल राजूंना सांगितलं होतं की त्यांनी तोंड उघडू नये, नाहीतर आम्हाला काही तीव्र टिप्पणी करावी लागेल."

ईडीने काही ज्येष्ठ वकिलांना केवळ त्यांनी त्यांच्या क्लायंटना दिलेल्या सल्ल्यावरून समन्स पाठवले होते. बार असोसिएशन्सनी यावर तीव्र आक्षेप नोंदवून सरन्यायाधीशांना






पत्र लिहिले होते. या समन्समुळे न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि वकिलांचा स्वतंत्रपणे काम करण्याचा हक्क धोक्यात येतो, असं या पत्रात नमूद करण्यात आलं. वरिष्ठ वकिल अरविंद दातार आणि प्रताप वेणुगोपाल यांना अलीकडे ईडीने समन्स पाठवले होते. नंतर ईडीने समन्स मागे घेतले आणि स्पष्टीकरण देत म्हटले की, "पुढील वेळी वकीलांना समन्स पाठवायचा झाल्यास केवळ ईडी संचालकाच्या मंजुरीनंतरच तो पाठवला जाईल."

या प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली. याआधी २५ जून रोजी गुजरातमधील एका प्रकरणात न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती एन. कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठानेही या प्रकारावर चिंता व्यक्त केली होती."हा प्रश्न फक्त एका वकिलाचा नाही, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या प्रभावी कार्यपद्धतीचा आणि वकिलांच्या निर्भयपणे काम करण्याच्या अधिकाराचा आहे," असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

सरन्यायाधीशांच्या टीकेला उत्तर देताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले, "या संपूर्ण प्रकरणामागे एक नियोजित प्रचार आहे जो एका संस्थेविरुद्ध खोटी कहाणी उभी करण्याचा प्रयत्न करतोय. कृपया न्यूज आणि मुलाखतींकडे लक्ष देऊ नका." मात्र त्यांनी मान्य केलं की, वकिलांना त्यांच्या कायदेशीर सल्ल्यामुळे समन्स पाठवता येत नाही. आजच सर्वोच्च न्यायालयात कर्नाटकमध्ये कथित 'म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी' घोटाळ्याच्या प्रकरणात मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांना ईडीने पाठवलेल्या समन्सबाबतही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. सरन्यायाधीश गवई म्हणाले, "राजू साहेब, कृपया आम्हाला आमचं तोंड उघडायला लावू नका. नाहीतर आम्हाला ईडीविषयी कठोर टिप्पणी करावी लागेल. दुर्दैवाने मला महाराष्ट्रातील काही अनुभव आहेत... राजकीय लढाई जनता दरबारात लढली पाहिजे, तुम्हाला का वापरलं जातं?" सर्वोच्च न्यायालयाच्या या तीव्र टिप्पणीमुळे केंद्र सरकारच्या तपास संस्थांची कार्यपद्धती, विशेषतः वकिलांना दिल्या जाणाऱ्या समन्स संदर्भात, नव्याने चर्चेत आली आहे. कायदेशीर सल्ल्याच्या आधारावर वकिलांना त्रास देणं हा न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेवर हल्ला मानला जात असून, सर्वोच्च न्यायालय लवकरच या विषयावर मार्गदर्शक तत्त्वे ठरवण्याची शक्यता आहे.

## ममतांनी वाजवला निवडणुकीचा बिगुल



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी २०२६ च्या निवडणुकीच्या तोंडावर 'बंगाली अस्मिता'चा मुद्दा अधिक तीव्र करत भाजप बंगालींवर भाषिक दहशतवाद पसरवत असल्याचा आरोप केला असून जोपर्यंत भाजपचा पराभव होत नाही तोपर्यंत अस्मिता आणि भाषेची लढाई सुरूच राहील, असे स्पष्ट केले. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला पराभूत करा आणि अखेर केंद्रातील सत्तेतून बाहेर पडा, असे आवाहन ममता बॅनर्जी यांनी कोलकात्यात हुतात्मा दिनाच्या भव्य रॅलीला संबोधित करताना केले. गरज पडल्यास बंगाली भाषेवरील भाजपच्या दहशतवादाविरोधात आणखी एक भाषा चळवळ उभी केली जाईल. बंगाली, बंगाली भाषा आणि भाषासंत्रांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ २७ जुलैपासून बंगालमध्ये आंदोलन सुरू करण्यात येणार आहे,' अशी घोषणा त्यांनी केली. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत आम्हाला अधिक जागा जिंकायच्या आहेत आणि त्यानंतर भाजपला पराभूत करण्यासाठी दिल्लीकडे कूच करायचे आहे, असेही त्या म्हणाल्या.

## सांबामध्ये ट्रेनच्या धडकेत तरुणाचा मृत्यू



**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील सांबा जिल्ह्यात दिल्लीकडे जाणाऱ्या रेल्वेच्या धडकेत एका २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. योग नगरी ऋषिकेश एक्स्प्रेसने रविवारी रात्री बारी ब्राम्हण परिसरात धडक दिल्याने रुळ ओलांडत असलेल्या मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती जीआरपीच्या एका अधिकाऱ्याने दिली. कायदेशीर औपचारिकता आणि ओळख पटविण्यासाठी मृताचा छिन्नविछिन्न मृतदेह येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (जीएमसी) हलविण्यात आला आहे.

## व्यापार करारासाठी अमेरिकेचे पथक ऑगस्टमध्ये भारतात

**नवी दिल्ली :** दोन्ही देशांमधील प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराच्या वाटाघाटींच्या पुढील टप्प्यासाठी अमेरिकेचे पथक ऑगस्टमध्ये भारत दौऱ्यावर येणार आहे. भारत आणि अमेरिकेच्या संघांनी गेल्या आठवड्यात वॉशिंग्टनमध्ये या करारासाठी चर्चेची पाचवी फेरी पूर्ण केली. चर्चेच्या पुढील फेरीसाठी अमेरिकेचे पथक ऑगस्टच्या उत्तरार्धात भारत दौऱ्यावर येणार आहे.

## चार धाम यात्रेदरम्यान यंदा चार हेलिकॉप्टर अपघात



**नवी दिल्ली :** चार धाम यात्रेदरम्यान गेल्या पाच वर्षांत सहा हेलिकॉप्टर अपघात झाले असून, त्यापैकी चार अपघात या वर्षी जूनपर्यंत झाले आहेत. नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) चार धाम यात्रेसाठी हेलिकॉप्टर ऑपरेशनचे अतिरिक्त निरीक्षण आणि सुरक्षा ऑडिट सुरू केले आहे, अशी माहिती नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोमवारी राज्यसभेत लेखी उत्तरात दिली. २०२२ आणि २०२३ मध्ये प्रत्येकी एक अपघात झाला होता, तर २०२१ आणि २०२४ मध्ये चार धाम यात्रेदरम्यान एकही अपघात झाला नव्हता. मात्र, यावर्षी जूनपर्यंत चार हेलिकॉप्टर अपघात झाले आहेत, अशी माहिती मंत्र्यांनी दिली.

## ईशनिंदाच्या आरोपाखाली ख्रिश्चन व्यक्तीला अटक

**लाहोर :** पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात ईशनिंदाच्या आरोपाखाली एका ख्रिश्चन व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात लाहोरच्या निशात कॉलनीत ही घटना घडली होती. सनूर अली या मुस्लीम व्यक्तीच्या तक्रारीवरून आमीर मसीहला अटक करण्यात आल्याची माहिती जुलिफ्कार अली या पोलिस अधिकाऱ्याने दिली.

# अपघातग्रस्त विमानाचा संपूर्ण डाटा डीकोड




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अहमदाबाद एअर इंडिया विमान अपघात आणि तपासाबाबत विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी आज (दि.२१) राज्यसभेत दिली. अपघातग्रस्त विमानाच्या ब्लॅक बॉक्समधून संपूर्ण डाटा एएआयबीने यशस्वीरित्या डीकोड केला आहे, असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, अहमदाबाद विमान अपघाताच्या तपासासाठी आंतरराष्ट्रीय प्रोटोकॉलनुसार संपूर्ण प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यात संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील आवश्यक संस्थांचा समावेश करण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यातील तपास पूर्ण झाला असून प्राथमिक अहवाल सरकारकडे सादर करण्यात आला आहे. या प्रकरणात "ब्लॅक बॉक्स" म्हणजेच फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉपिट व्हॉईस रेकॉर्डर यांची भूमिका महत्त्वाची असते. पूर्वी अशा घटनांमध्ये ब्लॅक बॉक्समध्ये काही नुकसान झाल्यास आपल्याला ते मूळ उत्पादक देशात पाठवूनच माहिती डिकोड करावी लागायची.

मात्र, यावेळी भारताने पहिल्यांदाच ठाम भूमिका घेतली आणि अपघातग्रस्त ब्लॅक बॉक्सचे विश्लेषण देशातच केले आणि यशस्वीरित्या सर्व माहिती प्राप्त केली, असे त्यांनी सांगितले.

एआयबीने फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉपिट व्हॉईस रेकॉर्डरमधून मिळालेली माहिती एकत्र करून प्राथमिक अहवाल तयार केला. या अहवालात "काय घडलं" यावरच भर देण्यात आला आहे. "कसं आणि का घडलं" यासंबंधी अंतिम निष्कर्ष अंतिम अहवालात मांडले जातील. त्यामुळे कोणत्याही निष्कर्षावर पोहोचण्यासाठी अंतिम अहवालची वाट पाहणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. काही माध्यमांनी, विशेषतः पाश्चिमात्य प्रसारमाध्यमांनी, वेगवेगळ्या गोष्टींचं भांडवल केले आहे. मात्र, एआयबी पूर्णतः पारदर्शक व निष्पक्षपणे तपास करत आहे. यात वैमानिक, बोईंग, एअर इंडिया किंवा इतर कोणत्याही घटकांविषयी पूर्वग्रह न ठेवता फक्त वस्तुस्थितीवर आधारित तपास चालू आहे. जगभरात अशा घटना घडल्यावर आयसीएओच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित देशांमध्येही तपास केला जातो आणि अंतिम अहवालानंतरच दुरुस्तीची शिफारस केली जाते. भारतातही ही आंतरराष्ट्रीय प्रक्रिया संपूर्ण निष्ठेने व काटेकोरपणे पाळली जात आहे, असे नायडू यांनी सांगितले.



# नाटोच्या बैठकीपूर्वी युक्रेनवर मोठा हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** रशियाने युक्रेनची राजधानी कीव्हवर गेल्या काही महिन्यांतील सर्वात मोठा हवाई हल्ला केला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा नवा शस्त्रास्त्र करार आणि युक्रेनला नाटो मित्रराष्ट्रांच्या लष्करी पाठिंब्यावर चर्चा होणार असून, सोमवारपासून नाटो सदस्य देशांच्या महत्त्वपूर्ण व्हर्च्युअल बैठकीपूर्वी हा हल्ला करण्यात आला आहे. रशियाच्या हल्ल्यात दोन जण ठार तर १५ जण जखमी झाले होते. हा हल्ला सुमारे ६ तास चालला. यावेळी रशियाकडून ४२६ ड्रोन आणि २४ क्षेपणास्त्रे डागण्यात आली. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याला दुजोरा दिला असून देशाला अत्याधुनिक हवाई संरक्षण यंत्रणेची तातडीने गरज असल्याचे म्हटले आहे.

युक्रेनच्या हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, रशियाने एकूण २४ ड्रोनसह कीव्हवर ४२६ क्षेपणास्त्रे डागली. त्यापैकी २०० ड्रोन रोखण्यात आले आणि २०३ जॅम झाले किंवा रडारवरून गायब झाले. रात्री १२ वाजता सुरू झालेला हा हल्ला सकाळी ६ वाजेपर्यंत चालला. किव्हच्या अनेक भागात स्फोट, ड्रोन आणि मशीनगनच्या गोळीबाराचे आवाज ऐकू आले. एका भागातील बालवाडी, सुपरमार्केट आणि गोदामांना आग लागली. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे विशेष दूत कीथ केलॉग सोमवारपासून कीव्हमध्ये असताना हा हल्ला झाला.

रशियाने युक्रेनची राजधानी कीव्हवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नाटो सोमवारपासून युक्रेन संकटावर महत्त्वाची बैठक घेणार आहे. ब्रिटनचे संरक्षणमंत्री जॉन हिली आणि जर्मनीचे संरक्षणमंत्री बोरिस पिस्टोरियस या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसेथ, नाटोचे प्रमुख मार्क रुटे आणि नाटोचे युरोपियन कमांडर जनरल ॲलेक्सस ग्रिन्केविच हेही या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. ब्रिटनने एका निवेदनात म्हटले आहे की, रशियाला चर्चेच्या टेबलावर आणण्यासाठी ५० दिवसांची विशेष लष्करी मोहीम पुकारतील. ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात रशियाला शस्त्रसंधीसाठी ५० दिवसांची मुदत दिली असून, अन्यथा कठोर निर्बंधांना सामोरे जावे लागेल, असा इशारा दिला होता.

# बांगलादेशात शाळेवर विमान कोसळले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशात मोठा विमान अपघात झाला आहे. येथे हवाई दलाचे प्रशिक्षण विमान कोसळून एका महाविद्यालयाच्या माथ्यावर कोसळले. ढाक्याच्या उत्तर उत्तरा भागात सोमवारी दुपारी हा अपघात झाला. बांगलादेशाचे लष्कर आणि अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी याला दुजोरा दिला आहे. अपघाताच्या वेळी मुले शाळेच्या आवारात उपस्थित होती.

ढाक्याच्या उत्तर भागातील माइलस्टोन स्कूल अँड कॉलेजच्या कॅम्पसमध्ये दुपारी विमान कोसळून एकाचा मृत्यू झाला. बांगलादेश लष्कराच्या जनसंपर्क कार्यालयाने एका संक्षिप्त निवेदनात दुर्घटनाग्रस्त विमान एफ-७ हवाई दलाचे असल्याची पुष्टी केली आहे. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला असून चार जण जखमी झाले आहेत, अशी माहिती अग्निशमन दलाच्या अधिकारी लिमा खान यांनी दूरध्वनीवरून दिली. या अपघाताचा जो व्हिडिओ समोर आला आहे तो अतिशय भयावह आहे. हे विमान शाळेच्या आवारात पडताच गोंधळ उडाला असल्याचे दिसून येत आहे. लोक जीव मुठीत धरून पळताना दिसत आहेत. त्याचवेळी ज्या इमारतीवरून विमानाची धडक झाली, त्या इमारतीतून धूर आणि आग उठताना दिसत आहे. १२ जून रोजी अहमदाबादमध्ये विमान कोसळले होते. फरक एवढाच की ते प्रवासी विमान होते. विमानातील सर्व प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला.



**खार्किव, युक्रेन** युक्रेनमधील खार्किव प्रदेशात एका युक्रेनियन सैनिकाने रशियन ड्रोनवर अँटी-एअरक्राफ्ट मशीन गनने गोळीबार केला, त्यावेळी टिपलेले हे छायाचित्र.

# महिलांच्या सुरक्षेसाठी रेल्वे स्थानकांवर विशेष यंत्रणा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशात महिलांवरील गुन्हे रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले असून, मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व नवी दिल्लीसह ७ प्रमुख रेल्वे स्थानकांवर आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आधारित फेसियल रिकग्निशन प्रणाली (एफआरएस) बसवली जाणार आहे. या योजनेचा उद्देश महिलांच्या सुरक्षेला बळकटी देणे आहे.

सुप्रीम कोर्ट महिला वकील संघटनेने दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या पार्श्वभूमीवर गृह मंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ही माहिती देण्यात आली. गृह मंत्रालयाने नमूद केले आहे की, नॅशनल डेटाबेस ऑन सेक्शुअल ऑफेंडर्स मध्ये सध्या २० लाखांहून अधिक गुन्हेगारांची नोंद करण्यात आली आहे.

रेल्वे स्थानकांव्यतिरिक्त, दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, अहमदाबाद, बेंगळुरू, हैदराबाद आणि लखनऊ या आठ मेट्रो शहरांमध्ये 'सेफ सिटी' प्रकल्प राबवण्यात येत आहेत. या प्रकल्पांतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे, फेसियल रिकग्निशन, ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन, स्मार्ट लाईटिंग आणि ड्रोनच्या माध्यमातून उच्च जोखमीच्या भागांवर २४ तास लक्ष ठेवले जात आहे. गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, एकत्रित आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थापन प्रणाली सध्या देशातील ९८३ प्रमुख रेल्वे स्थानकांपैकी ४९९ स्थानकांवर कार्यरत आहे. कोकण रेल्वे नेटवर्कमधील ६७ स्थानकांवर ७४० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, एआय आधारित देखरेख प्रणाली आणखी विस्तारित केली जाणार आहे.

एनडीएसओ डेटाबेसमध्ये बलात्कार, सामूहिक बलात्कार, छेडछाड, स्त्रीविरोधी वक्तव्ये आणि बाल लैंगिक शोषण यासारख्या गुन्ह्यांच्या आरोपींची संपूर्ण माहिती – नाव, पत्ता, फोटो आणि बोटांचे ठसे – समाविष्ट आहे. ही माहिती पोलिस ठाण्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या उपाययोजनांनंतरही, सुप्रीम कोर्ट महिला वकील संघटनेच्या वरिष्ठ वकील महालक्ष्मी पवनी यांनी आपल्या प्रत्युत्तरात म्हटले आहे की, हे उपाय अपुरे आहेत. एका आकडेवारीनुसार, २०१८ मध्ये ५८.८ प्रति लाख असलेले महिलांवरील गुन्हे २०२२ मध्ये ६६.४ प्रति लाखांवर पोहोचले. २०२२ मध्ये महिलांवरील २३.६६ लाख प्रलंबित गुन्ह्यांपैकी फक्त १.५ लाख प्रकरणांमध्ये निकाल लागला असून, केवळ ३८१३६ प्रकरणांतच दोषारोप सिद्ध झाले असल्याची माहिती त्यांनी दिली.

# विकासासाठी स्पर्धांचे आयोजन महत्वपूर्ण

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** उद्याच्या भारताचे आधारस्तंभ असलेल्या युवापिढीच्या उत्तम आरोग्यासह शारीरिक, मानसिक तंदुरुस्तीच्या माध्यमातून सर्वांगीण विकास आणि पर्यावरणाच्या रक्षणाच्यादृष्टीने सायकल स्पर्धांचे आयोजन महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी केले.

गदिमा सभागृहात पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया नवी दिल्ली व सायकल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे ते बारामती दरम्यान आयोजित राष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव मनिंदर सिंह, सायकल असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाटचालीचे कौतुक करून पाटील म्हणाले, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया नवी दिल्ली व सायकल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे ते बारामती दरम्यान आयोजित राष्ट्रीय सायकल स्पर्धेत राष्ट्रीयस्तरावरील ५०० पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत अपेक्षित यश न मिळालेल्या खेळाडूंनी हार न मानता, खचून न जाता उमेदीने, जोमाने तयारी केली पाहिजे. ही स्पर्धा यशस्वीपणे आयोजन केल्याबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे पाटील यांनी अभिनंदन केले.

मंत्री भरणे म्हणाले, सायकल स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाबाबत प्रबोधन करण्यासोबतच सायकल वापराचे महत्त्व समाजातील घटकांना व्हावे, याकरिता पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या दरवर्षी या स्पर्धेचे यशस्वीपणे आयोजन करण्यात येतात. जीवनात यशस्वी होण्याकरिता प्रचंड मेहनत करा, असा सल्ला यावेळी त्यांनी युवकांना दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या शिक्षण मंडळाची यशस्वीपणे वाटचाल सुरु असून यापूढेही प्रगती व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केले. त्यांच्या नेतृत्वाखाली बारामती तालुक्यासह जिल्ह्यातील विविध विकास कामे मार्गी लागत आहेत, असेही ते म्हणाले. मानद सचिव ॲड. संदीप कदम यांनी आपल्या प्रास्ताविकात सायकल स्पर्धेच्या वाटचालीबाबत माहिती दिली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी श्री छत्रपती साखर कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरूषोत्तम जगताप, माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्ष संगीता कोकरे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, खेळाडू, शिक्षक उपस्थित होते.

## सानवीचे ट्रॅक्टर चालविण्याचे धाडस



**सासवड :** सानवी शिवाजी पवार (वय ८, रा. सुपे ता. पुरंदर ) ही सासवड येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत इयत्ता दुसरीत शिकत आहे. छोट्या सानवीने चक्क ट्रॅक्टर चालविण्याचे धाडस केले आहे. गेली सहा महिन्यांपासून ती ट्रॅक्टर चालवत आहे. शेतात भात लागवड करण्याची तयार सुरू असताना सानवी ट्रॅक्टर चालवत असलेला व्हिडिओ सर्वत्र व्हायरल होत असून तिचे कौतुक होत आहे. एवढेच नव्हे तर सानवी बैलगाडी देखील चालवते. सानवी ही अभ्यासात देखील हुशार असल्याचे वर्गशिक्षिका माधुरी जगताप यांनी सांगितले. सानवीचे वडील शिवाजी पवार, आई दिपाली पवार हे दोघंही शेती करतात. सानवीला शेतीकामाची आवड असल्यामुळे सुट्टीच्या दिवशी ती शेतात आई - वडिलांना शेतीकामात मदत करते. फळे काढणे, भुईमूग काढणे यासारख्या कामात ती मदत करत असते. सानवीच्या ट्रॅक्टर चालविण्याच्या धाडसाबद्दल शाला समितीचे अध्यक्ष ॲड .सागर नेवसे, महामात्र प्रा. सुधीर भोसले, शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे, सर्व शिक्षक, पालकवर्ग यांनी तिचे कौतुक केले आहे. अशी माहिती नरेंद्र महाजन यांनी दिली.

## कात्रज डेअरीच्या वतीने जनावरांची मोफत तपासणी

**जेजुरी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्हा दुध संघ वतिने संपुर्ण पुणे जिल्हातील सहकारी दुध संस्थेतील सभासदांच्या दुध उत्पादकांच्या जनावरांची मोफत आरोग्य तपासणी आणि उत्पादन वाढीसाठी जनावरांना हानिकारक असलेल्या जंत व गोचिड औषध मोफत दिली जात आहे. संघाचे चेअरमन अड स्वप्नील ढमढेरे, व्हाईस चेअरमन तानाजी जगताप, सर्व संचालक मंडळ आणि संघाचा इनपुट विभागाच्या वतिने जिल्हयात राबविण्यात येत आहे. पुरंदर तालुक्यातील माहुर, वाल्हे, नाझरेसुपे, निरा,, माळशिरस, भोसलेवाडी, नावळी, साकुर्डे, वाल्हे या ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीरामध्ये दुध उत्पादकांच्या जनावरांची तपासणी व आजाराचे निदान केले जात आहे. कात्रज पशुखादय, कडबा कुटटी, मिल्कींग मशिन, मिनरल मिक्सर, चारा, वि बियाणे, मुरघास, कुत्रिम रेतन, पशुवैदयकिय औषधे, आयव्हीएफ सेवा, जंतनिर्मुलन, स्वच्छ दुध, सेंद्रिय खते ही सर्व माहिती शेतक-याच्या गाय गोठ्यावर दिली जाते अशी माहिती उपाध्यक्ष तानाजी जगताप यांनी दिली. नाझरे, सुपे येथे पुरंदर पंचायत समितीचे माजी अध्यक्ष माणिक झेंडे पाटील, संघाचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, दत्ता कदम, कापरे, डॉ. वीर, राजु म्हस्के, दादा नाझीरकर यांच्या हस्ते पशू पालकांना औषधांचे वाटप करण्यात आले.

## गट व गण रचना जाहिर होताच आखाड पार्ट्यांना जोर

**कारेगाव :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकासाठी गट व गण रचना जाहिर झाल्याने आषाढ महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात इच्छुक उमेदवारांकडून आखाड साजरा करुन एकप्रकारे निवडणूकीचे रणशिंग फुंकल्याचे दिसून येत आहे. त्यातूनच तालुक्यातील इच्छुक उमेदवारांनी आपापली राजकीय ताकद दाखवण्याचे कसब पणाला लावले आहे. त्यातच बऱ्याच दिवस गायब झालेले काही पदाधिकारी व इच्छुक उमेदवार आता मात्र कार्यक्रमांना हजेरी लावत त्यांचे अनपेक्षितपणे दौरे गावोगावी सुरु झाले आहेत. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर काही इच्छुक आखाडात 'स्नेहीजणांसोबत संवाद' या नावांखाली गटातील प्रमुख गावागावात होणाऱ्या भव्य संवाद कार्यक्रमांमधून प्रत्यक्षात राजकीय गटबाजी, शक्तिप्रदर्शन व मतदारांवर प्रभाव टाकण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. गेल्या काही दिवसांत तालुक्यातील विविध गावांमध्ये नामांकित मंगल कार्यालये, लॉन्स, आणि खुले मैदान यामध्ये या कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. यामध्ये गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक मंडळी, वयोवृद्ध नेते, महिलावर्ग आणि युवकांचा मोठा सहभाग दिसून येत आहे. या कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून “हा एक स्नेहसंवाद आहे, आम्ही कोणतेही राजकारण करत नाही,” असा सुर आळवला जात असला तरी या कार्यक्रमांची भव्यता, आयोजकांची उपस्थिती, वक्तृत्व आणि पार्श्वभूमी पाहता स्पष्टपणे लक्षात येते की यामागे निवडणूक तयारीचा मोठा डाव आहे. प्रत्येक भोजन सोहळा हा एकप्रकारचा गटप्रदर्शनाचा मंच झाला आहे. या स्नेहभोजनाच्या निमित्ताने इच्छुक उमेदवार कोणत्या गटात आहेत, कोणत्या राजकीय नेत्यांच्या पाठींब्यावर उतरणार आहेत, हे जाहिर पणे समोर येत आहे, या संवाद कार्यक्रमाला काही ठिकाणी माजी आमदार, स्थानिक आजी माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य यांचाही पाठिंबा मिळवत हे इच्छुक आपल्या उमेदवारीची दावेदारी करत एकप्रकारे निवडणुकीचे रणशिंग फुंकत असल्याचे दिसून येत आहे. सध्या निवडणूक आचारसंहिता लागू नसल्याने उमेदवार खुलेपणाने अशा कार्यक्रमांचे आयोजन करून मतदार आणि जवळच्या मित्र परिवारांना आखाड पार्टी देत आहे. राजकीय दृष्टिकोनातून हे कार्यक्रम कितपत परिणामकारक ठरणार हे येत्या काही महिन्यांत स्पष्ट होईल. सध्या मात्र शिरूर तालुका हे निवडणूकपूर्व राजकीय हालचालींचे केंद्र बनले असून प्रत्येक गावात ‘गट’ आखले जात आहेत आणि प्रत्येक इच्छुक ‘गण’सह रिंगणात उतरण्यास सज्ज झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# बारामतीत कामगार न्यायालयाची दादांकडे मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती एमआयडीसी सह परिसरात औद्योगिक विकास झपाट्याने होत असून कामगारांची संख्या प्रचंड वाढली आहे. औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक कामगार न्यायालय बारामती मध्येच स्थापन करावे अशी मागणी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली असल्याची माहिती बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी दिली. अजितदादा पवार यांना सहयोग निवास्थानी याविषयी निवेदन देताना कार्यकारणी सदस्य खंडूजी गायकवाड, संभाजी माने, महादेव गायकवाड व रियल डेअरीचे मनोज तुपे उपस्थित होते.



धनंजय जामदार म्हणाले बारामती तालुक्यात पन्नास हजाराहून अधिक नोंदणीकृत कामगारांची संख्या आहे. असंघटित व इतर कामगारांची संख्या देखील मोठी आहे. वाढत्या औद्योगिकरणाबरोबरच कंपन्या व कामगारांमध्ये न्यायालयीन दावे दाखल करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. सध्या कामगार न्यायालय पुण्यात असलेने कंपन्या व कामगारांना लहान मोठ्या न्यायालयीन कामासाठी पुण्याला हेलपाटे मारावे लागतात. यामध्ये वेळ पैसा वाया जात असून मनस्ताप सहन करावा लागत आहे. पाठपुरावा कमी पडल्यास अनेकदा न्याय मिळण्यास विलंब होतो अथवा न्यायापासून वंचित रहावे लागते यासाठी बारामतीमध्येच कामगार न्यायालय सुरू करणे आवश्यक असल्याचे धनंजय जामदार यांनी सांगितले.

बारामतीमध्ये कामगार न्यायालय स्थापन केल्यास बारामती सह इंदापूर दौंड पुरंदर औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या व हजारो कामगारांना बारामती या मध्यवर्ती ठिकाणी न्यायालयीन सुविधा उपलब्ध होईल. याबरोबरच पुण्यातील कामगार न्यायालया वरील कामाचा अतिरिक्त ताण कमी होऊन जलदगतीने प्रकरणे मार्गी लागतील असेही धनंजय जामदार यांनी सांगितले. बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनने कामगार न्यायालय बारामती येथे स्थापना करण्याच्या मागणीबाबत आपण सकारात्मक आहोत. या प्रस्तावावर मंत्रालय स्तरावर योग्य तो विचार केला जाईल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी शिष्यमंडळाला दिली.

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती, सभापतीपदी प्रकाश जगताप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** पुणे जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात सर्वाधिक लक्षवेधी ठरलेल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी प्रकाश चंद्रकांत जगताप यांची बिनविरोध निवड झाली आहे.प्रकाश जगताप यांच्या निवडीने त्यांनी एकेकाळी स्वकीय असलेल्या सहकाऱ्यांसह, हवेली तालुक्यातील सहकार क्षेत्रावर अनेक वर्षे मांड टाकून बसलेल्या नेत्यांना धोबीपछाड डाव टाकल्याची चर्चा तालुक्यात आहे.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांनी सभापतीपदाचा राजीनामा दिल्यानंतर तालुक्यातून सभापतीपदी कोणाची वर्णी लागणार म्हणून तालुक्यात चर्चेचा धुरळा उडला होता.अगदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यापर्यंत हे पद मिळावे म्हणून तालुक्यातून पळापळ सुरू होती. अखेर संचालक मंडळातील विद्यमान १२ संचालकांनी प्रकाश जगताप यांच्या मागे ठाम राहण्याची भूमिका घेत त्यांना सभापती करण्यात यश मिळवले. शुक्रवार (दि. १८) रोजी सभापतीपदासाठी केवळ प्रकाश जगताप यांचाच अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली अशी घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांनी जाहीर केले.

पुणे बाजार समिती व यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी दोन सख्खे भाऊ कारभार सांभाळणार म्हणून बाजार समितीच्या निवड प्रक्रिये आधीच तालुक्यात विरोधकांकडून मोठा गदारोळ सुरू करण्यात आला होता. तालुक्यात दोन सख्खे भाऊ दोन महत्वाचा संस्थांवर कशासाठी असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मात्र, हा सर्व कडवट विरोध मोडीत काढीत जगताप यांनी आपण सहकारातील बिरबल असल्याचे दाखवून दिले आहे.

## मिलिंद खुडे व शिल्पा खुडे यांना पुरस्कार प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील उद्योजक मिलिंद खुडे व शिल्पा खुडे यांना "एक्सलन्स इन स्पाइसेस अँड पीकल्स" हा पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते देण्यात आला. विकसित भारत २०४७- अ व्हिजन ऑफ न्यू इंडिया या अभियानांतर्गत आयोजित केलेल्या "विकसित भारत २०२५ लीडरशिप समिट" हा कार्यक्रम ताजमहल हॉटेल नवी दिल्ली येथे दि. १७ जुलै रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये देशातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या उद्यामींचा सत्कार करण्यात आला

यामध्ये "एक्सलन्स इन स्पाइसेस अँड पीकल्स" हा पुरस्कार अवसरी खुर्द येथील निती स्पायसेस अँड पीकल्स प्रा. लि. ह्या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर मिलिंद नीलकंठ खुडे व डायरेक्टर शिल्पा मिलिंद खुडे यांना देशाचे केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. केंद्रीय मंत्री देवेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री हसमुख मांडविया, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय मंत्री जितन मांझी, केंद्रीय मंत्री चिराग पासवान, केंद्रीय मंत्री सुकांता मुजुमदार, विजयकुमार सिन्हा, सम्राट चौधरी, मंगल पांडे व परमार्थ निकेतन आश्रम ऋषिकेशचे अध्यक्ष चिदनानंदा सरस्वती यांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा पार पडला. आंबेगाव तालुक्यातील उद्योजकाला मिळालेल्या या पुरस्कारामुळे तालुक्याचा गौरव वाढला असून मिलिंद खुडे व शिल्पा खुडे यांचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.




# अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आंबेगाव तालुक्यात २२ ते ३० जुलै या दरम्यान जनविश्वास सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या दरम्यान वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, युवा संकल्प शिबिर, महिला सक्षमीकरण मेळावा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजीमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

मंचर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत वळसे पाटील यांनी जनविश्वास सप्ताहाची माहिती दिली. ते म्हणाले मंगळवार दि. २२ रोजी नालंदा इंग्लिश स्कूलमध्ये वृक्षदिंडी काढून वृक्षारोपण केले जाणार आहे. बुधवारी शासन आपल्या दारी हा कार्यक्रम लोणी येथे होईल. तसेच तालुक्यातील प्रत्येक गावात झाडांचे वाटप करण्यात येणार आहे. गुरुवारी लांडेवाडी येथे वृक्षारोपण होईल. कळंब, पारगाव, टाकळी हाजी, रांजणगाव, मंचर, भराडी, खडकी,चांडोली बुद्रुक, पाबळ, पारगाव तर्फे खेड, डिंभें, काठापुर, वळती, थोरांदळे, पिंपळगाव तर्फे महाळुंगे या गावांमध्ये विविध दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी मंचर येथे युवा संकल्प शिबिर होणार असून शहरातून रॅली काढत शिवगिरी मंगल कार्यालयात गणेश शिंदे हे मार्गदर्शन करणार आहेत. बुधवार दि ३० रोजी मंचर उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य शिबिर तसेच लांडेवाडी येथे मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत महिला सक्षमीकरण मेळावा होणार असल्याची माहिती वळसे पाटील यांनी दिली.

या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष विष्णू काका हिंगे यांनी केले आहे. यावेळी भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, शरद बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, संचालक अजय घुले, सुभाष मोरमारे, सभापती निलेश स्वामी थोरात, सुनील बाणेखेले, संजय गवारी, रवींद्र करंजखेले आदी उपस्थित होते.

# अलंकापुरीत माऊलींचे हरिनाम गजरात आगमन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आषाढी पायी वारी सोहळ्या अंतर्गत श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या वैभवी पादुका पालखी सोहळ्याचे परंपरेने माऊली मंदिरात हरिनाम गजरात आगमन झाले. हजारो वारकरी भाविकांचे उपस्थितीत सोहळा हरिनाम गजरात आळंदीत परतला. यावर्षी लाखो भाविकांचे उपस्थितीत पायी वारी सोहळा राज्यात साजरा करण्यात आला. पंढरीत श्रीविठ्ठल देव भेट, गोपाळपुर काला उरकून श्रींचे वैभवी पादुका पालखी सोहळ्याचे हजारो भाविक, वारकरी, नागरिकांच्या उपस्थितीत हरीनाम जयघोषात अलंकापुरीत आगमन झाले. परंपरेने सोमवारी (दि. २१) आळंदीत आषाढी एकादशी सोहळा हरिनाम गजरात साजरा होत आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा आळंदीतील एक दिवसाचे पाहुणचार घेत सोमवारी देहू नगरीकडे परतीचे प्रवासास वाटचाल करेल.

ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे परंपरेने आळंदी मंदिरात पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, राजेंद्र आरफळकर, ऋषिकेश आरफळकर यांचे प्रमुख उपस्थितीत श्रींचे पादुका आळंदी देवस्थानकडे वारीहून आल्यानंतर परंपरेने सुपूर्द करण्यात आल्या. श्रींचे पादुका पालखी मंदिर प्रदक्षिणा झाल्यानंतर विना मंडपातून माऊलींचे मंदिरात सोहळा आरतीने विसावला. तत्पूर्वी माऊली मंदिरातून श्रींचे स्वागत प्रथा परंपरेने दिंडी हरिनाम गजरात पालखी सोहळ्यास सामोरी जात महानैवेद्य झाला. अभंग हरिनाम गजरात सोहळ्याचे स्वागत व आगमन झाले.

सोहळा आळंदीत प्रवेश प्रसंगी पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, राजेंद्र आरफळकर, आळंदी देवस्थानचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख भावार्थ देखणे, प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, वेदमूर्ती चक्रांकित महाराज यांचे वंशज हंसराज चक्रांकित, अवधूत चक्रांकित, व्यवस्थापक माऊली वीर, मानकरी माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर पाटील, योगीराज कु-हाडे, योगेश आरु, ज्ञानेश्वर दिघे, विठ्ठल घुंडरे, श्रींचे सेवक चोपदार बाळासाहेब रणदिवे, राजाभाऊ रंधवे चोपदार, उद्धव रणदिवे चोपदार, ज्ञानेश्वर गुळुंजकर,संजय रणदिवे, तुकाराम माने, भीमराव घुंडरे,ज्ञानेश्वर घुंडरे, नगारखाना सेवक मानकरी बाळासाहेब भोसले, सचिन घुंडरे, विवेक घुंडरे, विनायक घुंडरे, सचिन कुऱ्हाडे, महेश केदारी, महादेव रत्नपारखी, ज्ञानेश्वर पोंदे, आळंदीचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, चरित्र संतीचे अध्यक्ष प्रकाश काळे यांचे सह मानकरी, दिंडीकरी, वारकरी भाविक उपस्थित होते. आळंदी मंदिरात ज्ञानेश्वर महाराज यांचे वैभवी पादुका आल्यानंतर श्रींचे संजीवन समाधी मंदिरात आरती झाली. आळंदीत पालखी सोहळ्याचे स्वागतास भाविकांनी रस्त्याचे कडेला दुतर्फा उभे राहून गर्दी करीत हरिनाम जयघोषात स्वागत केले. यावर्षी पालखी सोहळ्यावर कोणतेही निर्बंध नसल्याने सोहळा मोठ्या आनंदी उत्साही मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. माऊली मंदिरात आळंदी देवस्थानचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख भावार्थ देखणे, प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विश्वस्त निलेश लोंढे महाराज, पुरुषोत्तम महाराज पाटील, रोहिणी पवार, राजेंद्र उमाप, व्यवस्थापक माऊली वीर यांचेसह भाविक, वारकरी उपस्थित होते.



भाविकांना विविध ठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. आळंदीतील प्रथा परंपरांचे पालन करीत श्री नरसिव्ह सरस्वती स्वामी महाराज यांचे मूळपीठ येथे ह.भ.प. अवधूत महाराज चक्रांकित आणि परिवाराचे वतीने पिठलं भाकरी चा महाप्रसाद परंपरेने वाटप करण्यात आला. यासाठी भाविकांनी मोठी परंपरा जोपासत महाप्रसादास गर्दी केली. अनेक दिवसांचे विरहानंतर श्रींचे पालखी सोहळा आळंदीत येताच येथे चैतन्य अवतरले. मोठ्या ज्ञानभक्तीमय वातावरणात आळंदीकरांचे वतीने सोहळ्याचे स्वागत आळंदी देवस्थान व ग्रामस्थांचे वतीने व्यवस्थापक माऊली वीर, आळंदी नगरपरिषद प्रशासक मुख्याधिकारी माधव खांडेकर, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विश्वस्त प्रकाश काळे, अध्यक्ष सुरेश वडगावकर, माजी नगरसेवक अशोक उमरगेकर, श्रीधर कुऱ्हाडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, बापूसाहेब पठारे, सतीश नांदुरकर, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे, आजी, माजी पदाधिकारी, विविध सेवाभावी संस्था, संघटना यांचे वतीने करण्यात आले. यावेळी वारकरी शिक्षण संस्थेच्या शालेय मुलांनी रस्त्याचे दुतर्फा उभे राहून तसेच सोहळ्यात धाकट्या पादुका ते आळंदी असा प्रवास करीत सोहळ्याचे हरिनाम गजरात स्वागत केले. या पालखी सोहळ्यात सर्व प्रकारच्या सेवा सुव्यवस्थित आणि सुसज्ज व्यवस्था, भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात देत सोहळ्याचे चोख नियोजन झाल्याने कोणीही आजारी पडले नाही. उत्साही आनंदात पायी वारी करीत सोहळा आळंदीत आल्याचे उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सांगितले. हजारो वारकरी भाविकांचे उपस्थितीत सोहळाचे स्वागत ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अँड विष्णू तापकीर यांनी केले. यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे पदाधिकारी उपस्थित होते. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थांनचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र आरफळकर, राजाभाऊ चोपदार, बाळासाहेब चोपदार, राजाभाऊ चौधरी यांचा संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अँड विष्णू तापकीर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, उपरणे देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. ट्रस्टचे खजिनदार दत्तात्रय गायकवाड, मनोहर भोसले, हिरामण बुर्डे, ह भ प रमेश महाराज घोंगडे, राजेंद्र नाणेकर , बाळासाहेब चव्हाण, साहेबराव काशीद, माजी महापौर नितीन अप्पा काळजे आदी उपस्थित होते. दिघी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बापूसाहेब ढेरे यांनी प्रभावी बंदोबस्त ठेवला होता. परिसरातील भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी करून दर्शन घेतले. मंदिर समितीचे वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत सुशोभित रांगोळीच्या पायघड्या टाकीत लक्ष वेधले. मंदिरात लक्षवेधी रंगावली व पुष्प सजावट करण्यात आली होती.

## श्री मल्हार शिक्षण मंडळाच्या अध्यक्षपदी चंद्रलेखा जगताप



**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील कोथळे येथील श्री मल्हार शिक्षण मंडळाची पदाधिकारी निवडीची बैठक संपन्न झाली . या बैठकीत अध्यक्षपदी चंद्रलेखा रामराव जगताप व उपाध्यक्षपदी अँड धनंजय भोईटे यांची निवड करण्यात आली. पुरंदर तालुक्यातील उत्कृष्ट शैक्षणिक दर्जा असणाऱ्या श्री मल्हार शिक्षण मंडळाची नूतन कार्यकारिणी पुढील प्रमाणे, अध्यक्ष चंद्रलेखा जगताप, उपाध्यक्ष अँड धनंजय भोईटे, सचिव ज्ञानेश्वर जगताप, खजिनदार विजय विलास जगताप, सहसचिव तुषार खैरे. या बैठकी वेळी शंकर नांना जगताप, सतीश शिंदे, प्रमोद जगताप, पांडुरंग अण्णा जगताप, वंदना जगताप, रवींद्र अण्णा जगताप, पोपट भोसले, देवेंद्र जगताप, गोरख जगताप आदी उपस्थित होते. नवनिर्वाचित उपाध्यक्ष अँड. धनंजय भोईटे यांनी संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी, शाळेची पटसंख्या वाढीसाठी तसेच संस्थेची प्रगती करण्यासंदर्भात प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. सर्व पदाधिकाऱ्यांचे संस्थेचे माजी संस्थापक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर भोईटे गुरुजी, वसंत जगताप गावच्या सरपंच जयश्री भोईटे सुनील खैरे यांनी अभिनंदन केले.

## आजारचा प्रादुर्भाव रोखण्याचे पशुपालकांना आवाहन

**लोणी-धामणी :** वडगावपीर (ता. आंबेगाव ) येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी एक यांच्या मार्फत आवाहन करण्यात येत आहे की,सर्वत्र पाऊस झाला असल्याने कीटकांचे प्रमाण वाढलेले आहे त्यामुळे " लंपी " रोगाचा प्रादुर्भाव बऱ्याच ठिकाणी आढळून येत आहे.लंपी रोगावरील लसीकरण आपल्या दवाखान्या मार्फत दीड महिन्यापूर्वीच करण्यात आलेले आहे.तथापि काही शेतकऱ्यांनी गैरसमजामुळे आपल्या जनावरांना लस टोचून घेतलेली नाही.अशा जनावरांना लंपी रोग प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता आहे. तरी आपणास आवाहान करण्यात येते की,ज्या शेतकर्यांच्या जगवरांना लस टोचण्याचे राहिले असतील त्या शेतकऱ्यांनी आपले नाव गाव मोबाईल नंबर व जनावरांची संख्या इत्यादी माहिती त्वरीत वडगावपीर येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी एक या ठिकाणी त्वरीत कळवावी म्हणजे दोन दिवसात नोंदणी करावी जेणेकरून लस मागणी करणे सोपे होईल. ज्यांचे लसीकरण राहिलेले आहे त्या सर्व शेतकऱ्यांनी आपली मागणी त्वरित नोंदवावी यानंतर कोणत्याही स्वरूपात लस उपलब्ध होणार नाही, याची सर्व शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी. लंपी रोगावर उपचार नसल्याकारणाने लसीकरण हाच उपचार आहे. ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांना लस टोचून घेतलेली आहे, त्यांनी पुन्हा नोंदणी करण्याची किंवा लस टोचून घेण्याची गरज नाही, असे पशू वैद्यकिय अधिकारी डॉ. ए एम महाकाळ व माजी सरपंच संजय पोखरकर यांनी कळवले आहे.

## भिवडी येथे जनावरांना लंपीचे लसीकरण

**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे डॉ. मनोज शिंदे मित्र परिवार व श्रीमंत छत्रपती राजे प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद गायकवाड यांच्या वतीने जनावरांना मोफत लंपी आजाराची लस टोचून सर्व पशुपालकांना मोफत औषध वाटप आणि रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिलिंद गायकवाड होते त्यांच्या हस्ते गोपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे व उपाध्यक्ष साकेत जगताप, नारायणपूर, भरत क्षीरसागर व ज्येष्ठ नेते बापूसाहेब माहुरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिपाली पाईकराव यांनी केले, तर उपस्थितीना लंपी आजाराचे व जनरल मार्गदर्शन डॉ बी आर कान्हेरकर यांनी केले. यावेळी पशुपालकांना अत्यावश्यक जनावरांच्या औषधाचे किटचे वाटप करण्यात आले. तसेच गावातील सर्व जनावरांना मोफत जंताचे औषध व इतर लागणारे औषधे वाटप करण्यात आले. खासदार श्रीमंत उदयनराजे महाराज भोसले यांच्याध्यामातून शेतकऱ्यांना सर्वप्रकारचे सहकार्य केले जाईल शेखर वढणे यांनी आश्वासन दिले. डॉ बापू गायकवाड, डॉ. समीर हिवरकर, डॉ बाळासाहेब भोर, डॉ निगडे, डॉ रविराज ताकवले, पंचायत समितीचे कर्मचारी मयूर व सुरेंद्र गायब्रियल यांनी वाडी वस्तीवर जाऊन लसीकरणासाठी सहकार्य केले.

## ज्ञानोबा-तुकाराम पालख्यांचे थोरल्या पादुका मंदिरात हरिनाम गजरात स्वागत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येथील वडमुखवाडीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा प्रथा व परंपराचे पालन करीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्ट मध्ये परतीचे प्रवासादरम्यान विसाव्यास विसावला. हरिनाम गजरात सोहळ्याचे परंपरांचे पालन करीत संस्थान ट्रस्टने स्वागत केले. यावेळी माऊली पादुकासह श्री संत तुकाराम महाराज पादुकाची पुजा आणि आरती श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अँड विष्णू तापकीर यांच्या हस्ते झाली. यावेळी पादुकांना पुष्पहार, तुळशी हार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी चोपदार बंधुच्या वतीने आरती करण्यात आली. यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे पालखी सोहळा प्रमुख डॉ भावार्थ देखणे, संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विश्वस्त विधितज्ञ राजेंद्र उमाप, रोहिणी पवार, पुरुषोत्तम महाराज पाटील, चैतन्य महाराज महाराज कबीरबुवा लोंढे, पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर, राजाभाऊ चोपदार, बबळासाहेब चोपदार बंधुसह मान्यवरांचा सत्कार श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्ट अध्यक्ष अँड विष्णू तापकीर यांच्या हस्ते हरिनाम गजरात झाला. भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली होती.

श्री संत तुकाराम महाराज पालखी आणि पादुकांची आरती श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्ट अध्यक्ष अँड विष्णू तापकीर यांच्या हस्ते झाली. संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, विश्वस्त उमेश महाराज मोरे, दिलीप महाराज मोरे, पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त विक्रमसिंह महाराज मोरे, विश्वस्त गणेश महाराज मोरे, लक्ष्मण महाराज मोरे, वैभव महाराज मोरे यांचा देवस्थानतर्फे शाल, श्रीफळ व उपरणे देऊन ट्रस्ट अध्यक्ष अँड विष्णू तापकीर, खजिनदार दत्तात्रय गायकवाड यांच्या वतीने सत्कार आणि स्वागत करण्यात आले. मंदिरास पुष्प सजावट संतोष वाळके यांच्या वतीने करण्यात आली .मंदिर परिसरात रांगोळी रोहीणी परतगुल्ले यांनी लक्षवेधी काढत भाविकांचे लक्ष वेधले. यावेळी भाविक भक्तांच्या वतीने पालख्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. दर्शनास मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. दर्शनास आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी दिघी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बापुसाहेब ढेरे यांनी पोलीस बंदोबसत तैनात करीत भाविकांना सुरक्षित कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांचे दर्शनाचे नियोजन केले. आळंदीतील स्वकाम सेवा कार्यकारी मंडळाचे वतीने दर्शनबारीचे नियोजन परिश्रम पूर्वक करण्यात आले. देहु संस्थानचे अध्यक्ष जालींदार महाराज मोरे यांचा सत्कार श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्ट अध्यक्ष अँड विष्णू तापकीर यांच्या हस्ते करण्यात आला.

## तिन्हेवाडीत महिलांसाठी जनजागृती अभियान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** तिन्हेवाडी, ता. खेड येथे रविवारी (दि. २०) बिल्ड अवेयरनेस ब्रेक साइलेंस अभियान च्या संस्थापिका सुजाता रविराज इळवे यांनी आत्मविश्वास वाढीसाठी प्रबोधन, आणि महिलांच्या आरोग्य विषयावर जनजागृती या विषयी माहिती दिली.

या अभियानांतर्गत महिला आणि मुलींनी स्वतः मासिक पाळीच्या काळात काय काळजी घेतली पाहिजे, कोणता आहार घेतला पाहिजे, महिलांचे आचरण कसे असावे या संदर्भात जनजागृती केली. महिलांचं वय जसजसं वाढतं तसं शारीरिक आणि मानसिक बदलांना त्यांना सामोरं जावं लागतं. रजोनिवृत्तीच्या काळात होणारे बदल त्रासदायक होवू नयेत यासाठी मेडिटेशन आणि व्यायाम महत्व पटवून दिले व आत्मविश्वास आणि आत्मप्रेम वाढवले पाहिजे हे सांगितले. सहयोग फाउंडेशनचे संस्थापक संदीप पानसरे यांनी मानसिक आरोग्य, स्वसंरक्षण, गुड टच व बॅड टच याबाबतीत मार्गदर्शन केले.

यावेळी तीनशे महिलांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता राजगुरुनगर कामगार कृती समितीचे अध्यक्ष सदाशिव आमराळे, उपाध्यक्ष दत्तात्रय दगडे, रामदास सैंदाणे, सरपंच प्रतिक्षा पाचारणे, उपसरपंच विठ्ठल वरकड, माजी उपसरपंच रंगनाथ आरूडे सर्व सदस्य, सोसायटीचे अध्यक्ष पोपट आरुडे, वैशाली उढाणे व योगिता वाळुंज यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भरत उढाणे यांनी तर आभार चाकण कामगार कल्याण केंद्राचे अधिकारी अविनाश राऊत यांनी मानले. -

## वांद्रे पढरवाडी पर्यटनस्थळी पर्यटकांची प्रचंड गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्यातील वांद्रे पढरवाडी पर्यटन स्थळाने गतवर्षीपासून सुरू झाल्यापासून पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. शनिवार-रविवारच्या सुट्टीच्या दिवशी येथे पर्यटकांची मोठी गर्दी उसळली होती. सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सहकुटुंब पर्यटक, विशेषतः लहान मुलं, येथील सुरक्षित पाण्याचा आनंद लुटताना दिसत आहेत.

रविवारी, महाळुंगे इंगळे येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या ७५ सदस्यांनी या स्थळाला भेट दिली. साठीच्या पुढील या ज्येष्ठांनी पाण्याच्या प्रवाहात "राम कृष्ण हरी, ज्ञानोबा तुकाराम" असा नामजप करत आणि फुगड्या खेळत आनंद साजरा केला. त्याचबरोबर, खेड्यातील डॉक्टर असोसिएशनच्या १०० सदस्यांनीही याच दिवशी या ठिकाणी भेट देऊन आनंद घेतला.

जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शरद बुट्टे पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या पर्यटन स्थळाला राजगुरुनगर, चाकण, पिंपरी-चिंचवड, पुण्याच्या उपनगरांसह इतर जिल्ह्यातील पर्यटकांनी मोठी पसंती दर्शवली आहे. गेल्या ४० दिवसांत तब्बल २० हजार पर्यटकांनी येथे भेट दिली आहे.

विशेष म्हणजे, श्री क्षेत्र कुंडेश्वर आणि वांद्रे पर्यटन स्थळ एकाच पाईट रोडवर असल्याने या भागात पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. यामुळे पाईट, आंबोली, वांद्रे परिसरातील स्थानिक व्यवसायांना चालना मिळाली आहे. हे ठिकाण आता पर्यटकांसाठी एक आदर्श आणि सुरक्षित निवासस्थान बनले आहे.

छायाचित्र : निखिल पाचारणे



## हुतात्मा राजगुरू यांचे राष्ट्रीय स्मारक होण्यास अधिकाऱ्यांचाच अडथळा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** राजगुरूनगर येथे शहीद शिवराम हरी राजगुरू यांच्या राष्ट्रीय स्मारकाला मंजुरी मिळाल्यापासून पहिले काही महिने राजगुरूनगर वासियांकडून आनंद साजरा केला गेला होता. मात्र आधी तब्बल २५० कोटी रुपयांच्या खर्चाने बनणारे स्मारक आता बनण्यास अजून किती उशीर घेणार याची वाट आता स्थानिक पाहून लागले आहेत. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार पूर्वीच्या राजगुरू वाड्याच्या स्थानावर जे राष्ट्रीय स्मारक मंजूर झाले आहे त्या परिसरातील तब्बल ६० ते ६५ परिवार या राष्ट्रीय स्मारकाच्या जागेत आपले घर गमावणार आहेत.

त्यासाठी सरकार ह्या परिवारानां पैसे सुद्धा देण्यास तयारी दाखवत आहे मात्र सरकारने सांगितलेला जागेचा भाव आणि सध्या सुरु असलेला रेडी रेकनर रेट ह्यामध्ये कोणताही ताळमेळ बसतो नसल्याने आम्ही आमच्या जागा द्यायच्या कशा असा प्रश्न आता हे परिवार विचारत आहेत.

सध्या राजगुरूनगरच्या कुंभार आळी परिसरात एका गुंठ्याला किमान २० लक्ष रुपये इतका भाव असल्याने कारणाने समंधित जागेच्या रेडी रेकनर रेट प्रमाणे अडीच पट म्हणजेच किमान ५० लक्ष इतका भाव प्रति गुंठ्याला मिळावा अशी मागणी येथे राहणारे स्थानिक करत आहेत. मात्र स्थानिक प्रशासनाने फक्त २. ७५ हजार रुपये इतकाच भाव मान्य केल्याने आम्ही ह्या राष्ट्रीय स्मारकासाठी आमच्या जागा देणार नाही अशी भूमिका स्थानिकांनी घेतल्याने हे राष्ट्रीय स्मारक ठरवल्या प्रमाणे वेळेत उभे राहणार कि नाही असा प्रश्न आता उभा राहिला आहे, या संधर्भात आम्ही स्वतःहून कोणत्याही अधिकाऱ्याकडे जाणार नसून समंधित अधिकाऱ्यांनी आमच्या कडे येऊन चर्चा करावी असे काही स्थानिकांनी आज सांगितले, तसेच जर आम्ही आमची हयात ह्या परिसरात घालवली मात्र हा वाडा परिसर कधी सोडला नाही, मग आता ह्या प्रकारे पैसे ठरवून प्रशासन आमच्या भावनांशी खेळत आहे का असा सुद्धा प्रतिप्रश्न यावेळी एका स्थानिकाने नाव न सांगण्याच्या अटीवर विचारला.

# मंदिरे, धार्मिक स्थळांचे घुमट गोलाकार का?



आपण अनेक मंदिरांना किंवा मशिदींनी भेट देतो. त्या वेळी लक्षात येते, की धार्मिक स्थळांचे छत नेहमी घुमटाच्या आकाराचे म्हणजे गोलाकार असते. उत्तर भारत असो वा दक्षिण भारत; संस्कृती वेगवेगळ्या असल्या तरी मंदिरांच्या छताच्या बाबतीत सर्वत्र एकवाक्यता दिसते.

**मंदिरातील छताचा भाग पूर्णपणे गोलाकार** असण्यामागे भारतातील वातावरणाचा संबंध असला तरी त्याबरोबरीने इतरही गोष्टींचा संदर्भ आहे. अनेक लोक याचा संबंध धर्माशी जोडतात. एक प्रकारे ते योग्यच आहे. मात्र यामागे धर्म, विज्ञान आणि वास्तुशास्त्र अशी तीनही कारणे आहेत.

**✻ मंदिरामध्ये सकारात्मक उर्जा**

मंदिरात जातो तेव्हा आपल्याला एक प्रकारची मानसिक शांतता मिळते. मंदिरात घंटा वाजली किंवा कितीही आवाज आला तरी गोंगाटातही एक प्रकारची शांतता असल्याचा भास निर्माण होतो. यामागे विज्ञान आहे. खरे तर, मंदिरात घंटा वाजवली जाते किंवा मंत्रोच्चार केला जातो तेव्हा घुमटाकार छतामुळे आवाज मंदिरात पसरतो. त्या आवाजामुळे एक प्रकारचे कंपन निर्माण होते. तेव्हा घुमटाकार छताचा वापर भक्तांना ध्यान आणि उपासनेत गुंतवून ठेवण्यासाठी करण्यात येतो, हे समजून घेतले पाहिजे. म्हणजेच या आकाराच्या छतामुळे मंदिरात सकारात्मक ऊर्जा राहते. छतावरील घुमटाचा आकार ही ऊर्जा सर्वत्र पसरविण्यास मदत करतो.

**✻ तापमानही संतुलित राहते**

मंदिर किंवा मशिदीत गेल्यावर तेथील तापमान संतुलित असल्याचे जाणवते. बाहेरचे तापमान कितीही गरम किंवा थंड असले तरी मंदिरात प्रवेश केल्यावर तापमान सामान्य होते. घुमटाकार छत असण्यामागे एकदेखील एक शास्त्र आहे. घुमटाकार छत मंदिरातील हवेचा प्रवाह नियंत्रित करत असल्यामुळे आतले तापमान संतुलित राहते. या कारणास्तव, मंदिर उन्हाळ्यातही थंड राहते आणि बाहेर थंडी असते तेव्हाही मंदिरातील तापमान सामान्य असते.

# कोंबड्या भाड्याने मिळतील



अमेरिकेत अंडी प्रचंड महाग झाली आहेत. ती खरेदी करणाऱ्या सर्वसामान्यांचा खिसा मोठ्या प्रमाणावर कापला जात आहे. परिणामी अनेकांनी आपल्या रोजच्या आहारातून अंडी बाद केली आहेत. मात्र या संकटावर मात करण्यासाठी तेथे नवीनच कल्पना काढण्यात आली आहे. आता तेथे काहींनी चक्क कोंबड्या भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. त्याला चांगला प्रतिसादसुद्धा मिळत आहे.

**'रेंट द चिकन' सेवा**

न्यू हॅम्पशायर येथील गॉफस्टाउन राहणारे क्रिस्टीन आणि ब्रायन टेम्पलटन यांनी अंड्याच्या समस्येवर एक अनोखा उपाय शोधला आहे. त्यांनी ही अनोखी 'रेंट द चिकन' सेवा सुरू केली आहे. या सेवेअंतर्गत लोक कोंबडी भाड्याने घेऊ शकतात आणि ताजी अंडी त्यांना घरात मिळू शकतात.

**अंड्यांच्या किंमती का वाढल्या?**

अमेरिकेत अंड्यांच्या किंमती वाढण्याचे सर्वात मोठे कारण 'बर्ड फ्लू' हे आहे. या आजारामुळे लाखो कोंबड्या माराव्या लागल्या तसेच कोंबड्यांचे खाद्य आणि विक्री प्रक्रियेतही अडचणी निर्माण असल्यामुळे अंडी महाग होतात. सध्याही हेच कारण बघायला मिळते आहे. अमेरिकेच्या अनेक राज्यांमध्ये अंड्यांच्या किंमती दुप्पट झाल्या आहेत.

**इतके भाडे**

अंड्यांच्या वाढत्या किंमतीवर क्रिस्टीन आणि ब्रायन टेम्पलटन यांनी पर्याय निर्माण केला आहे. त्यांची 'रेंट द चिकन' सेवा वेगाने लोकप्रिय होत आहे. या सेवेनुसार सहा महिन्यांसाठी कोंबडी भाड्याने घेता येते. या कालावधीत दोन कोंबड्या मिळतात. सोबत कोंबड्यांना लागणारे खाद्य आणि तिचे संगोपन कसे करावे? त्याची माहिती दिली जाते. त्यासाठी जवळपास ६०० अमेरिकी डॉलर (जवळपास ४७,६८८ रुपये) भाडे आकारले जात आहे. भाड्याने घेतलेल्या दोन कोंबड्या दर आठवड्यास एक डझन अंडी देतात. त्यामुळे बाजारातून महाग आणि असुरक्षित अंडी घेण्यापेक्षा अशी घरात मिळणारी अंडी खाणे लोकांसाठी फायदेशीर ठरत आहे. बरेच भाडेकरू कोंबड्यांशी इतके जोडले जातात, की सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर ते कोंबड्या परत करण्याऐवजी विकत घेऊन टाकतात. या सेवेमुळे लोकांची महाग अंड्याची समस्या सुटली आहे.

# कपडे उतरवले, तरच मिळेल बीचवर एन्ट्री!

समुद्र किनारा सर्वांच्या आकर्षणाचा विषय असतो. जगभरातील लाखो पर्यटक दरवर्षी वेगवेगळ्या समुद्र किनाऱ्यांना भेट देत असतात. तेथील लाटांचा आनंद घेताना वातावरणाशी एकरूप होऊन जात असतात. मात्र अनेक समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांसाठी वेगवेगळे नियम आहेत. काही समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी आपल्या अंगातील कपडे काढू नयेत असा नियम आहे तर काही समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी अंगातील कपडे काढून समुद्रात अंघोळीचा आनंद घेतला तरी चालत. मात्र जर्मनीमधील काही खास समुद्र किनाऱ्यांना भेटी द्याल तर तुम्हाला अश्चर्याचा धक्का बसू शकतो. कारण इथे तुम्ही जास्त कपडे घातले असतील तर बाहेरचा रस्ता दाखवला जातो. तुम्हाला बीचवर एन्ट्रीच मिळत नाही. बीचवर जायचे असेल तर आधी सर्व कपडे काढावे लागतात. मगच तिथे प्रवेश मिळतो.

'फर्स्टपोस्ट' च्या एका रिपोर्टनुसार उत्तर जर्मनीच्या काही समुद्र किनाऱ्यांसाठी नवा नियम लागू करण्यात आला आहे. हे समुद्र किनारे निसर्गावर विश्वास ठेवणाऱ्या आणि निसर्गाने आपल्याला दिलेल्या गोष्टींचा मनापासून स्वीकार करणाऱ्या लोकांमध्ये लोकप्रिय आहेत. जर्मनीच्या बाल्टिक समुद्राचा भाग असणाऱ्या रॉस्टॉक समुद्र किनाऱ्यावर एक विचित्र नियम बनवण्यात आला आहे. त्यासाठी रोस्टॉक टूरिझम ऑथोरेटीकडून एक २३ पानांची नियमावलीच तयार करण्यात आली आहे. त्यानुसार तुम्ही कपडे घातलेले असतील तर या समुद्र किनाऱ्यावर एन्ट्री दिली जात नाही.

कपडे घालून समुद्रात अंघोळ करणे किंवा उन्हाचा आनंद घेणे यास या समुद्र किनाऱ्यावर मनाई आहे. हा नियम बनवण्यात आला आहे कारण पूर्वी या समुद्र किनाऱ्यावर काही जण कपडे परिधान करून पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी यायचे तर काही जण कपडे न घालताच समुद्र किनाऱ्यावर यायचे. मात्र कपडे घातलेले लोक विवस्त्र वा तोकडे कपडे घालणाऱ्यांबद्दल तक्रार करायचे. अशा प्रकारच्या तक्रारी वाढल्याने शेवटी आता इथे सर्व पर्यटकांसाठी एकच नियम लागू करण्यात आला आहे.





# तिची अफाट स्मरणशक्ती

उत्तर कोरिया या देशातल्या पांग उन सिम नावाच्या तरुणीने आपल्या अचाट बुद्धिमत्तेने अनेकांना थक्क केले. ही मुलगी फक्त १८ सेकंदांमध्ये पाच हजारपेक्षा अधिक आकडे लक्षात ठेवते. इतकंच नाही तर एक मिनिटापेक्षा कमी वेळात पत्याच्या कॅटचा क्रम लक्षात ठेऊन पुन्हा त्याच क्रमाने पत्ते लावते. उत्तर कोरियाने पहिल्यांदाच 'वर्ल्ड मेमरी चॅम्पियनशीप' स्पर्धेत सहभाग घेतला असता त्यावेळी पांगनेच देशाचं प्रतिनिधित्व केलं होतं. कोरियाच्या संघाने त्यावेळी सात सुवर्ण, सात रौप्य आणि पाच कांस्य पदकं पटकावली होती. स्मरणशक्ती सुधारणं वाटतं तितकं कठीण नाही. निर्धार आणि निश्चयाच्या बळावर आपण पुढे जाऊ शकतो, असं पांग सांगते. उत्तर कोरियामध्ये गोष्टी लक्षात ठेवण्याचं तंत्र शाळेत असल्यापासूनच शिकवलं जातं. या मुळे इथल्या लोकांची स्मरणशक्ती चांगली असते. अर्थात तंत्र शिकवलं जात असलं तरी उपजत बुद्धिमत्ता असणंही गरजेचं असतं. त्यामुळे पांगची ही अचाट बुद्धिमत्ता थक्क करून सोडते.

# बर्फात बसणे भावते



आपल्याला बर्फाचा तुकडा हातात घ्यायलाही नको वाटतं. अशा परिस्थितीत बर्फाने भरलेल्या पेटीत बसणं ही अशक्य कोटीतली बाब म्हणायला हवी. मात्र ऑस्ट्रियातल्या एका माणसाने अशक्य ते शक्य करून दाखवलं आहे. जोसेफ कोएबर्ग असं या माणसाचं नाव. तो ॲथलिट आहे. जोसेफ बर्फाने भरलेल्या पारदर्शक पेटीत जवळपास दोन तास बसला. यामुळे त्याने विश्वविक्रमच केला आहे. ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्नामध्ये हा विक्रम नोंदवण्यात आला होता. जोसेफने बर्फाने भरलेल्या पेटीत दोन तास आठ मिनिटं आणि ४७ सेकंद घालवली. जोसेफ पेटीत बसल्यानंतर त्याच्या खांद्यांपर्यंत बर्फ भरण्यात आला. यावेळी त्याने फक्त स्वीम सूट घातला होता. अशा थंडगार वातावरणात काही सेकंद घालवल्यानंतर हुडहुडी भरू लागते. आपण पार गारठून जातो. मात्र जोसेफ तब्बल दोन तास तिथे होता. या आधी चिनी ॲथलिट जिन सोंगहाओने बर्फात बसण्याचा विक्रम केला होता. त्याचा हा विक्रम जोसेफने मोडला. या पेटीतून बाहेर आल्यानंतर डॉक्टरांनी जोसेफला तपासलं. त्यावेळी तो एकदम तंदुरूस्त होता. एवढा वेळ बर्फात बसून रहाणाऱ्या जोसेफच्या धाडसाचं कौतुक संपूर्ण जगाने केले.

# किमती वेफर्स



जगभरात बटाटा वेफर्सच्या चाहत्यांची कमतरता नाही. बाजारात दहा, वीस रुपयांना बटाटा वेफर्सची पाकिटं मिळतात. हे चविष्ट वेफर्स सारखे खावेसे वाटतात. बटाटा वेफर्स हा सगळीकडे उपलब्ध असणारा पदार्थ. त्यामुळे त्यासाठी फार पैसे मोजावे लागत नाहीत. मात्र एक कंपनी विशिष्ट प्रकारचे बटाटा वेफर्स तयार करते. त्यांच्या एका वेफरची किंमत ७८५ रुपये आहे.

या कंपनीच्या बटाटा वेफर्सच्या एका पाकिटाची किंमत ५६ डॉलर्स म्हणजे चार हजार रुपये आहे. गंमत म्हणजे या पाकिटात फक्त पाच वेफर्स असतात. त्यानुसार एका वेफरची किंमत भारतीय चलनात ७८५ रुपये होते. म्हणजे हे बटाटा वेफर्सचं जगातलं सर्वात महागडं पाकिट आहे. आता या वेफर्सचं वैशिष्ट्य तरी काय, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. स्वीडनमधल्या 'सेंट एरिक्स ब्रुवरी' नामक कंपनी हे वेफर्स तयार करते. या वेफर्सचं पॅकिंग खूपच आकर्षक आहे. छोट्याशा पेटीत हे पाच वेफर्स असतात. या पेटीत एखादा दागिना किंवा मौल्यवान वस्तू आहे की काय, असंच वाटतं. हे वेफर्स वेगवेगळ्या पाच चवींमध्ये उपलब्ध आहेत. ग्राहकांच्या मागणीनुसार ते तयार केले जातात. या वेफर्सच्या डब्यात कंपनीचं प्रमाणपत्रही असतं. बनावट वेफर्सना आळा बसावा यासाठी कंपनी प्रमाणपत्र देते. यासोबतच हे वेफर्स तयार करण्यासाठी महागड्या घटकांचा वापर केला जातो. यासाठी वापरला जाणारा कांदा दुर्मिळ प्रजातीचा असल्याचं कंपनीचं म्हणणं आहे. या कांद्याचं उत्पादन लेकसँड शहरातच होतं. त्यामुळे हे वेफर्स महाग आहेत.



# इथे राहतात हिडिंबेचे वंशज


रामायण आणि महाभारत काळातल्या खुणा आजही पहायला मिळतात. भारतासह इतर काही देशांमध्येही रामायण आणि महाभारत काळाशी संबंधित ठिकाणं आहेत. भीमाने हिडिंबा नामक राक्षसीशी लग्न केल्याचे उल्लेख महाभारतात आहेत. या हिडिंबाचे वंशज आजही अस्तित्वात आहेत. हिडिंबाचे वंशज नागालँडमध्ये रहातात. नागालँडमध्ये फक्त एकच रेल्वे स्थानक आणि विमानतळ आहे. इथल्या दीमापूर शहराला नागालँडचं प्रवेशद्वार म्हटलं जातं. नागालँडच्या उत्तरेला अरुणाचल प्रदेश, पश्चिमेला आसाम तर दक्षिणेला मणीपूर आहे. नागालँडच्या पूर्वेला म्यानमार आहे. दीमापूरमधल्या महाभारतकालीन वास्तू पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरतात. इथे आजही हिडिंबा वाडा आहे. इथे बुद्धिबळाच्या भल्यामोठ्या सोंगट्या पहायला मिळतात. याच सोंगट्यांनी भीम आणि त्याचा पुत्र घटोत्कच बुद्धिबळ खेळत असत असं इथले लोक सांगतात. वनवासादरम्यान पांडवांनी या भागात काही काळ घालवल्याचं म्हटलं जातं. दीमापूर हे एकेकाळी हिडिंबापूर या नावाने ओळखलं जायचं. इथेच भीमाने हिडिंबेशी विवाह केला होता. इथले 'डिमाशा' जमातीचे लोक स्वत:ला हिडिंबाचे वंशज मानतात.

# एस्कलेटरला ब्रश का असतात?

एस्कलेटर म्हणजेच चालत्या जिन्याच्या बाजूला असणाऱ्या ब्रशने तुम्हीसुद्धा अनेकदा बूट किंवा चप्पल साफ करण्याचा प्रयत्न केला असेल. मात्र या जिन्यांच्या दोन्ही बाजूला असणारे ब्रश त्यासाठी नसतात, हे समजून घ्या.

**या ब्रशला काय म्हणतात?**

फिरत्या जिन्यांच्या दोन्ही बाजूला असणारे हे ब्रश बनवण्यासाठी नायलॉनचा वापर केला जातो. या ब्रशला तांत्रिक भाषेत 'सेफ्टी ब्रशेस' असे म्हणतात. काही देशांमध्ये एस्केलेटरवरील या ब्रशला 'स्कर्ट डिफ्लेक्टर्स' म्हणजेच स्कर्टसारख्या गोष्टी दूर ढकलण्याचे काम करणारी गोष्ट म्हणून ओळखले जातात. आता या नावावरुन तुम्हाला या ब्रशचा मूळ उद्देश काय असतो हे लक्षात आले असेलच. एस्केलेटरवरून जाताना अनेकदा लोकांचे कपडे अथवा हातातील गोष्टी किंवा बुटाच्या लेस वा पायातील चप्पल दोन्ही बाजूंच्या कडांमध्ये अडकतात. हे टाळण्याचे काम हे ब्रश करतात. काही तज्ज्ञांच्या मते हे असे ब्रश पाहिल्यानंतर फिरत्या जिन्यांवरुन जाणारे लोक आपोआपच जिन्याच्या दोन्ही बाजूंना अगदी टेकून उभे राहण्याऐवजी लांब उभे राहतात.



# जगातील साठ टक्के लोक होतील लठ्ठ



मुले लहान वयातच लठ्ठपणाने किंवा अनियंत्रित वजनाने ग्रस्त असतील तर त्यांचे आयुष्य कमी होण्याचा धोका वाढतो. लठ्ठपणाच्या तीव्रतेबद्दल एका ताज्या अभ्यासात हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अभ्यासानुसार, योग्य ती पावले उचलली गेली नाहीत तर २०५० पर्यंत जगातील सुमारे ६० टक्के प्रौढ आणि एक तृतीयांश मुले अधिक वजनाची असतील किंवा लठ्ठपणाने ग्रस्त असतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

'लॅन्सेट मेडिकल जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनात २०४ देशांमधील विदेचा वापर करून शतकातील सर्वात मोठ्या आरोग्य आव्हानांपैकी एक असणाऱ्या समस्येचे भयानक चित्र रेखाटण्यात आले आहे. हा अभ्यास 'सिएटल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशन'ने समन्वयित केलेल्या 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' कार्यक्रमांतर्गत केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

**अभ्यासातील महत्त्वाचे मुद्दे**

✻ जगभरात जास्त वजन असणाऱ्या किंवा लठ्ठ लोकांची संख्या १९९० मध्ये ९२९ दशलक्ष होती ती २०२१ मध्ये २.६ अब्ज झाली आहे.

✻ पुढील १५ वर्षांत ३.८ अब्ज प्रौढ लोक जास्त वजनाचे किंवा लठ्ठ असतील. याचा अर्थ असा की २०५० मध्ये जगातील एकूण प्रौढ लोकसंख्येपैकी सुमारे ६० टक्के लोक लठ्ठपणाने ग्रस्त असतील.

✻ यामुळे अर्थातच जगाची आरोग्य व्यवस्था कोलमडेल. जगातील जवळजवळ एक चतुर्थांश लठ्ठ लोकांचे वय ६५ पेक्षा जास्त असेल असा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

✻ आधीच जास्त भार असलेल्या आरोग्य व्यवस्थांवर दबाव वाढला आहे आणि मर्यादित संसाधने असणाऱ्या देशांमध्ये वैद्यकीय सेवांवर त्याचा परिणाम होत आहे.

✻ लवकरच जगभरातील मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये लठ्ठपणा १२१ टक्क्यांनी वाढेल.

✻ २०५० पर्यंत लठ्ठ तरुणांपैकी एक तृतीयांश तरुण उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्व, लॅटिन अमेरिका तसेच कॅरिबियन प्रदेशात राहतील.

**आठ देशात सर्वाधिक लठ्ठ**

सध्या, जगातील निम्म्याहून अधिक जास्त वजन असणारे किंवा लठ्ठ प्रौढ लोक फक्त आठ देशांमध्ये राहतात आणि यामध्ये भारताचाही समावेश आहे. चीन, भारत, अमेरिका, ब्राझील, रशिया, मेक्सिको, इंडोनेशिया आणि इजिप्त आणि नायजेरिया असे हे देश आहेत. भारत, पाकिस्तान आणि चीन सारख्या दाट लोकवस्ती असणाऱ्या देशांमध्ये लठ्ठपणा प्रतिबंधाला प्राधान्य दिले पाहिजे.

**मधुमेहाला निमंत्रण**

संशोधकांनी इशारा दिला आहे, की प्रत्येक देशातील मुलांचे वजन मागील पिढ्यांपेक्षा वेगाने वाढत असून लठ्ठ होण्याचे वय कमी होत आहे. त्यामुळे लहान वयातच टाइप २ मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि कर्करोग होण्याचा धोका वाढत आहे. उच्च उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये १९६० च्या दशकात जन्मलेल्या सुमारे सात टक्के पुरुष २५ वर्षांच्या वरयापर्यंत लठ्ठ होत होते. परंतु १९९० च्या दशकात जन्मलेल्या पुरुषांसाठी हा आकडा १६ टक्क्यांपर्यंत वाढला आहे आणि २०१५ मध्ये जन्मलेल्या पुरुषांसाठी तो २५ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

**लठ्ठपणा कशाला म्हणतात?**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, लठ्ठपणा हा एक जुनाट आणि गुंतागुंतीचा आजार असून तो जास्त चरबी जमा होण्यामुळे होतो. ही बाब आरोग्याला हानी पोहोचवू शकते. लठ्ठपणामुळे हाडांच्या आरोग्यावर आणि गर्भधारणेवर परिणाम होऊ शकतो. तसेच लठ्ठपणामुळे झोपणे किंवा चालणे यावरही परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, एखाद्या प्रौढ व्यक्तीचा बॉडी मास इंडेक्स (वजन आणि उंचीचे प्रमाण) २५ किंवा त्याहून अधिक असेल तर त्याला जास्त वजन मानले जाते. बॉडी मास इंडेक्स ३० किंवा त्याहून अधिक असेल तर ती व्यक्ती लठ्ठ मानली जाईल.



'एखादी गोष्ट मला जर माझ्या आयुष्यात मला बदलायची असेल, तर मी श्रीसंतसोबत झालेली ती घटना बदलेल. मला ती घटना माझ्या कारकिर्दीतून कायमची काढून टाकायची आहे. जे घडलं, ते चुकीचं होतं आणि मी ते करायला नको होतं. मी त्यासाठी २०० वेळा माफी मागितली आहे. मला वाईट याचं वाटतं की त्या घटनेला इतके वर्ष झाल्यानंतरही मला संधी मिळेलस तेव्हा, मिळेल त्या माध्यमातून मी त्यासाठी माफी मागितली आहे. ती खरंच एक चूक होती.' 'अनेक वर्षांनंतरही मला तेव्हा अधिक दु:ख झालं, ते मी त्याच्या मुलीला भेटल्यानंतर. मी तिच्याशी खूप प्रेमाने बोलत होतो आणि ती म्हणाली, 'मला तुझ्याशी बोलायचं नाही, तू माझ्या बाबांना मारलं आहेस.' मला खूप वाईट वाटलं आणि माझ्या डोळ्यातून अश्रु येणेच बाकी होते. मी स्वत:लाच विचारलं की मी तिच्या मनावर काय छाप पाडली आहे? ती मला वाईट समजत आहे, ती माझ्याकडे तिच्या वडिलांना मारणारा व्यक्ती म्हणून पाहात आहे. — हरभजन सिंग

# परम, सारा यांना एकेरीत विजेतेपद

## मुंबईतील राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** टीएसटीटीएचा परम भिवंडकर आणि मुंबई शहरच्या सारा जामसुतकर यांनी मुंबईतील खार जिमखाना येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस स्पर्धेत अनुक्रमे १५ वर्षांखालील मुले आणि मुलींच्या एकेरी गटाचे विजेतेपद पटकावले.

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या (एमएसटीटीए) संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धेत १५ वर्षांखालील मुले गटाच्या अंतिम सामन्यात, टीएसटीटीएचा युवा खेळाडू परमने त्याचा सहकारी अहान गोसरविरुद्ध (टीएसटीटीए) ३-०(११-८, ११-५, १३-११) असा सहज विजय मिळवला. मुली गटाच्या अंतिम फेरीमध्ये मुंबई शहरच्या साराने उत्कृष्ट लढाऊ कौशल्य दाखवत पहिला गेम गमावूनही प्रतिस्पर्धी ठाण्याच्या साईशा मधुर हिचा (ठाणे) ३-१ (३-११, ११-९, ११-५, ११-५) असा पराभव केला.



१३ वर्षांखालील मुली एकेरी गटात जिनाया वाधनने (ठाणे) पलख झावर (टीएसटीटीए) हिला चुरशीच्या लढतीत ३-२ (११-७, १०-१२, ९-११, ११-७, ११-७) असे हरवले. १३ वर्षांखालील मुली एकेरीच्या फायनलमध्ये टीएसटीटीएच्या राघव महाजनने त्याचाच सहकारी अयान अथरवर ३-० (११-५, ११-५, ११-९) अशी मात केली.

११ वर्षांखालील मुलींच्या एकेरीमध्ये परभणीच्या आद्या बाहेतीने मुंबई सिटीच्या स्वरा गुडेकरला ३-० (११-५, ११-४, ११-७) अशा फरकाने पराभूत केले. ११ वर्षांखालील मुलांच्या एकेरीमध्ये युवा वालियाने (मुंबई शहर) अधिराज चौहानवर (ठाणे) ३-१ (११-६, ११-७, १२-१४, ११-५) असा विजय मिळवला.

**निकाल (अंतिम फेरी) :**

- ११ वर्षांखालील मुली एकेरी : आद्या बाहेती (परभणी) विजयी वि. स्वरा गुडेकर (मुंबई शहर).
- ११ वर्षांखालील मुले एकेरी : युवा वालिया (मुंबई शहर) विजयी वि. अधिराज चौहान (ठाणे).
- १३ वर्षांखालील मुली एकेरी : जिनाया वाधन (ठाणे) विजयी वि. पलख झवर (टीएसटीटीए).
- १३ वर्षांखालील मुले एकेरी : राघव महाजन (टीएसटीटीए) विजयी वि. अयान अथर (टीएसटीटीए).
- १५ वर्षांखालील मुली एकेरी : सारा जामसुतकर (मुंबई शहर) विजयी वि. साईशा मधुर (ठाणे).
- १५ वर्षांखालील मुले एकेरी : परम भिवंडकर (टीएसटीटीए) विजयी वि. अहान गोसर (टीएसटीटीए).

# कॅप क्रुसडर्स, गट्स अँड ग्लोरी संघांचा सलग दुसरा विजय

**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब पुणे यांच्या तर्फे आयोजित पाचव्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद मिक्स कॉर्पोरेट टी-२० क्रिकेट स्पर्धेत कॅप क्रुसडर्स आणि गट्स अँड ग्लोरी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा



पराभव करून स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवला. सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत विशाल पवार याने फटकावलेल्या ७१ धावांच्या जोरावर कॅप क्रुसडर्स संघाने रियुनायटेड क्रिकेट क्लबचा १५९ धावांनी सहज पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना कॅप क्रुसडर्स संघाने २७८ धावांचे लक्ष्य उभे केले. वासिम अहमद योन ७३ धावांची तर, विशाल पवार याने ७१ धावांची स्फोटक खेळी केली. याशिवाय आदित्य साखरदंडे (४३ धावा) आणि परेश कोठोरी (२८ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. या लक्ष्याचा पाठलाग करताना रियुनायटेड क्रिकेट क्लबचा डाव ११९ धावांवर संपुष्टात आला. पारस जैन आणि सिद्धार्थ दुबे यांनी प्रत्येकी तीन गडी बाद करून संघाचा विजय साकार केला. कपिल गुप्ता याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर गट्स अँड ग्लोरी संघाने रियुनाटेड क्रिकेट क्लबचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना रियुनाटेड क्रिकेट क्लबने १९९ धावांचे लक्ष्य उभे केले. शुभम खटाळे (६३ धावा), देराज भट (४३ धावा) आणि संकेत शिंदे (३५ धावा) यांनी संघाचा डाव बांधला.

# अनिश, क्षितिज, वेदांत, शाश्वत, सई पाटील हे खेळाडू आघाडीवर



**पुणे :** चौथ्या मिलेनियम नॅशनल स्कुल व कुंटे चेस अकादमी विविध वयोगटातील बुद्धिबळ स्पर्धेत सहाव्या फेरीअखेर अनिश जवळकर, क्षितिज प्रसाद, वेदांत काळे, शाश्वत गुप्ता आणि सई पाटील यांनी आपापल्या गटात आघाडी प्राप्त केली. मिलेनियम नॅशनल स्कूल, कर्वे रोड येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत सहाव्या फेरीत 9 वर्षाखालील गटात पहिल्या पटावर अनिश जवळकरने गोरांक्ष खंडेलवालचा पराभव करून 5.5 गुणांसह आघाडी प्राप्त केली. 11 वर्षाखालील गटात क्षितिज प्रसादने नैतिक मानेला बरोबरीत रोखले व 5.5 गुणांची कमाई केली. 13 वर्षाखालील गटात पहिल्या पटावरील चुरशीच्या लढतीत वेदांत काळेने अमेय चौधरीला बरोबरीत रोखले व 5.5 गुणांसह आघाडी कायम ठेवली. 15 वर्षाखालील गटात पहिल्या पटावर शाश्वत गुप्ताने आरूष बुडजादेला बरोबरीत रोखले. तर, दुसऱ्या पटावर सई पाटील हिने वरद गायकवाडचा पराभव करून 5 गुणांसह आघाडी मिळवली. याआधी स्पर्धेचे उद्घाटन मेजर ध्यानचंद पुरस्कार विजेते ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे, कुंटे चेस अकादमी च्या संचालिका मृणालिनी कुंटे - औरंगाबादकर, आंतरराष्ट्रीय मास्टर अभिषेक केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चीफ आरबीटर आयए दिप्ती शिदोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पुणे लीग कबड्डी स्पर्धेत पुरुष विभागात वेगवान पुणे तर महिला विभागात बलाढ्य बारामती विजेता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने " सतेज संघ,बाणेर यांच्या वतीने " कबड्डी महर्षी स्व. शंकरराव ऊर्फ बुवा साळवी चषक निमंत्रित पुरुष व महिला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा - २०२५ व " बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन यांच्या विद्यमाने पुरुष व महिला पुणे लीग कबड्डी स्पर्धेत पुरुष विभागात वेगवान पुणे तर महिला विभागात बलाढ्य बारामती संघाने अंतिम विजेते पद पटकाविले.

पुणे लीग कबड्डी स्पर्धेच्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात वेगवान पुणे संघाने झुंजार खेड संघावर ४६-३७ असा विजय मिळवित स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. मध्यंतराला वेगवान पुणे संघ १५-१९ असा पिछाडीवर होता. वेगवान पुणे संघाच्या दिपक सांगळे व कृष्णा काळभोर यांनी मध्यंतरानंतर आक्रमक खेळ करीत झुंजार खेडचा बचाव खिळखिळा केला व आपल्या संघाची पिछाडी भरून काढत विजय खेचून आणला. ओंकार लाळगे याने सुरेख पकडी घेतल्या. झुंजार खेड संघाच्या महेश यादव, सौरभ आव्हाळे यांनी चांगली



लढत दिली. त्यांनी पहिल्या डावात आक्रमक खेळ केला मात्र मध्यंतरानंतर ते ढेपाळले आणि पराभवाचा सामना करावा. कृष्णा चव्हाण व प्रदीप भगत यांनी काही चांगल्या पकडी घेतल्या.

महिला विभागात अतंत्य अटितटीच्या झालेल्या सामन्यात बलाढ्य बारामती संघाने शिवनेरी जुन्नर संघावर ३७-३५ असा निसटता विजय मिळवित पुणे लीग कबड्डी स्पर्धेचे विजेते पद पटकाविले. मध्यंतराला बलाढ्य बारामती संघाकडे १८-१५ अशी आघाडी होती. बलाढ्य बारामतीच्या वर्षा बनसुडे व वैभवी जाधव यांनी चौफेर आक्रमण करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तर सिध्दी बलकवडे व साक्षी गावडे यांनी सुरेख पकडी केल्या. शिवनेरी जुन्नर संघाच्या किर्ती कडगंची व अंकिता सहा यांनी जोरदार प्रतिकार केला. पूजा तेलंग व सविता गवई यांनी पकडी घेतल्या.

# ठाण्यात रंगणार बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा

**ठाणे :** ठाणे शहर, जिल्हा बॅडमिंटन संघटनेच्या वतीने व ठाणे महानगरपालिकेच्या सौजन्याने जिल्हा बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. यावर्षी ही बहुप्रतीक्षित स्पर्धा २८ जुलै ते ४ ऑगस्ट २०२५ दरम्यान खारटन रोडवरील दादोजी कोंडदेव स्टेडियममधील खंडू रांगणेकर बॅडमिंटन हॉल येथे खेळवण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये २८ जुलैपासून ते ३१ जुलैपर्यंत ज्युनियर गटातील सामने रंगणार आहेत. यात ९ वर्षांखालील (फक्त एकेरी), ११, १३, १५ आणि १७ वयोगटात मुला-मुलींचे एकेरी, दुहेरी आणि मिश्र (फक्त १५ आणि १७ वयोगटात) अशा विविध प्रकारात खेळाडू आपल्या कलागुणांना वाव देतील. यानंतर १ ऑगस्ट ते ४ ऑगस्टदरम्यान वरिष्ठ गटातील सामन्यांचा धमाका अनुभवायला मिळणार आहे.

# राज्यभरातून ११४० खेळाडू विक्रमी सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुधांशु बॅडमिंटन अकादमी यांच्या वतीने व रोहित ग्रुप यांच्या सहकार्याने आयोजित पीवायसी - पिनॅकल फाऊंडेशन आणि एसबीए कप पुरस्कृत योनेक्स सनराईज राज्यस्तरीय 15 व 17 वर्षाखालील बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत राज्यभरातून 1140 खेळाडूंनी आपला विक्रमी सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा पीवायसी हिंदू जिमखाना व डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट



या ठिकाणी 22 ते 27 जुलै 2025 या कालावधीत रंगणार आहे.

स्पर्धेविषयी अधिक माहिती देताना स्पर्धा सचिव सुधांशु मेडसीकर यांनी सांगितले की, स्थानिक पातळीवर बॅडमिंटनला खेळाडूंकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. या खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी आम्ही एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहोत.

ही स्पर्धा पुणे जिल्हा मेट्रोपॉलिटन बॅडमिंटन संघटना यांच्या मान्यतेखाली 15 व 17 वर्षाखालील मुले व मुलींच्या एकेरी गटात होणार आहे. स्पर्धेत शरयू रांजणे, सोयरा शेलार, विश्वजीत थवील, ऋत्वा सजवान आणि शौर्य मांडवी या मानांकित खेळाडूंचा समावेश असणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन रोहित ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष हिरु मोटवानी, रोहित ग्रुपचे संचालक राजीव मोटवानी,

पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे आणि पुणे जिल्हा मेट्रोपॉलिटन बॅडमिंटन संघटनेचे खजिनदार सारंग लागू यांच्या हस्ते होणार आहे.

# पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचा बीसीसीआय कडून 'कार्यक्रम'



**नवी दिल्ली :** आशिया चषक २०२५ स्पर्धेवरून आक्रमक झालेल्या पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आर्थिक कोंडी केली आहे. काही दिवसंपूर्वी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी भारत विरुद्ध पाकिस्तान क्रिकेट सामन्याला हरकत नसल्याचे स्पष्ट केले होते, परंतु बीसीसीआयने मौन धारण करून पाकिस्तान ची गोची केली आहे. बीसीसीआयच्या या भूमिकेमुळे पाकिस्तानला मोठा आर्थिक फटका बसणार आहे. "पाकिस्तान क्रिकेटसाठी आयसीसी आणि आशिया चषक स्पर्धेतून मिळणारा महसूल अत्यंत महत्त्वाचा आहे."

